
अहिल्यानगर । पुणे । छत्रपती संभाजीनगर । बीड । धाराशिव । नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# दैनिक राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक १४८ । गुरूवार १२ मार्च २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 8282 । www.rashtrasahyadri.com

## आई-वडील रागावल्याने मुलाची आत्महत्या



**बीड :** आई-वडील रागवल्याने एकुलत्या एक मुलाने शेतातील आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. विराज हरिदास भगत असे २१ वर्षीय आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. घटना आष्टी तालुक्यातील सांगवी पाटण या गावात घडली आहे. घरातील कामाकडे दुर्लक्ष करत असल्याच्या कारणावरून विराजचे आई-वडील त्याच्यावर रागावले होते. याच रागातून विराजने शेतातील आंब्याच्या झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली.

शेतात गेलेल्या बहिणीला ही बाब निदर्शनास आल्यानंतर सदरील घटना समोर आली. घटनेची माहिती मिळताच आई-वडील त्या ठिकाणी दाखल झाले. गळफास घेतलेली दोरी कापून विराजला रुग्णालयात दाखल करण्यात आले. परंतु तोपर्यंत त्याचा मृत्यू झाला होता. शुल्लक कारणावरून विराजने आपले जीवन संपविल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जातेय. दरम्यान या प्रकरणी पोलिसांनी पंचनामा केला असून अधिक माहिती घेतली जात आहे


## हरीश राणाला इच्छामृत्यूची 'सर्वोच्च' परवानगी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** गेल्या १३ वर्षांपासून कोमात असलेल्या ३१ वर्षीय हरीश राणा याला अखेर इच्छामृत्यूची परवानगी मिळाली आहे. सर्वोच्च न्यायालयाने बुधवारी एक ऐतिहासिक निकाल देत हरीशला पॅसिव्ह यूथेनेशिया म्हणजेच निष्क्रिय इच्छा मृत्यू देण्याची परवानगी दिली आहे.

देशातील अशा प्रकारची ही पहिलीच घटना असल्याचे सांगितले जात आहे.





वरील प्रकरणाबाबत अधिक माहिती अशी, २०१३ मध्ये हरीश राणा चंदिगढ विद्यापीठात बी.टेक.च्या शेवटच्या वर्षाला होता. सिव्हिल इंजिनीअर होण्याचे स्वप्न पाहणारा हरीश रक्षाबंधनाच्या दिवशी होस्टेलच्या चौथ्या मजल्यावरून खाली पडला. या भीषण अपघातात त्याच्या मेंदूला आणि मणक्याला गंभीर दुखापत झाली आणि तो १०० टक्के दिव्यांग झाला. तेव्हापासून तो केवळ मशीन आणि नळ्यांच्या आधारे श्वास घेत होता. हरीशचे वडील अशोक राणा (६३) आणि आई निर्मला देवी यांनी आपल्या मुलाला वाचवण्यासाठी सर्वस्व पणाला लावले होते. हरीशच्या उपचारावर दरमहा ४० ते ५० हजार रुपये खर्च होत होते. मुलाच्या उपचारासाठी त्यांनी दिल्लीतील आपले तीन मजली घरही विकले होते. वडिलांना केवळ ३,५०० रुपये पेन्शन मिळते, अशा परिस्थितीत हा खर्च पेलणे अशक्य झाले होते. आता आम्ही मुलाच्या दीर्घायुष्यासाठी नाही, तर त्याच्या मुक्तीसाठी प्रार्थना करत आहोत, अशा शब्दांत आईने **(पान ४ वर)**

## २०४७ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** महाराष्ट्र राज्याच्या अर्थव्यवस्थेत अडचणीतही मार्ग काढण्याची क्षमता आहे. कारण हे आर्थिक शिस्त पाळणारे राज्य आहे. कर्जाच्या कितीतरी पट आपली भांडवली गुंतवणूक आहे. सन २०३०-३१ मध्ये एक ट्रिलियन डॉलर आणि २०४७ साली आपली अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन डॉलर ईतकी निश्चित होणार आहे, असा दुर्दम्य आत्मविश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज अर्थसंकल्पावरील चर्चेला उत्तर देताना विधानसभेत व्यक्त केला.



**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा आत्मविश्वास**

मुख्यमंत्री फडणवीस यांनी सुमारे सव्वा तास आकडेवारीनिशी विरोधी पक्षीय सदस्यांनी केलेले आरोप व शंकांना उत्तर देताना २०१३-१४साली कर्ज प्रमाण १७टक्के होते.कोविड काळात अतिरिक्त कर्ज घेतले त्यामुळे ते आता साडेअठरा टक्के आहे. कर्जाच्या कितीतरी पटीने आपली भांडवली गुंतवणूक वाढली आहे अशी माहिती दिली.२०१३-१४साली राज्याला केंद्राला मिळणारा हिस्सा १६ हजार ५९८ कोटी रुपये होता. २०२५-२६ साली ८५ हजार कोटी रुपये इतका म्हणजे पाचपट आहे असा टोलाही त्यांनी लगावला. महसुली जमेचे प्रमाण २०१३-१४ साली १ लाख ५५ हजार कोटी रुपये होते ते आता ६ लाख १६ हजार कोटी रुपये इतके वाढले. कर्जाच्या कितीतरी पट भांडवली गुंतवणूक राज्याची वाढली असेही त्यांनी सांगितले. **(पान ४ वर)**

### जमीन मोजणीधारकांची कमतरता नसेल

**भूमी अभिलेख विभागासंदर्भात आता आकृतीबंध तयार झाला असून १०,६८३ भूमापक पदे निश्चित करण्यात आली आहेत. जमीन मोजणीदारांची कमतरता यापुढे राहाणार नाही. प्रत्येक भूमापकाकडे एक रोव्हर असेल अशी माहिती महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत लक्षवेधी सूचना उत्तरात दिली. गोपीचंद पडळकर यांनी ही लक्षवेधी सूचना मांडली होती. भूमी अभिलेख विभाग कर्मचारी आपल्या मागण्यांसाठी आंदोलन करण्याच्या पवित्र्यात आहेत. सध्या जे रोव्हर दिले ते जुने असून सदोष आहेत याकडे त्यांनी लक्ष वेधले.**

## महत्त्वाचे..

### माजी सैनिक अन् भूमिहीनांच्या जमिनी वर्ग १ होणार


मुंबई : राज्यातील माजी सैनिक, भूमिहीन शेतकरी आणि शेतमजुरांना महाराष्ट्र शेत जमीन (सीलिंग) अधिनियमांतर्गत वाटप करण्यात आलेल्या जमिनी 'वर्ग-२' मधून 'वर्ग-१' करण्याबाबतचे धोरण ३१ मार्च २०२६ पर्यंत जाहीर करण्यात येईल, अशी महत्त्वपूर्ण घोषणा महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत केली. आमदार श्वेता महाले यांनी राज्यातील माजी सैनिकांना वाटप केलेल्या सीलिंग जमिनी वर्ग-२ मधून वर्ग-१ करताना आकारण्यात येणाऱ्या अधिमूल्यात सूट देण्याची मागणी केली होती. या जमिनी सध्या वर्ग २ असल्याने त्या हस्तांतरित करण्यावर कायदेशीर मर्यादा आहेत. महसूलमंत्र्यांनी ही मागणी मान्य करत सांगितले की, या जमिनी फ्री होल्ड करण्यासाठी सरकार सकारात्मक असून, यासाठी लागणारी सर्व प्रक्रिया अंतिम टप्प्यात आहे. या जमिनींच्या रूपांतरणासाठी १४ जानेवारी २०२६ रोजी नियमांची अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली होती. ११ फेब्रुवारीपर्यंत प्राप्त झालेल्या हरकती आणि सूचनांवर विचार करून आता कायदा व न्याय विभाग आणि वित्त विभागाने ही फाईल मंजूर केली आहे. ३१ मार्च अखेरपर्यंत या जमिनी 'क्लास-२' मधून 'क्लास-१' करण्याचे अंतिम धोरण प्रसिद्ध केले जाईल.

# शेतीपूरक व्यवसायांसाठी महिलांना विशेष अनुदान देणार

**उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची घोषणा; 'जेंडर रिसोर्स सेंटर'मुळे महिलांचे प्रश्न सुटणार**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

मुंबई : कृषी योजनांमध्ये किमान ३० टक्के लाभ महिलांसाठी राखीव ठेवण्यात आला आहे. नमो ड्रोन योजनेअंतर्गत महिलांना प्रशिक्षण देण्यात येणार असून कुक्कुटपालन आणि इतर शेतीपूरक व्यवसायांसाठी महिलांना विशेष अनुदान दिले जाणार असल्याचे उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी सांगितले.




महिला शेतकऱ्यांना त्यांचे हक्क आणि सन्मान मिळवून देण्यासाठी राज्य शासन कटिबद्ध असून, त्यांच्या सक्षमीकरणासाठी आगामी अधिवेशनात विशेष विधेयक सादर करण्यात येईल. केंद्राच्या धर्तीवर महाराष्ट्रातही राज्यस्तरीय 'जेंडर रिसोर्स सेंटर' स्थापन केल्यामुळे महिलांचे कृषी प्रश्न सोडविण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष २०२६ आणि जागतिक महिला दिनानिमित्त विधानभवनात 'महिला शेतकऱ्यांचे सक्षमीकरण' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, सभापती प्रा. राम शिंदे, विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, डॉ. सौम्या स्वामिनाथन आदी मान्यवर उपस्थित होते. तसेच, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे, पर्यावरणमंत्री पंकजा मुंडे, महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समितीच्या प्रमुख मोनिका राजळे, आमदार ज्योती गायकवाड, मंजुळा गावित आणि डॉ. नित्या राव यांनी यावेळी आपले विचार मांडले.

राज्यात सुमारे ८०-८१ टक्के शेती कामात महिलांचे योगदान असून, अनेक कुटुंबांमध्ये त्या कुटुंबप्रमुख बनल्या आहेत. तरीही सातबारा उताऱ्यावर त्यांचे नाव नसल्याने शासकीय योजनांचा, कर्जाचा आणि प्रमाणपत्राचा लाभ घेण्यात अडचणी येतात.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी सांगितले की, यंदाचे वर्ष महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी समर्पित करण्यात आले आहे. कृषी विभाग आणि महिला व बालविकास विभाग समन्वयाने नवतंत्रज्ञान (जसे की ए आय, ड्रोन, सोलर ड्रायर) महिलांना उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येईल. यामुळे शेतीतून आर्थिक उन्नती साधता येईल. गेल्या वर्षी अहिल्यानगर येथे नियोजन समितीच्या तीन टक्के राखीव निधीतून १५ हजार महिलांना शेती उपकरणे देण्यात आली होती; यंदाही हा उपक्रम राज्यव्यापी राबविला जाईल. नागपूरच्या क्रेडिट सोसायटी आणि 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण' योजनेद्वारे कर्ज, सामूहिक उद्योग आणि शेतीपूरक व्यवसायांना सहकार्य मिळेल. **(पान ४ वर)**



### महिला शेतकरी खऱ्या उद्योजक

महिला शेतकऱ्यांना केवळ 'गृहिणी' न मानता शेती व्यवसायातील खऱ्या 'उद्योजक' आहेत, हे मान्य करायला हवे. ७/१२ वर नाव असो वा नसो, घर आणि शेती महिलाच सांभाळतात. आई नऊ महिने वेदना सहन करून बाळाला जन्म देते, पण कागदावर फक्त बापाचे नाव लागते; आईचे नाव लावण्याचा निर्णय स्वागतार्ह आहे. पशुपालन, कुक्कुटपालन, रेशीम उद्योग, मधुमक्षिका पालन यांसारख्या शेतीपूरक व्यवसायात महिलांना मोठ्या प्रमाणात संधी देण्याची गरज आहे. शेतीचा प्रत्येक टप्पा महिलांच्या कष्टाने पूर्ण होतो; त्यांची ऊर्जा आणि सामर्थ्य ओळखण्याची वेळ आली आहे.

**– पंकजा मुंडे, पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री**

### 'नरेंदर-सरेंडर'चा नारा देत लोकसभेत विरोधकांचा हल्लाबोल

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** संसदेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या दुसऱ्या टप्प्याचा बुधवारी (११ मार्च) तिसरा दिवस आहे. लोकसभेचे कामकाज सुरू होताच, प्रश्नोत्तराच्या तासात विरोधकांनी गोंधळ घातला आणि 'नरेंदर-सरेंडर' अशा घोषणा दिल्या.

विरोधकांनी अमेरिका-इस्रायल आणि इराण युद्धांचा भारतावर होणारा परिणाम आणि गॅस आणि पेट्रोलच्या मुद्द्यावर चर्चा करण्याची मागणी केली. सततच्या गदारोळामुळे सभागृह दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले. त्यानंतर सभागृहाचे कामकाज पुन्हा सुरू झाले. सभापती ओम बिर्ला यांना हटवण्यासाठी विरोधकांच्या अविश्वास प्रस्तावावर आज चर्चा होणार आहे. चर्चेसाठी १० तासांचा कालावधी राखून ठेवण्यात आला आहे, मंगळवारी सुमारे ७ तास चर्चा झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आज सभागृहाला संबोधित करतील. अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी, मंगळवारी, विरोधी पक्षाच्या खासदारांनी ओम बिर्ला यांच्यावर सभागृहाच्या कामकाजात पक्षपातीपणाचा आरोप करत अविश्वास प्रस्ताव मांडला. ५० हून अधिक खासदारांनी प्रस्तावाच्या समर्थनार्थ मतदान केल्यानंतर, पीठासीन अधिकाऱ्यांनी सभागृहात त्याची प्रस्तावना आणि चर्चेला मान्यता दिली. चर्चेला सुरुवात करताना काँग्रेस खासदार गौरव **(पान ४ वर)**

## शेअर मार्केटच्या नावे ६ कोटी ६५ लाखांची फसवणूक

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर शहर पोलिसांत चौघांविरुद्ध गुन्हा**

**संगमनेर :** संगमनेर शहरात चौघांनी मिळवून अदमास डेप्ट कन्सल्टन्सी प्रा. लि. व प्रथमेश वेल्थ मॅनेजमेंट शेअर मार्केटची कंपनी तयार केली. या कंपनीच्या नावाखाली शेअर मार्केट मध्ये गुंतवणूक करा अन् महिन्याला १०% परतावा अधिक मिळेल असे सांगुन तब्बल ६२ जणांनी तब्बल ६ कोटी ६५ लाख ३९ हजार ८३७ रुपयांना पैसे गुंतवले नंतर ही कंपनी बंद करून पळ काढल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी चार जणांच्या विरोधात संगमनेर शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संगमनेर तालुक्यातील आश्वि गावा तील मित्र राहुल शिंदे व विजय काळे यांनी शेअर मार्केटचे पैसे गुंतवा तुम्हाला चांगला परतावा मिळेल असे सांगत दोघांनी अदमास डेप्ट कन्सल्टन्सी प्रा. लि. व प्रथमेश वेल्थ मॅनेजमेंट या कंपनीच्या ऑफिस मध्ये बोलावून घेतले. तेथे महेश मोरे व वैभव काकड हे दोघे बसत होते. त्यांनी तुम्ही फक्त शेअर मार्केट मध्ये पैसे गुंतवा तुम्हाला चांगला परतावा करून देतो. असे सांगितले परंतु, एवढी मोठी रक्कम फिर्यादीकडे नव्हती आणि घरचे देखील तयार नव्हते. तरी सुद्धा राहुल शिंदे यांनी वारंवार फोन करून सांगितले की, पैसे भरा तुम्हाला जास्त पैसे भेटतील असे आमिष दाखवले. हा सर्व प्रकार डिसेंबर २०२४ पासून सुरु होता. जेव्हा आपली फसवणूक झाले. हे कळल्यानंतर सर्वांनी पोलीस ठाण्यात धाव घेतली यानंतर योगेश जऱ्हाड यांनी दिलेल्या फिर्यादीवरून महेश विश्वास मोरे (रा. माळेगाव पठार, ता. संगमनेर), वैभव विठ्ठल काकड (रा. डोळासने, ता. संगमनेर), राहुल शिंदे (रा. आश्वि, ता. संगमनेर), विजय तबाजी काळे (रा. मालदाड रोड, ता. संगमनेर) या चौघांवर संगमनेर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## माजी मंत्री तनपुरे यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चांना उधाण

विशेष प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** राहुरी विधानसभा मतदारसंघातील आगामी पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात मोठ्या हालचाली सुरू झाल्याची चर्चा रंगू लागली आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे नेते व माजी मंत्री प्राजक्त तनपुरे लवकरच भारतीय जनता पक्षात प्रवेश करू शकतात, अशा चर्चांनी सध्या जोर धरला आहे.

दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे राहुरी विधानसभा मतदारसंघाची जागा रिक्त झाली असून, येत्या काही दिवसांत पोटनिवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशातच प्राजक्त तनपुरे यांनी मला आमदार व्हायची काही घाई नाही. अक्षय कर्डिले यांना माझ्या शुभेच्छा आहेत, असे वक्तव्य केल्याने विविध राजकीय तर्कवितर्कांना उधाण आले आहे. त्यामुळे राहुरीची पोटनिवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.



दरम्यान, गेल्या काही दिवसांत तनपुरे यांच्या वेशभूषेत झालेला बदलही चर्चेचा विषय ठरत आहे. गळ्यात भगवा पंचा आणि डोक्यावर भगवी टोपी परिधान करून ते मतदारसंघात फिरताना दिसत आहेत. तसेच भाजप नेते अक्षय कर्डिले यांच्यासोबत त्यांचा वाढता संपर्कही लक्षवेधी ठरत आहेत. त्यामुळे त्यांच्या भाजप प्रवेशाबाबत **(पान ४ वर)**

### मोठ्या राजकीय बदलांची शक्यता

प्राजक्त तनपुरे हे राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) चे प्रमुख नेते असून ते राहुरी विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार आहेत. २०१९ च्या विधानसभा निवडणुकीत त्यांनी शिवाजीराव कर्डिले यांचा पराभव केला होता. त्याच वर्षी स्थापन झालेल्या महाविकास आघाडी सरकारमध्ये त्यांना पहिल्यांदाच मंत्रिपदाची संधी मिळाली होती. ते राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांचे भाचे आहेत. राहुरी पोटनिवडणुकीपूर्वी सुरू झालेल्या या राजकीय घडामोडींमुळे आगामी काळात जिल्ह्याच्या राजकारणात मोठे बदल होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## गॅस दरवाढ व गॅस तुटवड्याविरोधात काँग्रेसचे आज राज्यव्यापी आंदोलन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** केंद्र सरकारने एलपीजी गॅसच्या दरात अचानक वाढ करून महागाईत होरपळून निघालेल्या सर्वसामान्य जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम केले आहे. घरगुती गॅस सिलेंडर ६० रुपये तर व्यावसायिक सिलेंडरच्या दरात ११५ रुपयांनी वाढ केली आहे. दरवाढीसोबतच गॅस बुकिंगचा कालावधीही वाढवला आहे. प्रचंड तुटवडा निर्माण झाल्याने हॉटेल बंद होत आहेत. ही दरवाढ अन्यायकारक असून तात्काळ मागे घ्यावी तसेच घरगुती व व्यावसायिक गॅस सिलेंडर ग्राहकांना सहज उपलब्ध करून द्यावेत, या मागणीसाठी काँग्रेसने आज गुरुवारी राज्यव्यापी आंदोलन पुकारले आहे.



केंद्रातील नरेंद्र मोदी सरकारकडे गॅस व इंधन पुरवठ्याचे कोणतेही नियोजन नाही, त्याचा फटका सर्वसामान्य जनतेला बसत आहे. आखाती युद्धामुळे गॅसचा तुटवडा जाणवत आहे. गॅससाठी रांगा लावाव्या लागत आहेत, हॉटेल व्यवसाय, खाणावळी बंद करण्याची वेळ आली आहे. गॅसचा तुटवडा नाही हा सरकारचा दावा चुकीचा असून सर्वसामान्य जनता व हॉटेल व्यावसायीक यांना गॅस उपलब्ध होत नाही. आधीच महागाई त्यात गॅसचा तुटवडा यामुळे राज्यात कठीण परिस्थिती निर्माण झाली आहे.

सरकारने एलपीजी गॅस पुरवठा सुरळीत करावा या मागणीसाठी काँग्रेसचे नेते, पदाधिकारी, सेल, विभागाचे पदाधिकारी व कार्यकर्ते राज्यातील सर्व जिल्ह्यात आज १२ मार्च रोजी आंदोलन करणार आहेत, अशी माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष संघटन व प्रशासन ॲड. गणेश पाटील यांनी दिली आहे.

## श्रीरामपूरची ४००० एकर जमीन शेल कंपनीला देऊ नका

**...तर ती जमीन लिलावात विका; काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांची लक्षवेधी मागणी**

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य शेती महामंडळाच्या मालकीची श्रीरामपूर तालुक्यातील सुमारे ४००० एकर बागायत जमीन झेडआर २ ग्रुप होल्डिंग या कंपनीला देण्याचा घाट घातला जात असल्याचा खळबळजनक आरोप काँग्रेस विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी बुधवारी विधानसभेत केला. लक्षवेधी प्रश्नावर बोलताना वडेट्टीवार यांनी हा आरोप केला.

राज्य शेती महामंडळाची जमीन ही अशा कंपनीला विकण्याचा घाट आहे ज्या कंपनीच्या कामकाजात आणि आर्थिक व्यवहारांत अनेक गंभीर त्रुटी आढळून आल्या आहेत. झेडआर २ ग्रुप होल्डिंग आणि झेडआर २ बायोएनर्जी या कंपन्यांमध्ये **(पान ४ वर)**

### उद्योग विभागाने जीआर बदलला

**ही जमीन शेतकऱ्यांची हक्काची असल्याने ही ४००० एकर जमीन कोणत्याही परिस्थितीत या बोगस कंपनीला देऊ नये. हा खूप मोठा घोटाळा आहे. ही जमीन एमआयडीसीला देऊन तिथून या कंपनीला देण्याचा डाव आहे. या संबंधात उद्योग विभागाने जीआर देखील बदलले आहे. ही जमीन सरकारने खुल्या लिलावात विकली तर सरकारला हजारो कोटी रूपये मिळतील. ही जमीन सहा हजार कोटींची आहे पण एका मंत्र्यांच्या घशात घालण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप विजय वडेट्टीवार यांनी केला.**

### घोटाळा होऊ देणार नाही : बावनकुळे



**हरेगाव मळा आणि परिसरातील सुमारे ६,५७६ एकर जमिनीबाबत खंडकरी शेतकऱ्यांना न्याय देण्यासोबतच त्या ठिकाणी शेतीपूरक उद्योग उभारण्याबाबत राज्य सरकार सकारात्मक आहे. या जमिनीचा विनियोग कसा करावा, याबाबत 'मंत्रिमंडळ उपसमिती' सखोल अभ्यास करून निर्णय घेईल, असे आश्वासन महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधानसभेत दिले. या प्रक्रियेत कोणताही घोटाळा होऊ दिला जाणार नाही, असेही त्यांनी सभागृहाला आश्वस्त केले. आमदार हेमंत ओगले यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नावर आणि नानाभाऊ पटोले व विजय वडेट्टीवार यांनी मांडलेल्या हरकतींवर उत्तर देताना महसूलमंत्री बोलत होते.**

# आधारच्या दत्तक पालक योजनेसाठी तांगडकर यांची ५९ हजारांची मदत

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** कुणाला आई नाही तर कुणाला वडील नाहीत, तर काही मुले आई-वडिलांच्या छत्रछाये शिवाय पोरकी झालेली आहेत. अशा निराधार मुलांच्या शिक्षणासाठी आधार फाउंडेशन चालू केलेल्या दत्तक पालक योजने साठी उद्योजक कार्तिक तांगडकर यांनी आपल्या जन्मदिवसा साठी होणाऱ्या अनावश्यक खर्चाला फाटा ५९ लाख रुपयांची मदत करत आर्थिक हातभार लवला आहे

संगमनेर येथील आधार फाउंडेशन गेल्या १८ वर्षांपासून कार्यरत आहे.आधार फाउंडेशनकडे १८५ पेक्षा अधिक विद्यार्थी शैक्षणिक दत्तक पालक योजनेचे लाभार्थी आहेत. अहिल्यानगर जिल्ह्यासह पुणे, नाशिक , मुंबई आदी भागातील अनेक गरजू विद्यार्थी फाउंडेशनच्या मदतीने शिक्षण पूर्ण करून स्वतःच्या पायावर उभे राहत असून काही विद्यार्थी पुन्हा फाउंडेशनला मदतही करत आहेत, अशी माहिती प्रकल्प प्रमुख सुखदेव इल्हे यांनी दिली.



> आधार फाउंडेशन या स्वयंसेवी संस्थेचे काम पारदर्शी आहे. गरजू विद्यार्थ्यांच्या व्यावसायिक शिक्षणा साठी दिलेल्या मदतीमुळे अनेक विद्यार्थी स्वतःच्या पायावर उभे राहताना पाहून समाधान वाटते.
>
> **कार्तिक तांगडकर,**
> **उद्योजक संगमनेर**

पहिलीपासून आयटीआय, डॉक्टर इंजिनिअरिंग, पर्यंतचे उच्च शिक्षण करू इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रेरणा देत त्यांना स्वावलंबी बनवण्याचे काम फाउंडेशनकडून केले जात आहे.या सामाजिक कार्याची दखल घेत सिद्धार्थ एंटरप्रायजेसचे उद्योजक कार्तिक तांगडकर हे गेल्या पाच वर्षांपासून आधार फाउंडेशनच्या शैक्षणिक दत्तक पालक योजनेतून मुलांना आर्थिक मदत करत आहेत.

या कार्यासाठी आधार फाउंडेशनचे समन्वयक डॉ. महादेव अरगडे, विठ्ठल कडुसकर, पी. डी. सोनवणे, सोमनाथ मदने, बाळासाहेब पिंगळे, अनिल कडलग, तानाजी आंधळे, लक्ष्मण कोते, विनोद राऊत आदींसह सर्व कार्यकर्ते विशेष परिश्रम घेत आहेत.

## पाण्यापासून वंचित गावांसाठी उपसा सिंचन योजनेची मागणी

### अर्थसंकल्पीय अधिवेशनात आ. खताळ यांनी शासनाचे वेधले लक्ष

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** मुंबई येथे सुरू असलेल्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात संगमनेर मतदारसंघातील पाण्यापासून वंचित राहिलेल्या गावांचा प्रश्न आमदार अमोल खताळ यांनी विधानसभेत उपस्थित करत शासनाचे लक्ष वेधले. मतदारसंघातील काही गावे आजही निळवंडे धरणाच्या पाण्यापासून तसेच भोजापूर पूरचारी योजनेच्या लाभापासून वंचित असल्याचे त्यांनी सभागृहात अधोरेखित केले.

संगमनेर मतदारसंघातील अनेक गावांमध्ये पिण्याच्या पाण्याची टंचाई गंभीर स्वरूप धारण करत असून नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना सिंचनासाठी पुरेशा पाण्याचा अभाव भासत असल्याने शेतीवरही त्याचा विपरीत परिणाम होत असल्याचे चित्र आहे. या पार्श्वभूमीवर आमदार खताळ यांनी विधानसभेत हा महत्त्वाचा मुद्दा मांडत संबंधित भागातील नागरिकांना दिलासा देण्यासाठी शासनाने तातडीने उपाययोजना कराव्यात, अशी मागणी केली.

सायखिंडी व चिकणी या गावांसह परिसरातील अनेक गावे अद्याप पाण्याच्या सुविधांपासून वंचित असल्याचे त्यांनी नमूद केले. या भागातील शेतकरी व नागरिकांना पिण्याच्या पाण्यासह शेतीसाठीही मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याने उपसा सिंचन योजनेच्या माध्यमातून या भागाला पाणी उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने ठोस पावले उचलावीत, असे त्यांनी स्पष्ट केले.




निळवंडे धरण व भोजापूर पूरचारी योजनेचा लाभ न मिळालेल्या या भागांतील नागरिकांना भविष्यात पाण्याचा स्थायी तोडगा मिळावा, यासाठी शासनाने सकारात्मक भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. उपसा सिंचन योजना राबविल्यास या परिसरातील शेतीला मोठा दिलासा मिळेल तसेच नागरिकांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही मोठ्या प्रमाणात सुटण्यास मदत होईल, असेही त्यांनी सांगितले.

दरम्यान, संगमनेर मतदारसंघातील पाणी, रस्ते तसेच इतर मूलभूत सुविधांशी संबंधित प्रश्न सोडवण्यासाठी आमदार अमोल खताळ सातत्याने प्रयत्नशील असून अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यांनी विविध प्रश्न मांडत शासनाचे लक्ष वेधले आहे. त्यामुळे मतदारसंघातील प्रलंबित प्रश्न लवकर मार्गी लागावेत, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे.

## उच्चशिक्षित स्त्री ही प्रगत व समृद्ध भारताची गुरुकिल्ली : डॉ. सुधा कांकरिया

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**झरेकाठी :** स्त्री समाजाकडे डोळसपणे पाहत सामाजिक प्रश्न समजून घेत त्यावर उपाय शोधण्यासाठी पुढे येत आहे. राष्ट्राची सर्वांगीण प्रगती स्त्री व पुरुष या दोन चाकांवर अवलंबून असते. मातृत्व, नेतृत्व आणि कर्तृत्व या सर्व क्षेत्रांत महिलांनी आघाडी घेतली असून प्रगत व समृद्ध भारताची गुरुकिल्ली ही उच्चशिक्षित स्त्री आहे, असे प्रतिपादन आंतरराष्ट्रीय नोबेल पीसअवॉर्ड विजेत्या डॉ. सुधा कांकरिया यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधार योजनेंतर्गत आणि लोकनेते पद्मभूषण डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या सात्रळ (ता. राहुरी) येथील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात 'उच्च शिक्षणातील महिलांचा सहभाग' या विषयावरील दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे ज्येष्ठ संचालक ॲड. आप्पासाहेब दिघे होते.

यावेळी अतिरिक्त पुणे जिल्हा ग्राहक मंचाच्या न्यायाधीश ॲड. मधुगिता सुखातमे, संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता राधाकृष्ण विखे पाटील, एआय काउन्सलर पवन वर्मा, महाविद्यालय विकास समितीच्या सदस्या मंदाताई डुक्रे, गायत्री म्हस्के आदी उपस्थित होते.

डॉ. सुस्मिता विखे यांनी सांगितले की, उच्च शिक्षणातील महिलांचा वाढता सहभाग समाजाच्या प्रगतीसाठी महत्त्वाचा असून वैद्यकीय, अभियांत्रिकी, व्यवस्थापन, विज्ञान व कला क्षेत्रात महिलांनी उल्लेखनीय यश मिळवले आहे. स्त्री-पुरुष समानता ही सामाजिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक स्तरावर मिळणे आवश्यक आहे.बीजभाषणात ॲड. मधुगिता सुखातमे यांनी सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा संदर्भ देत स्त्री शिक्षणाचे महत्त्व अधोरेखित केले. अध्यक्षीय भाषणात ॲड. आप्पासाहेब दिघे यांनी ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणासाठी प्रवरा शिक्षण संस्थेच्या कार्याचा गौरव केला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सोपान शिंगोटे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. दीप्ती आगरकर व डॉ. अनंत केदार यांनी केले तर आभार डॉ. राम तांबे यांनी मानले.

## अटल टिंकरिंग प्रदर्शनात टाकळीभानचा विद्यार्थी जिल्ह्यात प्रथम

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** अहिल्यानगर येथील रेणावीकर विद्यालय येथे शालेय शिक्षण व क्रीडा विभाग महाराष्ट्र शासन, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र, पुणे तसेच जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था संगमनेर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित जिल्हास्तरीय अटल टिंकरिंग विद्यार्थी व शिक्षक प्रकल्प प्रदर्शनामध्ये टाकळीभान येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कुल व आण्णासाहेब पटारे पाटील कनिष्ठ महाविद्यालयातील इयत्ता आठवीचा विद्यार्थी ओम सोमेश्वर आरगडे याचा डिजिटल साक्षरता विभागामध्ये जिल्ह्यात प्रथम क्रमांक आला. या विद्यार्थ्याने बीएमआय कॅल्क्युलेटर हे अँड्रॉइड मोबाईल एप्लीकेशन तयार केले, जे आपल्याला मोफत आणि इंटरनेटशिवाय आपल्या वजन आणि उंचीच्या प्रमाणानुसार आरोग्याबद्दल अधिक माहिती सांगेल. ओम आरगडे यांच्या यशाबद्दल रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिल सदस्या मीनाताई जगधने, जनरल बॉडी सदस्य बापूसाहेब पटारे, स्कुल कमिटी सदस्य मंजाबापू थोरात व राहुल पटारे यांनी अभिनंदन केले आहे.ओम आरगडे याला मुख्याध्यापक शिंदे आर.एम. पर्यवेक्षक जरे एस.एस. अटल टिंकरिंग विभागप्रमुख पवार एस.एस. तसेच पालवे एन.ए., पांढरे डी.ए. आणि सर्व शिक्षकवर्गाचे मार्गदर्शन लाभले असून त्याच्यावर सर्वत्र कौतुकाचा वर्षाव होत आहे.




## आषाढी दिंडीच्या पार्श्वभूमीवर उद्या नियोजन बैठक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** दरवर्षी प्रमाणे आषाढी पायी दिंडी पंढरपूर पालखी सोहळयाच्या नियोजनासाठी शुक्रवारी दि.१३ मार्च रोजी सकाळी ९ वाजता नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरामध्ये नियोजन बैठकीचे आयोजन करण्यात आले. असे मंदिराचे प्रमुख मार्गदर्शक व विश्वस्त वेदांताचार्य हभप देविदास महाराज म्हस्के शास्त्री यांनी सांगितले.

दिंडी सोहळ्याच्या निमित्ताने नियोजनाकरिता १३ मार्च रोजी सकाळी ९ वाजता संत ज्ञानेश्वर महाराज मंदिरात महंत रामभाऊ महाराज राऊत,सर्व दिंडी चालक,संत ज्ञानेश्वर महाराज मंदिर संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, विश्वस्त व विविध संस्थांचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

१३ तारखेला या बैठकीस सर्वांनीच उपस्थित राहण्याचे आवाहन वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के यांनी दिंडी चालक व वारकऱ्यांना केले आहे.



## संपादकीय

# सगळेकाही 'गॅसवर'

पश्चिम आशियातील युद्धाने भारताच्या ऊर्जासुरक्षेच्या प्रश्नाला पुन्हा ऐरणीवर आणले आहे. अमेरिका आणि इस्त्राईल यांनी इराणविरुद्ध सुरू केलेल्या लष्करी कारवाईमुळे होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणारा कच्चे तेल, एलपीजी आणि एलएनजीचा पुरवठा जवळपास ठप्प झाला आहे. जगाच्या एकूण तेल आणि वायू व्यापाराच्या सुमारे २० टक्के हिस्सा या संकुचित मार्गातून जातो. इराणने या मार्गावर जहाजांवर हल्ले करून आणि ''कोणत्याही जहाजाला जाण्याची परवानगी नाही'' अशी धमकी देऊन प्रभावीपणे बंदी घातली आहे. यामुळे भारतासारख्या आयातनिर्भर देशाला गंभीर संकटाचा सामना करावा लागत आहे.भारत आपल्या कच्च्या तेलाच्या गरजेच्या ८५-९० टक्के आयात करतो. यापैकी सुमारे अर्धा हिस्सा होर्मुझमधून येतो, मुख्यतः इराक, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिराती आणि कुवेत यांसारख्या देशांतून. एलपीजीच्या आयातीपैकी ८५-९० टक्के आणि एलएनजीच्या ५०-६० टक्के पुरवठा मध्य पूर्वावर अवलंबून आहे. कतार एकट्याने भारताच्या एलएनजी पुरवठ्यात ४८ टक्के वाटा आहे, तर एलपीजीमध्ये आखाती देशांचा वाटा ९० टक्क्यांपेक्षा जास्त आहे. रशियाकडून होणारा कच्च्या तेलाचा पुरवठा (सुमारे ३५-४० टक्के) हा सध्या स्थिर असला तरी, होर्मुझच्या संकटामुळे एकूण ऊर्जा साखळीच धोक्यात आली आहे.

या युद्धाच्या झळा आता प्रत्यक्ष घराघरांत पोहोचल्या आहेत. एलपीजी सिलिंडरच्या पुरवठ्यात विलंब, व्यावसायिक वापरासाठी गॅस मिळणे कठीण होणे, रेस्टॉरंट्स आणि हॉटेल्समध्ये बंदीची शक्यता, तसेच खत, पेट्रोकेमिकल, पोलाद आणि सिरॅमिक उद्योगांसाठी नैसर्गिक वायूच्या कमतरतेमुळे उत्पादन खर्च वाढणे अशी स्थिती निर्माण झाली आहे. सरकारने घरगुती एलपीजीला प्राधान्य देऊन २५ दिवसांनंतर दुसरा सिलिंडर देण्याची व्यवस्था केली आहे. रेशनिंग आणि प्राधान्यक्रम लागू केले आहेत, जेणेकरून इस्पितळे, शैक्षणिक संस्था आणि आवश्यक सेवांना पुरवठा मिळेल. तरीही, पुरवठ्यात १०-१५ दिवसांचा विलंब किंवा कमतरता निर्माण होऊ शकते. पेट्रोल-डिझेलच्या किंमती स्थिर ठेवण्याचा प्रयत्न सरकार करत असले तरी, जागतिक बाजारातील तेलाच्या किंमती वाढल्याने दीर्घकाळात दबाव येईल.

या संकटाचे मूळ हे पूर्वनियोजनातील अपयशात आहे. होर्मुझच्या सामुद्रधुनीचा 'अण्वस्त्र'सारखा वापर इराण करू शकतो हे वर्षानुवर्षे माहिती होते. तरीही, ऊर्जा आयातीचे वैविध्यीकरण आणि साठा वाढवण्यात अपेक्षित वेग आला नाही. भारतात एलपीजी आणि एलएनजीचे मोठे साठे ठेवणे महाग आणि जोखमीचे आहे – उच्च दाब, स्फोटाची शक्यता आणि शहरांच्या सुरक्षेमुळे मर्यादा येतात. वितरण सततच्या आयात आणि वाहतुकीवर अवलंबून असते. अशा स्थितीत एक छोटासा व्यत्ययही मोठे संकट निर्माण करतो.या अनुभवातून धडा घेण्याची गरज आहे. भविष्यात रशिया किंवा आखाती देशांवर अवलंबित्व कमी करावे लागेल. नायजेरिया, अंगोला, ओमान, मलेशिया, मोझांबिक, ब्राझील आणि मेक्सिकोसारख्या विविध पुरवठादारांकडून आयात वाढवणे आवश्यक आहे. देशांतर्गत खनिज तेल आणि नैसर्गिक वायू उत्पादनाला प्रोत्साहन द्यावे लागेल. अक्षय ऊर्जा – सौर, पवन, हायड्रो आणि हरित हायड्रोजन – यांना वेगाने प्रोत्साहन देऊन जीवाश्म इंधनावरील अवलंबित्व कमी करणे हा एकमेव दीर्घकालीन उपाय आहे.

सरकारने सध्याच्या संकटात तातडीने उपाय केले आहेत, जसे की पर्यायी पुरवठादार शोधणे, रेशनिंग आणि उद्योगांना निर्देश देणे. पण हे तात्पुरते उपाय आहेत. राजकीय आरोप-प्रत्यारोपांऐवजी ऊर्जासुरक्षेच्या राष्ट्रीय धोरणावर एकमताने काम करणे गरजेचे आहे. हा संकट केवळ इंधनाचा नाही, तर अर्थव्यवस्था, महागाई आणि सामान्य माणसाच्या दैनंदिन जीवनाचा आहे. स्वयंपाकघरातील चूल विझू नये म्हणून दूरदृष्टीने नियोजन करणे आता अपरिहार्य झाले आहे.

## कर्जमाफीतून थकीत शेतकऱ्यांसह नियमित कर्जदार शेतकऱ्यांचाही फायदा व्हावा : आ. काळे

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** अतिशय कठीण परिस्थितीतून वाटचाल करीत असलेल्या राज्यातील शेतकऱ्यांच्या अनंत अडचणी लक्षात घेतल्यास शेतकऱ्यांना कर्जमाफी करण्याची अत्यंत आवश्यकता होती. त्यामुळे राज्यातील शेतकऱ्यांना महायुती शासनाने कर्जमाफी करण्याची केलेली घोषणा स्वागतार्ह आहे.परंतु कर्जमाफी करतांना पीक कर्जासह मध्य मुदत व दीर्घ मुदतीच्या कर्जदारांचाही थकबाकीमध्ये समावेश करणे गरजेचे असून त्याशिवाय शेतकरी पूर्णपणे कर्जमुक्त होणार नाही. तसेच नियमित कर्जदार शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान म्हणून देण्यात येणारी ५० हजार रुपये हि रक्कम त्या तुलनेत कमी वाटते. त्यामुळे थकीत कर्जदार शेतकऱ्यांना करण्यात येणाऱ्या कर्जमाफी रक्कमेच्या तुलनेत नियमित कर्जदार शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर अनुदान मिळाले पाहिजे व त्या शेतकऱ्यांचा जास्तीत जास्त फायदा व्हावा अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात चर्चेदरम्यान सरकारकडे केली आहे.

थकीत कर्जदारांप्रमाणे नियमित कर्जधारकांनाही कर्जमाफी करतांना शासनाकडून योग्य न्याय मिळावा यासाठी आमदार आशुतोष काळे यांचा सातत्याने पाठपुरावा सुरु असून यापूर्वीही कर्जमाफी समितीचे अध्यक्ष व राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्र फडवणीस यांचे आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांनाही २४ फेब्रुवारी रोजी याबाबत त्यांनी लेखी निवेदन दिले आहे. व पुन्हा एकदा २०२६-२७ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात चर्चेदरम्यान त्यांनी हा मुद्दा उपस्थित करून या प्रश्नाकडे सरकारचे लक्ष वेधले आहे.




यावेळी बोलतांना आमदार आशुतोष काळे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी शेतकरी कर्जमाफी योजनेतून ३० सप्टेंबर २०२५ पर्यंतचे थकीत कर्ज असणाऱ्या शेतकऱ्यांची कर्जमाफी करून नियमित कर्ज फेड करणाऱ्या पात्र शेतकऱ्यांना रुपये ५० हजार रुपये प्रोत्साहनपर अनुदान देण्याची घोषणा अर्थसंकल्पामध्ये करण्यात आली त्याबद्दल आमदार आशुतोष काळे यांनी महायुती शासनाचे आभार मानले. त्यांनी सांगितले की, यापूर्वी २०१७ मध्ये राज्य शासनाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज शेतकरी सन्मान योजने अंतर्गत दीड लाखापर्यंत कर्जमाफी करण्यात आली होती तसेच २०१९ मध्ये महात्मा ज्योतीराव फुले शेतकरी कर्जमाफी योजने अंतर्गत दोन लाखापर्यंत शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्यात आली होती.परंतु राज्य शासनाकडून शेतकऱ्यांना करण्यात आलेल्या आजवरच्या कर्जमाफी योजनेच्या माध्यमातून नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना थकीत कर्जदाराच्या तुलनेत कर्जमाफी योजनेचा फायदा कमी झाला असल्याचे दिसून आले आहे. त्यामुळे नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना कमी फायदा व थकीत कर्जदारांना जास्त फायदा होतो अशी भावना नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांच्या मनात निर्माण होवून नियमित कर्जदारांमध्ये नाराजी निर्माण होते. २०२६-२७ च्या अर्थसंकल्पामध्ये थकीत कर्जदारांबरोबर जे नियमित कर्ज भरणारे शेतकरी आहेत त्यांनाही प्रोत्साहनपर ५० हजार रुपये रकमेपर्यंत लाभ देण्याचे सांगण्यात आले आहे. मात्र आजवरच्या करण्यात आलेल्या कर्ज माफीप्रमाणे या कर्जमाफीमध्येही नियमित कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही याची काळजी घेणे गरजेचे आहे.त्यामुळे त्यांच्या मनात कोणत्याही प्रकारची नाराजी राहणार नाही व त्यांचा जास्तीत जास्त फायदा कसा करता येईल याबाबत शासनाने गांभीर्याने विचार करावा अशी मागणी आमदार आशुतोष काळे यांनी सरकारकडे केली आहे.

**रमजानुल मुबारक २०२६**
**रोजा नंबर २२**

## तुमच्या प्रत्येक हाकेला बरोबरच असतो " दिव्य कुर आन"

कोई सुनता नहीं दुआ के सीवा :
कोई सुनता नहीं खुदा के सीवा ''!!

पैगंबर मुहम्मद स्व चे मित्र, अबू हुरैरा रजि. सांगतात , आम्हाला, प्रेषित मुहम्मद स्व. नी सांगितलं, '' अल्लाह रबबूल इज्जत म्हणतात, कीं, '' अद – इंद – जननीं –बी – व –अन – मआहू – इजा – दर्नी '' अर्थात :– '' मी आपल्या अनुयायी ( बंदे ) साठी असा आहेत कीं, जसा तो माझ्या बद्दल विचार करतोय किंवा आठवण करतो : आणि जेव्हा हीं तो मला हाक ( पुकारतो )मारतोय :, त्या– त्या वेळी त्याच्या बरोबर मी असतो ''.( सहीहं बुखारी ).पुन्हा एकदा प्रेषित मुहम्मद स्व. सांगतात , '' तुमच्या रब (अल्लाह – परमेश्वर ) ने सांगतो , '' मला तुमची दुआ करत चला आणि तुमचे प्रार्थना – विनंती ( दुआ– याचना – ) मी जरूर कबूल(मान्य )करतो . ( मसनद ए हादिस, तिरमिझी, अबू दाउद, इब्न माझा, ).इस्लाम मध्ये दुआ प्रार्थना करण्याचे महत्व आहेत. '' दुआ '' हा अरबी शब्द आहेत, त्याचा शब्दशा आर्थ एखाद्याला बोलावणं होतं, तसे अरबी भाषेत एका शब्दाचे तीस अर्थ होतात, परंतु आपल्याला याचा आर्थ अल्लाह कडे कळकळीची याचना – विनंती –मागणी करणं–मागणी मागणं– आपण आपली याचिका अल्लाह कडे सादर करणं, अल्लाह कडे कृमेची –दयेची याचना करणं, अल्लाह कडे आपल्या प्रत्येक गरजेच्या गोष्टी मागणं, प्रत्येक समस्यांचे ग्रहाणे विश्व च्या मालक अल्लाह –(ईश्वराकडे) हा सर्व शक्तीमान अशा अल्लाह कडे मांडत असतो..संशोधन करणाऱ्या संशोधकांनी असं म्हटलं की आज च्या डिश टीव्ही द्या जमान्यात त्या टीव्ही ची तबकडी हीं अर्ध गोलाकार असते व काही संशोधन केंद्रात फार मोठी अर्ध्यागोलाकार तबकडी वजा यंत्रणा बसवलेली असते. ती यासाठीच की अंतराळातुन आकाशातून जें संदेश येत असतात ते संदेश त्या अर्ध्या गोलाकार तबकडी त लवकर आकर्षित होतात… हा कॉन्दोन्हीही म्हणू या. आपण जेंव्हा जेंव्हा अल्लाह कडे याचना दुआ करतो त्या वेळी दोन्हीही हाताच्या ओंजळी सारखा अर्धा गोलाकार भाग बनवूनच दुआ करतो.. त्याचाच प्रतिकृती संशोधकांनी घेतली असेल. असो. दुआ म्हणजेच इस्लाम मध्ये उपासनेंचा प्रकार आहेत, प्रत्येक मुस्लिम श्रद्धावंताच्या दुआ चे खूप महत्व आहेत, प्रत्येक गरजे साठी दुवा करणं म्हणजेच एक उपासना कारणच आहेत. प्रेषित मुहम्मद स्व.नी एका ठिकाणी म्हटलं '' दुआ करणं म्हणजे,तुम्हीं केलेल्या सर्व उपासना चा सार आहेत. व तुम्हीं कधी दुआ नाहीं केली तर अल्लाहला फार राग येतो.' हा प्रकार म्हणजेच अल्लाह ची प्रतार्णा करणं, असं फक्त गर्विष्ठ लोकं च करतात, म्हणून थोडी जरी अल्लाह ची उपासना केली तरी अल्लाह कडून छोटं बक्षीस घेणं हे अल्लाहला खुश करण्या सारखं असतं.. नाहीतर ते आपल्याला ''अहंकार ''झाल्या सारखं होतं. अल्लाह ला अहंकारी पसंत नाहीं. '' गर्वाचं घर खाली '' असतं म्हणतात.प्रत्येक श्रद्धावंत बंधू प्रत्येक आणीबाणी संकटाच्या काळात जवळच्या मित्रा सारखा , हो अगदी जवळच्या मित्रा सारखाच अल्लाहच वाटतो. अगदी मित्रा सारखं म्हणजे अल्लाह जवळ आरे कारे च्या भाषेत तच दुवा केली जाते, जसा काय अल्लाह आपल्या समोरच बसलेला आहेत एक विश्वासूं मित्रासारखा मित्र,मोठा भाऊ.विश्वासू.प्रेषित मुहम्मद स्व. सांगतात , ''अल्लाह जवळ येवढ्या भरवश्याने दुवा करा , कीं , तो संपूर्ण समस्या एकूण घेऊन आपल्या सर्व इच्छा –आकांक्षा (मुराद )मनातील सर्व इच्छा पूर्ण करणारचच आहेत येवढ्या भरोसा ठेवून दुवा करा '' ( हादिस तिर्मिजी ).दिव्य कुरआन मध्ये अल्लाह म्हणतात , '' हें पैगंबर स्व.! जेंव्हा माझे श्रद्धावान माझ्या बाबतीत तुम्हाला विचारतील, तर, तुम्हीं माझ्या वतीने त्यांना सांगा कीं, तो अल्लाह ( परमेश्वर – भगवंत ) तो तर तुमच्या अगदीच निकट ( जवळ )च आहेत, आणि, कोणी हाक दिली , तर , तो तुमच्या हाक देणाऱ्याच्या हाकेला मी प्रतिसाद देत असतो, '' , जे अनुचित ( चुकीच्या ) मागण्या सोडून सर्व योग्य मागण्या पूर्ण करतोय.'' ( पारा ०१, सुरह नं. ०२, अल –बकराह आ. नं. १८६).जेंव्हा जेंव्हा तुम्ही संकटाच्या विळख्या मध्ये असतात तेंव्हा तेंव्हा तुम्ही अल्लाह कडे याचना करतात, अर्थात आपण प्रत्येक्षात संपूर्ण सृष्टीच्या मालकासमोर, विश्वाच्या निर्माण कर्त्या समोर आपलं म्हणणं रूपी अर्ज सादर करत असतो म्हणून आपलं सर्व अहंकार सोडून दुवा जरूर कराव्यात, घडी घडी दुवा करावे. म्हणजे आपल्या हृदयात एक कोमलता निर्माण होते, अहंकार नष्ट होतं, मी पणा च पतन होतं हृदय हलकं होतं. एक प्रकारचा विश्वास निर्माण होतं, व कोणत्याही गरजेसाठी सरळ सरळ अल्लाह च्या दरबारात हात पुढे करून पसरून दुवा याचना करून, ती पूर्ण करायची, पैगंबर मुहम्मद स्व. म्हणतात ना , '' दुआ मोमीन का हत्यार है….''

'' हार बार मांगा करो तो क्या हासील :
दुआ वही है जो दिल से कभी निकलती है!!



डॉ. सलीम शेख
बैतुशशिफा मल्टिस्पेशालिटी दवाखाना.
श्रीरामपूर, जि. अहमदनगर
मो. ९२७१६४००१४

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द•ख•ल

## शास्त्रीनगर येथे महिला दिनानिमित्त निपुण माता पालक गट मेळावा



**बालाजी देडगाव :** जि.प. प्राथ. शाळा शास्त्रीनगर येथे जागतिक महिला दिनानिमित्त निपुण माता पालक गट मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी सर्व माता पालकांचे स्वागत करण्यात आले तसेच नुकतेच प्राप्त झालेल्या निपुण साहित्याची माहिती देण्यात आली. माता पालकांनी अतिशय सुंदर व मोजक्या शब्दात स्वतःचे मनोगत व्यक्त केले तसेच अश्विनी आठरे व चौरे ताई यांनी मुलांना मार्गदर्शन केले. विशाखा बोरगांवकर मॅडम व सय्यदअली सर यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले. यावेळी अनिता चौरे, सरिता वाघमारे, कल्पना थोरात, ताराबाई कुऱ्हाडे, हिराबाई कुऱ्हाडे, संगिता चौरे, ताराबाई गवळी आदी उपस्थित होते.

## महिलांनी विविध कौशल्य आत्मसात करावी : सौ.विखे

**लोणी :** महिलांनी विविध कौशल्ये आत्मसात करून स्वतःची प्रगती साध्य करावी. आज महिला सर्वच क्षेत्रांत आघाडीवर आहेत. नोकरी करणाऱ्या महिलांना कुटुंबीयांनी समजून घेत साथ देणेही तितकेच आवश्यक आहे. महिलांना सन्मानाने वागणूक देणे हाच तिचा खरा सन्मान ठरेल, असे प्रतिपादन जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सौ. शालिनीताई विखे पाटील यांनी केले.प्रवरा इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च अँड एज्युकेशन इन नॅचरल अँड सोशल सायन्सेस (पायरेन्स), लोणी येथे जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित 'सन्मान स्त्री शक्तीचा' या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. हा कार्यक्रम संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुप्रिया ढोकणे पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आला होता.यावेळी सचिव डॉ. निलेश वनकर, संचालक मोहसिन तांबोळी, डॉ. कल्पना साठे, प्रा. ऋतुजा कोतकर यांच्यासह संस्थेतील महिला अधिकारी, पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.यावेळी बोलताना सौ. विखे पाटील यांनी सांगितले की, जनसेवा फाउंडेशनच्या माध्यमातून महिलांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी विविध उपक्रम राबविले जात आहेत. बचत गटांच्या माध्यमातून महिलांना बचतीसोबतच विविध कौशल्य प्रशिक्षण देऊन स्वयंरोजगारासाठी प्रोत्साहन दिले जाते. कार्यक्रमात प्रा. रेणुका तनपुरे व डॉ. वर्षा लोखंडे यांनी मनोगत व्यक्त केले. सूत्रसंचालन गायत्री म्हस्के यांनी केले तर आभार डॉ. रनिता वलवे यांनी मानले. तसेच महिला दिनानिमित्त विविध खेळ व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.

## ईपीएस-९५ पेन्शनधारकांचे पेन्शनवाढीसाठी दिल्लीत एल्गार

**श्रीरामपूर :** देशातील सार्वजनिक, खाजगी, सहकारी तसेच विविध महामंडळांमधील ईपीएस-९५ योजनेतील निवृत्त कर्मचाऱ्यांनी पेन्शनवाढीच्या मागणीसाठी दिल्लीत जंतरमंतर मैदानावर तीव्र आंदोलन छेडले. राष्ट्रीय संघर्ष समितीच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात देशभरातून हजारो पेन्शनधारक सहभागी झाले होते. समितीचे अध्यक्ष कॅप्टन राऊत व इतर पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.ईपीएस-९५ अंतर्गत अनेक कर्मचाऱ्यांना सध्या दरमहा सरासरी केवळ सुमारे १२०० रुपये इतकी तुटपुंजी पेन्शन मिळत आहे. या रकमेवर औषधोपचार व उदरनिर्वाह करणे कठीण होत असल्याने किमान ७५०० रुपये मासिक पेन्शन व त्यासोबत महागाई भत्ता देण्याची मागणी राष्ट्रीय संघर्ष समितीने केली आहे. या मागणीसाठी समिती गेल्या पंधरा वर्षांपासून सातत्याने आंदोलन करत असून शासनाकडून केवळ आश्वासने मिळत असल्याने निवृत्त कर्मचाऱ्यांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे.सध्या संसदेचे अधिवेशन सुरू असल्याने केंद्र सरकारचे लक्ष या प्रश्नाकडे वेधण्यासाठी समितीने ९ ते ११ मार्चदरम्यान तीन दिवस आंदोलनाची हाक दिली होती. या आंदोलनात देशातील विविध राज्यांसह महाराष्ट्रातील अहिल्यानगर जिल्ह्यातील खाजगी कारखाने, सहकारी साखर कारखाने, एस.टी. महामंडळ, शेती महामंडळ, मुळा-प्रवरा वीज संस्था, सूतगिरण्या आदी ठिकाणचे निवृत्त कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले.यावेळी कमांडर अशोक राऊत यांनी सरकारने तातडीने आश्वासनांची पूर्तता करावी, अन्यथा यापेक्षा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा दिला.

### श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या पुण्यतिथी निमित्त..

# देवगड येथे शेकडो दिंड्यांची हजेरी

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** तालुक्यातील श्रीक्षेत्र देवगड येथे श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या पुण्यतिथी सोहळयास श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा की जय असा जयघोष करत बुधवार दि.११ मार्च रोजी भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला.सदरचा सोहळा हा १६ मार्च पर्यंत चालणार आहे. पुण्यतिथीच्या निमित्ताने श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा की जय ,अवधूत चिंतन श्री गुरूदेव दत्त या जयघोषाने देवगड नगरी दुमदुमली होती दिवसभरात शेकडो दिंड्यांनी देवगड येथे हजेरी लावली. तर एक लाख भाविकांनी दर्शन घेतले.

सहा दिवस चालणाऱ्या पुण्यतिथी सोहळयाच्या निमित्ताने बुधवारी दि.११ मार्च रोजी पुण्यतिथीच्या मुख्य दिवशी सकाळी वेदमंत्राच्या जयघोषात भगवान दत्तात्रय व श्री समर्थ सदगुरू किसनगिरीजी बाबांच्या मूर्तीस देवगड दत्त पिठाचे प्रमुख महंत राष्ट्रसंत श्री भास्करगिरीजी महाराज व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या हस्ते अभिषेक घालण्यात आला.





पुण्यतिथी सोहळयाच्या निमित्ताने किसनगिरी विजय ग्रंथाचे पारायण होऊन ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायणाचा शुभारंभ करण्यात आला.यानिमित्ताने यज्ञ मंडपात तीन दिवशीय महाविष्णू याग करजगाव येथील सेवेकरी उमाकांत कंक व सौ.जयश्रीताई कंक या दाम्पत्याच्या हस्ते करण्यात आले.झालेल्या विविध धार्मिक कार्यक्रमाचे पौरोहित्य वेदशास्त्र संपन्न भेंडा येथील पुरोहित गणेशदेवा कुलकर्णी,हेमंतदेवा कुलकर्णी, योगेशगुरू कस्तुरे,केदार जोशी,शरदगुरू काटकर, कांतागुरू जोशी,राम काटकर यांच्यासह ब्रम्हवृंद मंडळींनी केले.

> भू लोकीचा स्वर्ग अशी ओळख असलेल्या देवगड येथे श्री समर्थ सदगुरू किसनगिरीजी बाबांच्या पुण्यतिथी सोहळयाच्या निमित्ताने शेकडो दिंड्यांनी येथे हजेरी लावल्याने देवगड परिसराला यात्रेचे स्वरूप आले होते. सर्व भक्त परिवाराने गावागावातून दिंड्या आणल्याने श्री समर्थ सदगुरु किसनगिरीजी बाबांच्या भक्त परिवाराच्या भक्तीचे मोठे दर्शन घडले.

पुण्यतिथी सोहळयाचे औचित्य साधून महंत कैलासगिरी महाराज, महंत सुनीलगिरी महाराज, महंत रमेशानंदगिरी महाराज, महंत ऋषिनाथ महाराज, महंत गोपालानंदगिरीजी महाराज, महंत बाळकृष्ण महाराज दिघे, महंत दादा महाराज वायसळ, मुळा एज्युकेशन संस्थेचे उपाध्यक्ष उदयन गडाख माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांनी देवगड येथे भेट देऊन भगवान दत्तात्रय व किसनगिरी बाबांच्या समाधीचे दर्शन घेतले.

देवगड येथे पुण्यतिथी सोहळयाच्या निमित्ताने सकाळ पासून ते सायंकाळी उशिरापर्यंत अनेक गावातील दिंड्यांनी ओम नमो सदगुरू जय जय किसनगिरी बाबाअसा जयघोष करत मंदिर प्रांगणात हजेरी लावली. मराठवाडयातील संभाजीनगर, गंगापूर, पैठण, अहिल्यानगर जिल्ह्यातील नेवासा व श्रीरामपूर, राहुरी तालुक्यातील विविध भागातून दिंड्या मोठ्या प्रमाणात आल्या होत्या. दुपारच्या सत्रात हजारो भाविकांच्या उपस्थितीत गुरुवर्य भास्करगिरी बाबा व स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या हस्ते श्री किसनगिरी बाबांच्या समाधी मंदिरात महाआरती करण्यात आली यावेळी उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

श्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबांच्या सहा दिवशीय पुण्यतिथी सोहळयाच्या निमित्ताने श्री क्षेत्र देवगड येथे महंत गुरुवर्य श्री भास्करगिरीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली व उत्तराधिकारी स्वामी प्रकाशानंदगिरी महाराज यांच्या नेतृत्वाखालीश्री समर्थ सदगुरू किसनगिरी बाबा यांच्या सहा दिवशीय पुण्यतिथी सोहळयामध्ये विविध दैनंदिन कार्यक्रम होणार आहे.

## शिवांकुर विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** राहुल तालुक्यातील कोंढवड येथील शिवांकुर विद्यालयात जागतिक महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या महिला दिनानिमित्त विद्यालयात आरोग्य विषयी शिवांकुर फाउंडेशनच्या डॉ गौरी पवार यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले होते. महिलांनी दैनंदिन जीवनात आरोग्याची काळजी कशी घ्यायची याविषयी डॉ गौरी पवार यांनी मार्गदर्शन केले. तसेच महिलांमध्ये कॅन्सर या आजाराबद्दल असणारी भीती दूर करण्यासाठी आणि योग्य उपचार वेळेवर होण्यासाठी



महिलांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी सर्व महिलांचा विद्यालयात गुलाब पुष्प देऊन सन्मान करण्यात आला तसेच या महिलादिनानिमित्त विद्यालयात विविध मनोरंजन खेळ घेण्यात आले यामध्ये संगीत खुर्ची, पेपर रेस, तळ्यात मळ्यात या खेळांचा समावेश होता. सर्व महिलांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

विद्यालयाच्या वतीने खेळातील विजयी महिलांना बक्षीस वितरण करण्यात आले.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी हापसे तर आभार शितल फाटक यांनी केले. कार्यक्रमासाठी संस्थेचे अध्यक्ष रावसाहेब पवार, विश्वस्त डॉ गौरी पवार व मंगलताई पवार यांनी मार्गदर्शन केले.कार्यक्रमास शिवांकुर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका छाया जाधव, पर्यवेक्षक अरुण खिलारी, किरण तारडे, सचिन जाधव, भाऊसाहेब करपे, विजय शिंदे, मयूर धुमाळ, सौरभ भांबळ, प्रियंका पांढरे, ज्योती शेळके, शितल फाटक, सुजाता तारडे, सुनीता ढोकणे, अनिता म्हसे, मोहिनी पेरणे, रोहिणी हापसे, सुरेखा मकासरे, सोनाली कुमावत, अनिता लांबे, दुर्गा बारवेकर, अकौंटंट दिपाली उंडे व लिपिक भाग्यश्री झांबरे, शिपाई शारदा तमनर आदींसह बहुसंख्य पालक व ग्रामस्थ उपस्थित होते.

## वडाळा महादेव येथील विद्युत पुरवठा सुरळीत करण्याची मागणी

**श्रीरामपूर :** तालुक्यातील वडाळा महादेव परिसरात वारंवार विजेचा पुरवठा खंडित होत असल्याने शेतकरी वर्गात तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. विशेषतः रात्रीच्या वेळीच विद्युत पुरवठा सुरू होत असल्याने शेतकऱ्यांना अडचणींना सामोरे जावे लागत आहे. याकडे संबंधित विभागाने तातडीने लक्ष देऊन विद्युत पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते रावसाहेब कसार यांनी केली आहे. सध्या गहू व उसाच्या पिकांना पाणी देण्याचा हंगाम सुरू असल्याने शेतकऱ्यांना रात्री अपरात्री शेतात जावे लागते. त्यातच परिसरात बिबट्याचा वावर वाढल्याने भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. अंधाराचा फायदा घेत एका कुटुंबाच्या तीन शेळ्यांवर बिबट्याने हल्ला करून त्यांना फस्त केल्याची घटना घडली आहे. याबाबत वन विभागाला माहिती देण्यात आली असून बिबट्याला पकडण्यासाठी पिंजरा लावावा, तसेच विद्युत पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी रावसाहेब कसार, दिलीप गायकवाड, किशोर गायकवाड, बाळासाहेब गायकवाड, गणेश काळे, मेजर राजेंद्र कसार आदी शेतकऱ्यांनी केली आहे.

## जागतिक महिला दिनानिमित्त महिला शिक्षिकांचा सन्मान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**झरेकाठी :** जागतिक महिला दिन व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्त रयत शिक्षण संस्थेच्या रयत शैक्षणिक संकुल, सात्रळ (ता. राहुरी, जि. अहिल्यानगर) येथे आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अहिल्यानगर जिल्ह्याच्या वतीने उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिला शिक्षिकांचा सन्मान करण्यात आला.

या प्रसंगी अश्विनी जाधव, सलमा पठाण, रचना फुलारी, पुनम भालेराव, विद्या गोडगे व सीमा नवले यांना स्मृतिचिन्ह व पुस्तके देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हाध्यक्ष अरुण कडू पाटील यांच्या पत्नी सौ. शोभाताई अरुण कडू पाटील होत्या, तर प्रमुख अतिथी म्हणून जिल्हा कार्याध्यक्ष मधुकर अनाप उपस्थित होते.

नियमित अध्यापनाबरोबरच शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शन, गुरुकुल विभाग, नीट व सीईटी परीक्षा मार्गदर्शन तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता (ख) विषयातील कार्याबद्दल शिक्षिकांचा गौरव करण्यात आला. महिलांनी अंधश्रद्धा व अनिष्ट रूढी-परंपरांविरुद्ध समाजात प्रबोधन करण्यासाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन मधुकर अनाप यांनी केले.यावेळी विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त करत सांस्कृतिक कार्यक्रमातून महिला सक्षमीकरणाचा संदेश दिला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सोहोनी व पठाण यांनी केले, तर आभार अश्विनी जाधव यांनी मानले.

## दिपाली फरगडे यांना आठवा 'आदर्श सरपंच' पुरस्कार

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** संगमनेर येथील पी.आर.के. प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय गुणगौरव सोहळा२०२६ मध्ये श्रीरामपूर तालुक्यातील भैरवनाथनगर ग्रामपंचायतीच्या लोकनियुक्त बिनविरोध सरपंच तथा सरपंच सेवा संघाच्या महिला जिल्हाध्यक्ष दिपालीताई प्रविण फरगडे यांना 'आदर्श सरपंच' पुरस्कार प्रदान करण्यात आला. मा. नगराध्यक्ष दुर्गाताई तांबे व शिक्षक नेते हिरालाल पगडाल यांच्या हस्ते त्यांना हा सन्मान देण्यात आला.




महाराष्ट्रभरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा गौरव या सोहळ्यात करण्यात आला. गावाच्या सर्वांगीण विकासासाठी केलेल्या कामाची दखल घेऊन फरगडे यांना हा पुरस्कार देण्यात आला. यापूर्वी त्यांना सात वेळा आदर्श सरपंच पुरस्कार मिळाले असून हा त्यांचा आठवा पुरस्कार ठरला आहे.या प्रसंगी ग्रामपंचायत सदस्य पांडुरंग लबडे, कांता शेळके, बेबी फरगडे, वैशाली फरगडे, सुजाता फरगडे, ऋत्वी नरोडे, प्रविण फरगडे, बाळासाहेब गायकवाड, सुभाष शेळके, बाळासाहेब दिघे, श्रीराम फरगडे, प्रमोद फरगडे, आण्णासाहेब फरगडे, प्रदीप नरोडे, यश फरगडे, पार्थ आहेर आदींसह ग्रामस्थ उपस्थित होते.

## विद्यार्थिनींचे लाठी-काठी व कराटेचे दमदार प्रात्यक्षिक

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वडाळा महादेव :** श्रीरामपूर तालुक्यातील वडाळा महादेव येथील श्री श्री रविशंकर विद्या मंदिर शाळेच्या विद्यार्थिनींनी श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती तसेच जागतिक महिला दिनानिमित्त विविध गावांमध्ये लाठी-काठी व कराटेचे दमदार प्रात्यक्षिक सादर केले.

श्री क्षेत्र सराला बेट, कारेगाव, खोकर, भोकर, टाकळीभान, नाऊर, सावखेड, गंगारामपूर, माळेवाडी, माळवडगाव आणि खानापूर या गावांमध्ये विद्यार्थिनींनी शिवकालीन मर्दानी खेळांचे आकर्षक सादरीकरण केले. विद्यार्थिनींचे धाडसी व कौशल्यपूर्ण प्रात्यक्षिक पाहून




ग्रामस्थ मंत्रमुग्ध झाले. या खेळांमधून महिला व मुलींना स्वसंरक्षणासाठी मर्दानी खेळांचे प्रशिक्षण किती महत्त्वाचे आहे, याची जाणीव उपस्थितांना झाली. महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा हा उपक्रम ग्रामस्थांकडून कौतुकास्पद ठरला.

सराला बेटचे मठाधिपती महंत रामगिरी महाराज यांच्या आशीर्वादाने येथेही विद्यार्थिनींनी उत्कृष्ट प्रात्यक्षिक सादर केले. यावेळी संस्थापक अध्यक्ष संदीप कसार यांनी आर्ट ऑफ लिव्हिंग संस्था व शाळेमार्फत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती दिली.

मुख्याध्यापिका भाग्यश्री आघाडे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रीडा शिक्षक राहुल विसपुते तसेच सुचित्रा पुजारी, संकेत फोपसे, सारिका कोते व अर्चना बोऱ्हाडे यांनी उपक्रमासाठी परिश्रम घेतले.

## जाहिर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः मौजे शिरसगाव परिसरातील लोकांना कळविण्यात येते की, डि.अहिल्यानगर व सब डि.तालुका श्रीरामपूर पैकी मौजे शिरसगाव येथील तसेच ग्रामपंचायत हद्दीतील बीनशेती प्लॉट मिळकत यांसी गट नंबर १२६/३/२/७७ यांसी क्षेत्र १९४.७० आर.चौ.मीटर यांसी आकार १९ रु. ९४ पैसे यांसी चतुःसिमा रेकॉर्ड ऑफ राईटप्रमाणे सदर मिळकत सौरभ बापुसाहेब कोकणे यांचे मालकीची असून त्यांनी आमचे अशिल इरशान हुसेन पठाण, रा.अँग्लो उर्दू हायस्कूल समोर वॉर्ड नं.२, श्रीरामपूर, ता.श्रीरामपूर, जि.अ.नगर यांना कायम खरेदी देण्याचे ठरविलेले आहे. सदरची मिळकत ही निजोखमी, बिनबोजाची व निर्वेध असून त्यांना सदर मिळकत विकण्याचा हक्क व अधिकार आहे. सदरच्या मिळकतीवर कोणाचाही कोणताही बोजा नाही. तसा भरवसा त्यांनी आमचे अशिलांस दिलेला आहे. सदर मिळकती संदर्भात आमचे अशिल आणि सौरभ बापुसाहेब कोकणे यांचे दरम्यान व्यवहार ठरलेला आहे. सदरच्या मिळकतीत कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क, ताबा, कर्ज, गहाण, दान, बक्षीस, हिस्सा, लिज, इजमेंट, साठेखत, करारनामा, जडजोखमीत दिलेले अन्न, वस्त्र करारात, कोर्टातील व कोर्टा बाहेरील वाद वगैरे कसल्याही प्रकारचा हक्क अधिकार संबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसाचे आत आम्हास लेखी कागदपत्र पुराव्यानिशी कळवावे व आमची खात्री करून द्यावी. वरील मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची लेखी तक्रार अगर हरकत न आल्यास सदर मिळकत ही निजोखमी, निर्वेध आहे असे समजून व ज्यांचे कोणाचेही कसलेही हक्क हितसंबंध असल्यास त्यांनी ते जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचे व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर कोणाचीही कसल्याची प्रकारची हरकत, तक्रार चालणार नाही तसेच ती आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही. तरी सदर व्यवहाराबाबत कुणालाही काही हिल्ला, हरकत करावयाची असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसाचे आत आपली पुराव्यानिशी हरकत नोंदवावी अन्यथा सदरचा व्यवहार हा कायदेशीर रितीने पूर्ण केला जाईल व त्यानंतर कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार ऐकूण घेतली जाणार नाही. करिता ही जाहीर नोटीस प्रसिद्ध केली असे याची नोंद घेण्यात यावी.

दि.१०/०३/२०२६

**ॲड.आर.एन.शर्मा**
५१, मिनी स्टेडियम, नवीन कोर्टाजवळ, श्रीरामपूर, जि.अहमदनगर
मो.९९७५३२४५२१

## जाहिर प्रगटन

क्रमांक/कावि/दंडव्य/हस्ते/२०२६
श्रीरामपूर दिनांक ०५/०३/२०२६

याअर्थी श्री/श्रीम.मंगेश आनंता बोर्डे रा.देसवंडी, ता.राहुरी, जि.अहिल्यानगर यांचे कडील दिनांक २६/११/२०२५ रोजीचा अर्ज प्राप्त झालेला आहे. सदर अर्जदार यांनी आपल्या अर्जामध्ये नमुद केले आहे की अर्जदार यांचे पनजी नामे कै.सुमन जयवंत बोर्डे हे राहाते घरी मौजे बेलापुर बु. ता. श्रीरामपुर येथे दिनांक १८/०५/१९५८ रोजी मयत झालेला आहे. सदर अर्जदाराचे वडील यांची मृत्युची नोंद त्यांना जन्म मृत्यु कार्यालयात मिळून आलेली नाही, त्यामुळे त्यांनी त्याचे वडीलांचे मृत्युची नोंद सरकारी दप्तरी लावायची आहे.

उपरोक्त या जाहीर प्रगटना व्दारे तमाम जनतेला सुचित करण्यात येते की. वरील मृत्युचे दाखल्याबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांसह आक्षेप लेखी स्वरूपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित मृत्युचा दाखला निर्गमित करण्यात येईल. स्वाक्षरीत

**तहसिलदार**
**श्रीरामपूर करीता**

## अवैध गॅस रिफिलिंग अड्ड्यांवर 'सर्जिकल स्ट्राईक'

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर :** शहराच्या मध्यवर्ती बाजारतळ परिसरात घरगुती गॅस सिलिंडरमधून व्यावसायिक टाक्यांमध्ये अवैधपणे गॅस भरणाऱ्या अड्ड्यावर जिल्हा पुरवठा विभागाने मंगळवारी धाडसी कारवाई केली. या छाप्यात ८७,४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, संशयित आरोपी शोएब दादामिया शेख याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे.

संगमनेर रोडनजीक एका गाळ्यात अवैध रिफिलिंग सुरू असल्याची गोपनीय माहिती जिल्हा पुरवठा अधिकाऱ्यांना मिळाली होती. त्यानुसार



मंगळवारी (दि.१०) दुपारी १२च्या सुमारास पथकाने अचानक छापा टाकला.

यावेळी आरोपी रंगेहाथ पकडला गेला. पथकाने घटनास्थळावरून बी.पी. एल., एच.पी. आणि भारत गॅस कंपन्यांच्या टाक्या, दोन रिफिलिंग मशिन, इलेक्ट्रिक मोटार, नोझल पाईप आणि दोन इलेक्ट्रॉनिक वजन काटे जप्त केले.जिल्हा पुरवठा अधिकारी हेमा बडे यांच्या आदेशानुसार अन्नधान्य वितरण अधिकारी सपना भोवते, निरीक्षण अधिकारी शिवराज पवार, सुदर्शन केदार, राजेंद्र शिंदे, सुहास पुजारी व पोलीस कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली. पुरवठा निरीक्षक अधिकारी राजेंद्र शिंदे यांच्या फिर्यादीवरून भारतीय न्याय संहिता व अत्यावश्यक वस्तू अधिनियमान्वये गुन्हा नोंदवण्यात आला आहे. याकामी महसूल सहायक योगेश खंडागळे व रुपाली शिंदे यांनी सहकार्य केले.दाट लोकवस्तीत सुरू असलेल्या या धोकादायक व्यवसायावर झालेल्या कारवाईमुळे अवैध धंदेवाल्यांचे धाबे दणाणले आहेत.

> निवासी भागात अवैध गॅस रिफिलिंग करून नागरिकांच्या जिवाशी खेळणाऱ्यांची आता खैर नाही. आमचे विशेष पथक अशा छुप्या अड्ड्यांचा शोध घेत असून, आढळल्यास थेट फौजदारी गुन्हे दाखल केले जातील. सार्वजनिक सुरक्षेला धोका निर्माण करणाऱ्यांनी हा इशारा गांभीर्याने घ्यावा, अन्यथा कठोर कारवाईला सामोरे जावे लागेल.
> **- राजेंद्र शिंदे (पुरवठा निरीक्षक, श्रीरामपूर)**

## जाहिर प्रगटन

क्रमांक/कावि/दंडव्य/हस्ते/२०२६
श्रीरामपूर दिनांक ०५/०३/२०२६

ज्याअर्थी श्री./श्रीम. मंगेश आनंता बोर्डे, रा.देसवंडी,ता.राहुरी, जि.अहिल्यानगर यांचेकडील दिनांक २६/११/२०२५ रोजीचा अर्ज प्राप्त झालेला आहे. सदर अर्जदार यांनी आपल्या अर्जामध्ये नमूद केले आहे की, अर्जदार यांचे आजोबा नामे कै. राफायल जयवंत बोर्डे हे राहते घरी मौजे बेलापूर बु., ता.श्रीरामपूर येथे दिनांक ०५/०६/१९७४ रोजी मयत झालेले आहे. सदर अर्जदाराचे वडील यांची मृत्यूची नोंद त्यांना जन्म मृत्यू कार्यालयात मिळून आलेली नाही. त्यामुळे त्यांनी त्यांचे वडिलांचे मृत्यूची नोंद सरकारी दप्तरी लावायची आहे. उपरोक्त या जाहीर प्रगटनाद्वारे तमाम जनतेला सूचित करण्यात येते की, वरील मृत्यूची दाखल्याबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रासह आक्षेप लेखी स्वरुपात या जहीर प्रगटनाच्या तारखेपासून १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबंधित मृत्यूचा दाखला निर्गमित करण्यात येईल.

स्वाक्षरीत.

**तहसिलदार**
**श्रीरामपूर करिता**

## जाहिर प्रगटन

तहसिल कार्यालय नेवासा
क्रमांकः/जन्म-मृत्यु/एसआर/१०४/२०२५
नेवासा दिनांक. ०६/०२/२०२६

अर्जदार श्री/श्रीम-सतिष दत्तात्रय माळी रा. गोंडेगाव ता. नेवासा यांनी तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी नेवासा यांचे कार्यालयास अर्ज सादर करुन अर्जदार यांनी कै. संगीता दत्तात्रय माळी यांचा महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म - मृत्यु रजिस्टरला न झाल्याने सदरची नोंद होणेकामी योग्य तो आदेश देणेत यावा याकामी इकडेस अपिल दाखल केले आहे. सदरच्या अर्जात खालील प्रमाणे मृत्यु नोंद होणे बाबत नमुद केलेले आहे.

अ.क्र.-१, जन्म - मृत्यु नोंद घेण्यात येणाऱ्या व्यक्तीचे नाव-कै. संगीता दत्तात्रय माळी, गावाचे नाव-गोंडेगाव, मृत्यु दिनांक- १४/०७/२००४

करिता या जाहिर प्रगटनादवारे सुचित करण्यात येते की, वरील व्यक्तीचे महाराष्ट्र जन्म मृत्यु नोंदणी कायदा १९६९ चे कलम १३(३) अन्वये मृत्यु नोंद गावी जन्म-मृत्यु रजिस्टरला घेणेबाबत कोणाचे आक्षेप असल्यास आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रतीसह आक्षेप लेखी स्वरुपात या जाहीर प्रगटनाच्या तारखेपासुन १५ दिवसाचे आत सादर करावा. मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास संबधित निबंधकास जन्म मृत्यु नोंदणी पुस्तकामध्ये नोंद करणेबाबत आदेशीत करण्यात येईल.

**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी नेवासा**

## पान १ वरुन

### २०४७ पर्यंत महाराष्ट्राची अर्थव्यवस्था पाच ट्रिलियन

राजकोषीय तूट तीन टक्केच्या आत असली पाहिजे. ती आपली २.७८ टक्के आणि महसुली तूट १ टक्केच्या आत म्हणजे प्रमाणातच आहे असेही मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले. अहिल्यादेवी होळकर यांचा अहिल्यामाता असा गौरवपर उल्लेख करताना सहासष्ट वर्षे सत्तेवर असणाऱ्यांना अहमदनगर जिल्ह्याचे नाव अहिल्यानगर करता आले नाही अशी कोपरखळीही त्यांनी दिली.

ते म्हणाले, उर्जा क्षेत्रात राबविलेल्या धोरणांमुळे यापुढे प्रतिवर्षी १.२ टक्के वीज दर कमी होतील. २०३० साली राज्याची वीज निर्मिती क्षमता ८२ हजार मेगावॅट होईल. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर ५५ पुरस्कार राज्याला प्राप्त झाले. राज्याने आतापर्यंत ५७ लाख हेक्टर सिंचन क्षमता प्राप्त केली आहे. नदीजोड प्रकल्पांवरही वेगाने काम होत आहे. उल्हास खो-यातील पाणी मराठवाड्यात पोहचविण्यात येईल. दमणगंगा-पिंजाळ प्रकल्पाचे काम अंतिम टप्प्यात आहे. वैनगंगा प्रकल्पाचे लक्ष्य ६३ टीएमसी आहे. टेन्डर प्रक्रिया पूर्ण झाली आहे. गार्गाई प्रकल्पातून मुंबईलाही पाणी मि ळणार आहे अशी माहितीही त्यांनी यावेळी दिली.

### हरीश राणाला इच्छामृत्यूची 'सर्वोच्च' परवानगी

आपल्या वेदना व्यक्त केल्या होत्या. त्यानुसार हे प्रकरण सुप्रीम कोर्टात दाखल झाले. अन् आईनेच स्वतः मुलासाठी इच्छामरणाची मागणी केली.

न्यायमूर्ती जे.बी. पारदीवाला आणि न्यायमूर्ती के.व्ही. विश्वनाथन यांच्या खंडपीठाने संवेदनशील निकाल देत हरीश राणाला इच्छामृत्यूची परवानगी देण्यात आली.

मात्र याआधी न्यायालयाने एम्स रुग्णालयाला हरीशचे लाईफ सपोर्ट सिस्टम (व्हेंटिलेटर, फीडिंग ट्यूब) टप्प्याटप्प्याने हटवण्यात यावे. ही प्रक्रिया पूर्ण करताना रुग्णाची 'मानवी प्रतिष्ठा राखली जाईल याची काळजी घ्यावी. हरीशला पॅलिएटिव्ह केअर सेंटरमध्ये हलवून नैसर्गिक मृत्यूच्या प्रक्रियेला सहकार्य करण्याचे निर्देश दिले आहेत.

भारतात ऍक्टिव्ह यूथेनेशिया (इंजेक्शन देऊन मारणे) बेकायदेशीर आहे. मात्र, २०१८ मध्ये सुप्रीम कोर्टाने पॅसिव्ह यूथेनेशियाला कायदेशीर मान्यता दिली होती. याचा अर्थ असा की, जर एखादा रुग्ण लाइलाज आजाराने ग्रस्त असेल आणि केवळ उपकरणांच्या आधारे जिवंत असेल, तर त्याचे उपचार थांबवले जातात, जेणेकरून त्याला नैसर्गिक आणि सन्मानपूर्वक मृत्यू मिळावा. संविधानाच्या कलम २१ नुसार, सन्मानाने जगण्यासोबतच सन्मानाने मरण्याचा अधिकारही देण्यात आला आहे.

### शेतीपूरक व्यवसायांसाठी म हिलांना विशेष अनुदान देणार

एम. एस. स्वामीनाथन रिसर्च फाऊंडेशनच्या नित्या राव यांनी हवामान बदल आणि पुरुषांचे शहराकडे स्थलांतर यामुळे ग्रामीण अर्थव्यवस्था महिलांवर अवलंबून असल्याचे सांगितले. सिंचन आणि भूजल कायद्यात सुधारणा करून महिलांना पाण्याचे कायदेशीर अधिकार मिळावेत. महिला शेतकरी उत्पादक कंपन्यांसाठी कोल्ड स्टोरेज, सोलर ड्रायर आणि आधुनिक यंत्रसामग्रीसाठी विशेष 'कृषी विकास निधी' स्थापन करावा, अशी मागणी केली. जमिनीची म ालकी नसली तरी शेतात काम करणाऱ्या महिलांना 'महिला शेतकरी प्रमाणपत्र' द्यावे, जेणेकरून योजनांचा लाभ मिळेल. डॉ. स्वामीनाथन यांनी २०११ मध्ये राज्यसभेत मांडलेल्या 'महिला शेतकरी अधिकार विधेयक'ची अंमलबजावणी झाल्यास उत्पन्न आणि उत्पादकतेत मोठी वाढ होईल.

कार्यक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या महिला शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक महिला व बालकांचे हक्क आणि कल्याण समिती प्रमुख मोनिका काजळे यांनी केले. सूत्रसंचालन निलेश मदाने यांनी केले. उपस्थित मंत्री, आमदार आणि अधिकारी यांनी महिलांच्या शेतीतील योगदानाला सन्मान देण्याचे आश्वासन दिले. या चर्चेमुळे महिला शेतकऱ्यांना कायदेशीर हक्क, तंत्रज्ञान आणि आर्थिक पाठबळ मिळण्याची आशा वाढली आहे.

### श्रीरामपूरची ४००० एकर जमीन शेल कंपनीला देऊ नका

जिमी ओल्सन आणि सुनील कलापुरे हे संचालक आहेत. हे दोघेही महाराष्ट्रातील एका मंत्र्यांच्या संबंधित संस्थांमध्ये महत्वाच्या पदांवर कार्यरत आहेत, ज्यामुळे या जमिनीच्या हस्तांतरणात राजकीय हितसंबंध असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला.

या कंपनीच्या ताळेबंदात मोठी विसंगती आहे. २०२४ मध्ये अवघ्या दीड कोटींच्या आसपास विक्री दाखवणारी ही कंपनी कुठलाही ठोस व्यवसाय नसताना ३० कोटींचा नफा दाखवते. तसेच, २०२५ म ध्ये अचानक १०० कोटींची भांडवली वाढ दाखवणे हा आर्थिक गैरव्यवहार आहे

अस वडेट्टीवार म्हणाले.

यावर उत्तर देताना महसूल मंत्री म्हणाले की या जमिनीच्या बाबत निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीमध्ये होईल. ही

जमीन कोणत्याही चुकीचे पद्धतीने विकण्यात येणार नाही. या प्रकरणी बैठक लावण्याचे आश्वासन महसूल

मंत्र्यांनी दिले.

### माजी मंत्री तनपुरे यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चांना उधाण

राजकीय वर्तुळात चर्चा अधिकच रंगत आहे. सोशल मीडियावर फिरत असलेल्या एका चित्रफितीत प्राजक्त तनपुरे हे अक्षय कर्डिले यांना आमदार होण्यासाठी शुभेच्छा देताना दिसतात. त्याचवेळी आमचे १० आमदारही सरकारमध्ये जाऊ शकतात, त्यामुळे सरकार आपलेच आहे. सरकारला २५० आमदारांचा पाठिंबा आहे, अशी फटकेबाजीही त्यांनी केली. या वक्तव्यामुळे शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सरकारमध्ये सहभागी होण्याबाबतही चर्चांना उधाण आले आहे.

या सर्व घडामोडींमध्ये अक्षय कर्डिले यांनी मुंबईत जाऊन भाजपच्या वरिष्ठ नेत्यांच्या भेटी घेतल्याची माहिती मिळत आहे. पक्षाच्या उम ेदवारीसंदर्भात आणि तनपुरे यांच्या संभाव्य प्रवेशाच्या पार्श्वभूमीवर त्यांनी चर्चा केल्याचे सांगितले जात आहे.

दरम्यान, प्राजक्त तनपुरे यांच्या भाजप प्रवेशाच्या चर्चांमुळे स्थानिक भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांमध्ये नाराजीचे वातावरण असल्याचे समोर आले आहे. दिवंगत आमदार शिवाजीराव कर्डिले यांचा सन्मान राखत राहुरी पोटनिवडणुकीत अक्षय कर्डिले यांनाच उमेदवारी द्यावी, अशी मागणी स्थानिक पदाधिकाऱ्यांनी केली आहे. अन्यथा सामूहिक राजीनामे देण्याचा इशाराही काही पदाधिकाऱ्यांनी दिला आहे.

### 'नरेंदर-सरेंडर'चा नारा देत लोकसभेत विरोधकांचा हल्लाबोल

गोगोई म्हणाले की, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांना अर्थसंकल्पीय अधिवेशनादरम्यान २० वेळा व्यत्यय आणण्यात आला आणि त्यांना वारंवार सत्तापालट पुस्तक दाखवण्यात आले. विरोधी पक्षनेते असा दावा करतात की सभापती सरकारच्या दबावाखाली काम करत आहेत.

# मुळा प्रवरा संस्थेच्या कामगारांना न्याय द्या; परवाना पुन्हा देण्याची मागणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**सोनगाव :** मुळा प्रवरा संस्था पुन्हा सुरू करून कामगारांना न्याय मिळावा तसेच संस्थेचा परवाना पुन्हा देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली. कामगारांच्या समस्या ऐकून आमदार डॉ. रामदास आठवले यांनी सकारात्मक प्रतिसाद देत या प्रश्नावर मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री तसेच संबंधित प्रशासकीय अधिकाऱ्यांशी चर्चा करून पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.



१९९७-९८ च्या काळात युती सरकारच्या कार्यकाळात तत्कालीन ऊर्जा मंत्री स्व. गोपीनाथ मुंडे आणि ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी मुळा प्रवरा संस्थेला मदत करून परवाना वाढवून दिला होता. त्याच धर्तीवर सध्याच्या महायुती सरकारनेही गरिब व कामगारांच्या हितासाठी पुढाकार घ्यावा, अशी मागणी या बैठकीत करण्यात आली. चर्चेदरम्यान अहमदनगर जिल्ह्यातील पँथर चळवळ आणि जुन्या आठवणींनाही उजाळा देण्यात आला.

मुळा प्रवरा संस्था ही एकेकाळी आशिया खंडातील ग्रामीण भागाला वीजपुरवठा करणारी अग्रगण्य संस्था होती. मात्र तांत्रिक कारणांमुळे आणि परवाना रद्द झाल्यामुळे ही संस्था सध्या बंद अवस्थेत आहे. त्यामुळे या संस्थेवर अवलंबून असलेले शेकडो कामगार बेरोजगार झाले असून त्यांचे सात महिन्यांचे पगार व इतर शिल्लक रक्कम अद्याप मिळालेली नाही.

यावेळी शरदराव बनसोडे यांनी आमदार डॉ. रामदास आठवले यांचे लक्ष वेधून सांगितले की, ही संस्था पुन्हा सुरू झाल्यास ग्रामीण भागातील जनतेला तात्काळ वीजपुरवठा मिळेल आणि कामगारांच्या उदरनिर्वाहाचा प्रश्नही सुटेल.

या प्रसंगी रिपब्लिकन पक्षाचे (आठवले गट) उपाध्यक्ष विजय वाकचौरे, जिल्हाध्यक्ष सुरेंद्र थोरात, युवा जिल्हाध्यक्ष प्रदीप बनसोडे, रिपब्लिकन नेते राजाभाऊ कापसे, भीमराव बागुल यांच्यासह अहमदनगर जिल्ह्यातील आरपीआयचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शरदराव बनसोडे यांनी सांगितले की, मुळा प्रवरा संस्थेचा परवाना पुन्हा मिळवण्यासाठी तसेच थकीत रक्कम माफ करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय सहकार मंत्री अमित शहा, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी पत्रव्यवहार करण्यात आला आहे. ही संस्था वाचवण्यासाठी केंद्र व राज्य सरकारने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली.

## निधन वार्ता

### मुरलीधर कडू



**सोनगाव :** राहुरी तालुक्यातील सात्रळ येथील जुन्या पिढीतील सामाजिक कार्यकर्ते व प्रगतशील शेतकरी सात्रळ ग्रुप नंबर दोन विविध कार्यकारी सोसायटी मा. संचालक मुरलीधर रभाजी कडू यांचे (वय ९२) वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात २ मुले, ४ मुली, सुना, नातु असा मोठा परिवार आहे. सात्रळ नं.२ सोसायटीचे विद्यमान संचालक आण्णासाहेब मुरलीधर कडू यांचे ते वडील होत.

### रंभाजी पर्वत



**सोनगाव :** राहाता तालुक्यातील हनुमंतगाव येथील प्रगतिशील शेतकरी रंभाजी बाबुराव पर्वत (वय ६१) यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, सहा बहिणी, दोन सुना, जावई, नातवंडे, भाचे, मेहुणे असा मोठा परिवार आहे. हनुमंतगाव सोसायटीचे ते माजी संचालक होते. तसेच प्रवरानगर येथील प्रवरा बँक लोणीचे असिस्टंट मॅनेजर राहुल पर्वत व अजय पर्वत तसेच माधुरी सुमित पुंड यांचे ते वडील होत.

## घरकुल देण्याचे आमीष दाखविणाऱ्याची नगरपरिषदेत तक्रार करा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** गंगापूर नगर परिषदेतर्फे शहरवासियांना कळविण्यात आले आहे की, प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत घरकुलाबाबत कोणतीही व्यक्ती फाईल करून देतो, मंजुरी मिळवून देतो किंवा घरकुलाचे हप्ते बँकेत जमा करून देतो, असे आमिष दाखवत असल्यास नागरिकांनी तत्काळ नगर परिषदेकडे तक्रार करावी. प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) ही सर्वांसाठी घरे या संकल्पनेवर आधारित असून या योजनेसाठी गंगापूर नगर परिषदेत शहरस्तरीय तांत्रिक कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

या कक्षामार्फत नागरिकांच्या घरकुलासंबंधित अडचणी व शंका दूर केल्याजातात. तसेच घरकुलाचे फोटो घेऊन शासनाकडे सादर करण्याची जबाबदारीही या कक्षाकडेच आहे.घरकुलासंदर्भात नागरिकांनी फक्त स्थापत्य अभियंता इजहार शेख (संपर्क : ८१७७९९९९५) यांच्याशीच संपर्क साधावा, असे आवाहन नगर परिषदेकडून करण्यात येत आहे. इतर कोणत्याही व्यक्तीकडून फसवणूक झाल्यास त्यास नगर परिषद कार्यालय जबाबदार राहणार नसल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी सतर्क राहून योग्य व्यक्तीशीच संपर्क साधावा, असे आवाहन गंगापूर नगर परिषदेचे मुख्याधिकारी संतोष आगळे यांनी केले आहे.

> प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) ही सर्वसामान्यांना स्वतःचे घर मिळावे या उद्देशाने राबविण्यात येत आहे. मात्र काही व्यक्ती नागरिकांना घरकुल मंजुरी मिळवून देतो किंवा हप्ते जमा करून देतो असे आमिष दाखवून फसवणूक करण्याचा प्रयत्न करीत असल्याच्या तक्रारी येत आहेत. त्यामुळे नागरिकांनी अशा व्यक्तींवर विश्वास ठेवू नये. घरकुलासंदर्भातील सर्व प्रक्रिया गंगापूर नगर परिषदेमार्फत अधिकृत पध्दतीनेच केली जाते. नागरिकांनी कोणतीही शंका असल्यास नगर परिषद कार्यालयाशी किंवा संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा,
>
> **संजय जाधव,**
> **नगराध्यक्ष गंगापुर**

## कृत्रिम बुद्धिमत्ता क्षेत्रात भविष्यात मोठ्या रोजगार संधी : डॉ. प्रमोद बिडे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहाता :** कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रवास १९५९ पासून सुरू झाला असून गेल्या काही दशकांमध्ये या तंत्रज्ञानाने मोठी झेप घेतली आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्तेची अनेक साधने आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनली आहेत. शिक्षण, आरोग्य, उद्योग, बँकिंग, कृषी आदी विविध क्षेत्रांमध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभाव दिसून येत आहे. त्यामुळे सामान्य माणसाचे जीवन अधिक सोपे आणि गतिमान झाले असे प्रतिपादन डॉ. प्रमोद बिडे यांनी केले.



शिर्डी साई रुरल इन्स्टिट्यूट संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, राहाता येथील संगणकशास्त्र विभाग आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने कृत्रिम बुद्धिमत्ता आणि यंत्र शिक्षण या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. या चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. प्रमोद बिडे बोलत होते. डॉ. बिडे म्हणाले की, तंत्रज्ञान आपल्या जीवनातून दूर ठेवणे शक्य नसले तरी त्याचा वापर योग्य तांत्रिक तत्त्वे आणि जबाबदारी लक्षात घेऊन करणे अत्यंत आवश्यक आहे. येत्या पाच वर्षांत बहुतांश क्षेत्रे क्लाऊड कम्प्युटिंग आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून अधिक विकसित होतील. परिणामी या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात रोजगार संधी निर्माण होतील.

## मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभिनय अंतर्गत दाखले वाटप

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहाता :** तालुक्यातील नपावाडी ग्रामपंचायतीने मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानांतर्गत विविध उपक्रम राबवले आहेत. या उपक्रमाचा फायदा नपावाडी येथील ग्रामस्थ घेत असल्याचे दिसून येत आहे. ग्रामपंचायत अधिकारी एस व्ही कोतकर शासनाच्या विविध योजना ग्रामस्थांसमोर पोहोचवण्यासाठी कार्यतत्पर असतात. सरपंच पल्लवीताई इल्हे, उपसरपंच दिपक वहाडणे, ग्रामपंचायतचे सर्व सदस्य यांनी या उपक्रमांतर्गत गावाला फायदा व्हावा यासाठी पुढाकार घेतला आहे. तर राजेंद्र धनवटे, तंटामुक्त समितीचे अध्यक्ष दत्तात्रेय जाधव यांनी या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले आहे. नपावाडीत आपले सरकार सेवा केंद्र, नागरी सेवा सुविधा केंद्र अंतर्गत सर्व दाखले मिळण्याची सुविधा झाली आहे. या दाखल्यासाठी नागरिकांना तालुक्याच्या ठिकाणी जावे लागत होते. वेळ व पैसा देखील यामुळे वाया जात होता. आता सर्व दाखले गावातच मिळाल्याने नागरिकांमध्ये देखील समाधानाचे वातावरण झाले आहे. ए एस एस के केंद्राच्या ३० विभागाच्या ५९२ सेवा नागरिकांना उपलब्ध करून देण्याचे काम ए एस एस के केंद्र चालक संदीप बनकर अत्यंत प्रामाणिकपणाने ग्रामपंचायत नपावाडी अंतर्गत करतात. गावातील ग्रामसभा असो किंवा इतर कुठलाही सामाजिक कार्यक्रम असो या संदर्भात प्रचार प्रसिद्धी देऊन गावातील नागरिकांना जागृत करण्याचे काम या निमित्ताने केले जाते. राहता तालुक्यातील एक आदर्श ग्रामपंचायत म्हणून नपावाडीकडे पाहिले जात आहे.



## कर्मवीर काळे कारखान्यात ५५ वा राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह साजरा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी :** ५५ व्या राष्ट्रीय सुरक्षा सप्ताहाचे औचीत्य साधत गुरुवार (दि.०५) रोजी कोपरगाव तालुक्यातील कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखान्यात ५५ वा राष्ट्रीय सुरक्षा सप्ताह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कारखान्यातील कर्मचाऱ्यांमध्ये सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



शेतकऱ्यांचेहितजोपासणाऱ्या कर्मवीर शंकरराव काळे सहकारी साखर कारखाना व्यवस्थापनाकडून कारखाना व उद्योग समुहाचे मार्गदर्शक माजी आमदार अशोकराव काळे व कारखान्याचे चेअरमन आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्योग समुहाचे महत्वाचे घटक असणाऱ्या कारखाना कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेची योग्य प्रकारे काळजी घेतली जाते व त्याबाबत वेळोवेळी कर्मचाऱ्यांना योग्य मार्गदर्शनही केले जाते.

यावेळी कारखान्याचे चिफ इंजिनिअर कम फॅक्टरी मॅनेजर निवृत्ती गांगुर्डे यांनी कामगारांना सुरक्षिततेची शपथ दिली. यावेळी कारखान्याचे कार्यकारी संचालक सोमनाथ बोरनारे, जनरल मॅनेजर सुनिल कोल्हे, आसवनी विभागाचे जनरल मॅनेजर ज्ञानेश्वर आभाळे, प्रोडक्शन मॅनेजर सुर्यकांत ताकवणे, लेबर ऑफिसर दिपक निंबाळकर, सुरक्षा अधिकारी राजेंद्र धुमाळ व सेफ्टी ऑफिसर सुरेंद्र हापसे यांच्यासह उपखाते प्रमुख, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### नावात बदल

माझे शैक्षणिक कागदपत्रांवर व माझ्या विवाह पुर्वीचे नाव नगिना बेगम शेख तमिजउद्दिन असे असून माझे विवाह नंतर नाव बदलून नवीन नाव नगिना सय्यदलाल सय्यद असे झाले आहे, तरी नगिना बेगम शेख तमिजउद्दिन, व नगिना सय्यदलाल सय्यद या दोन्ही नावाची व्यक्ती ही मी एकच आहे.
करीता ॲफिडेविट क्र. २५५२२४२०६१२६ ८१००१८३९८७

### change of name

I'm jakira mustafa inamdar my old name was saiyyad jakerabegam majarali but currently after marriage my name is jakira mustafa inamdar address taklibhan tal-Shrirampur dist-ahilyanagar


## अफवांना बळी न पडता मुलींनी लस घेणे आवश्यक : खताळ

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर :** पोलिओपासून ते विविध आजारांवर मात करण्यासाठी लसीकरण अत्यंत आवश्यक आहे. एचपीव्ही ही लस यापूर्वी खाजगी स्तरावर उपलब्ध होती; मात्र महायुती सरकारने आता ही लस मुलींसाठी मोफत उपलब्ध करून दिली आहे. कुठल्याही अफवांना बळी न पडता मुलींनी एचपीव्हीचे लसीकरण करून घ्यावे, असे आवाहन आमदार अमोल खताळ यांच्या पत्नी नीलम खताळ यांनी केले.

संगमनेर तालुक्यातील तळेगाव दिघे येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये राज्यशासनाच्या वतीने सुरू केलेल्या मुलींसाठीच्या मोफत एच पी व्ही लसीकरणाचा शुभारंभ सौ नीलम खताळ यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी त्या आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. या कार्यक्रमास प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी डॉ.निलेश माने, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, उपसरपंच मयूर दिघे, माजी जिल्हा परिषद सदस्य बाळासाहेब दिघे, शिवाजी आहेर, नंदकुमार देशपांडे, राजेंद्र आहेर, उत्तम दिघे अमोल दिघे नवनाथ राऊत, कचरू वारूंक्षे, रवींद्र दिघे सुवर्णा दिघे, निखिल सानप आदीसह आरोग्य सेविका आणि आशा सेविका उपस्थित होत्या. सौ खताळ म्हणाल्या की, आजच्या मुलीच उद्याचे भविष्य आहेत. मुली व महिलांमध्ये कॅन्सरचे प्रमाण वाढत असल्याने त्यापासून संरक्षण मिळावे यासाठी एचपीव्ही लस महत्त्वाची आहे. काहीजण अफवा पसरवून सरकारला बदनाम करण्याचा प्रयत्न करत आहेत. त्या अफवांना बळी न पडता मुलींनी ही लस घेणे आवश्यक आहे. एचपीव्ही लसीसह इतरही लसीबाबत आशा सेविका व आरोग्य सेविकांनी प्रत्येक घराघरात जाऊन लसीकरणाचे महत्त्व महिलांना पटवून द्यावे. मुलींसाठीच नव्हे तर मुलांसाठी ही विविध आजारांपासून संरक्षण देणाऱ्या लसी उपलब्ध आहेत, आणि त्या लसीकरणाचा लाभ प्रत्येकाने घ्यावा. आशा सेविकांच्या काही अडचणी असल्यास त्यापण मला सांगाव्यात, आमदार अमोल खताळ यांच्या माध्यमातून त्या सोडविण्या साठी आपण प्रयत्न करू, असेही त्यांनी सांगितले.

> **वैद्यकीय अधिकारी अनुपस्थित;**
> **बदलीची मागणी....**
>
> तळेगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये एचपीव्ही लसीकरण मोहिमेचा शुभारंभ हा शासकीय कार्यक्रम असताना सुद्धा तळेगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. डामसे अनुपस्थित होते. उपस्थित कार्यकर्त्यांनी त्यांच्या विषयी नीलम खताळ यांच्या समोर तक्रारी केल्या. डॉ. डामसे हे कधीच प्राथमिक आरोग्य केंद्रात रुग्णांची तपासणी करण्यासाठी थांबत नाहीत. त्यामुळे त्यांची बदली करून या प्राथमिक आरोग्य केंद्रा साठी दुसरे वैद्यकीय अधिकारी द्यावे आणि त्यांच्या बदलीचा प्रस्ताव गटविकास अधिकाऱ्यांकडे पाठवावा, अशी सूचना त्यांनी प्रभारी तालुका आरोग्य अधिकाऱ्यांना केली.

> राज्य शासनाच्या वतीने मुलींसाठी मोफत एचपी व्ही लस देत आहे या लसीबाबत काही अफवा पसरवल्या जात आहेत. मुलींच्या आई वडिलांनी या कुठल्याही अफवांवर विश्वास न ठेवता सर्व मुलींनी लसीकरण करून घ्यावे.
>
> **डॉ निलेश माने,**
> **प्रभारी तालुका आरोग्य अधिकारी**




### नशिबाची परिक्षा

**गुरुवार दि . १२ मार्च २०२६**

**मिलनम डे**

| उदय-अस्त | | | सिंगल ५-१-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १४९<br>५९०<br>७७० | ४-८ | १२५<br>२६०<br>४४० | जोड<br>४१-०८-३९<br>२६-८५ |

**कल्याण**

| उदय-अस्त | | | सिंगल ९-४-५ मजबुत |
|---|---|---|---|
| १२०<br>३४६<br>६७० | ३-१ | १४६<br>१२८<br>१०० | जोड<br>३६-०१-२४-<br>९५-१७ |

**मुंबैम (मेन)**

| उदय-अस्त | | | सिंगल ४-७-९ मजबुत |
|---|---|---|---|
| १२३<br>१५०<br>११४ | ६-० | १९०<br>२८०<br>२४४ | जोड<br>६१-२०-४५-<br>७३-०८ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

# माळीवाडा वेस पाडावी; बैठकीत ठराव

## म.फुले व सावित्रीबाई फुले यांचे स्मारक भव्य दिव्य व्हावे-किशोर डागवाले

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** माळीवाडा येथील नियोजित महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य स्मारक व्हावे.ही सर्व समाजाची इच्छा आहे.या बैठकीला जिल्ह्यातील सर्व समाजाचे नेते उपस्थित आहेत.प्रशासनाने स्मारकाचे काम तातडीने सुरू करावे.स्मारकाचे काम भव्य दिव्य होण्यासाठी वेळ प्रसंगी माळीवाडा वेस पाडावी.असे प्रतिपादन सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले यांनी केले आहे.

अहिल्यानगरच्या वैभवात भर टाकणाऱ्या क्रांतीसूर्य महात्मा जोतिराव फुले आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या विचारांचे ऊर्जास्थान आपल्या शहरात उभे राहणार आहे.माळीवाडा (अहिल्यानगर) येथे या दोन्ही महापुरुषांचा भव्य पूर्णाकृती पुतळा आणि स्मारक उभारण्याच्या कामाला गती मिळावी आणि हे काम लवकरात लवकर सुरू व्हावे. यासाठी बंधन लॉंस येथे फुले दांपत्य स्मारक समितीच्या वतीने विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.या मागणीचे निवेदन महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांना देण्यात आले.याप्रसंगी उपमहापौर धनंजय जाधव,माजी उपमहापौर अनिल बोरुडे, सकल माळी समाजाचे अध्यक्ष किशोर डागवाले,उपाध्यक्ष बाळासाहेब भुजबळ,महात्मा फुले सावित्रीबाई फुले कृती समितीचे अध्यक्ष प्रा.माणिक



विधाते,नगरसेवक सुरेश बनसोडे,भगवान फुलसौंदर,दत्ता गाडळकर, संजय लोंढे, सुनील त्र्यंबके,नगरसेविका आशाताई डागवाले,गीतांजली काळे,शितल ढोणे,वर्षा सानप, सुजाता पडोळे,रूपाली दातरंगे, मंगल भुजबळ,शेंडी चे सरपंच प्रयागाताई लोंढे,रेणुका पुंड,मनोज ताठे,पद्मशाली समाजाचे नेते गणेश विद्ये,श्रीनिवास बौज्जा,महेंद्र बिज्जा,एडवोकेट राजेंद्र गाली,स्वकुळ साळी समाजाचे कृष्णा बागडे,कैकाडी समाजाचे अध्यक्ष विशाल माने,पारनेरचे ओबीसी नेते खंडु भुकन, राष्ट्रवादी ओबीसी चे अध्यक्ष दिपक खेडकर, अमित खामकर,बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष माऊली मामा गायकवाड,माळी महासंघाचे मनोज फुलसौंदर, गणेश धाडगे, मनोज भुजबळ, सोनार समाजाचे सोमनाथ चिंतामणी,अशोक फलके देवांग कोष्टी समाज, नाभिक समाजाचे अनिल निकम, सत्यशोधक समाजाचे ज्ञानदेव खराडे,म.फुले समता परिषदेचे अध्यक्ष ब्रीजेश ताठे, कैलास गाडिलकर, भरत गारुडकर,प्रसाद कोके,अजय ढोणे,राजेंद्र ताठे,राजेंद्र पडोळे,पंडित खरपुडे,सुरेश तात्या आंबेकर, अशोकराव आगरकर, अँड.अशोक गायकवाड, प्रा.सुनिल जाधव, सुनील राऊत,पोपट शिंदे,यशवंत गारदे,साहेबराव विधाते, रमेश चिपाडे,संजय ताजणे ,रामदास फुले, प्रकाश इवळे,अरुण गाडळकर, राजेंद्र झोडगे, अनिल धाडगे,बजरंग भुतारे,सुरेश कावळे, सुधीर पुंड,राजाराम चिपाडे,ज्ञानेश्वर रासकर,विनोद पुंड,अनिल इवळे,बजरंग भुतारे,अशोक आगरकर आदी उपस्थित होते.

सुरेश बनसोडे म्हणाले, महात्मा फुले व सावित्रीबाई फुले यांचे भव्य दिव्य स्मारक व्हावे. हे सर्व अहिल्या नगरकरांचे स्वप्न आहे.

स्मारक होण्यासाठी काही अडचणी आहेत वेळप्रसंगी आंदोलन करू व त्या मार्गी लावू.वेशीच्या आडून जे काही लोक राजकारण करीत आहेत त्यांना समाजकंटक व देशद्रोही म्हणून घोषित करावे.

यावेळी उपमहापौर धनंजय जाधव, प्रयागाताई लोंढे, गीतांजली काळे,सुजाता पडोळे, प्राध्यापक माणिक विधाते, पंडित खरपुडे ,अमोल भांबरकर,बजरंग भुतारे, गणेश विद्ये, कृष्णा बागडे, ज्ञानदेव खराडे, अमोल भांबरकर,पंडित खरपुडे,खंडु भुकन, ज्ञानेश्वर रासकर आदींनी मनोगत व्यक्त केले.

सूत्रसंचालन बाळासाहेब भुजबळ यांनी केले तर आभार राजेंद्र पडोळे यांनी मानले. या बैठकीला फुले दांपत्य स्मारक समिती व जिल्ह्यातील फुले प्रेमी व विविध समाजाचे नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

द•ख•ल

### साई नर्सरी प्री-स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन उत्साहात



**चिचोंडी पाटील :** येथील साई नर्सरी प्री-स्कूलचा वार्षिक स्नेहसंमेलन सोहळा उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाचे उद्घाटन गावचे सरपंच तथा प्रशासक शरद पवार यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी माजी सरपंच मच्छिंद खडके, लोकमान्य पतसंस्थेचे चेअरमन सुरेश ठोंबरे, ग्राम पंचायत सदस्य अशोक कोकाटे, ज्येष्ठ नागरिक संघाचे कल्याण पाटील जगताप, रामभाऊ ठोंबरे, रामचंद कोकाटे, पराजी कोकाटे, बाबासाहेब बेल्हेकर, अमोल ठोंबरे आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या प्रारंभी स्कूलच्या संचालिका भारती ठोंबरे यांनी प्रास्ताविक करून शाळेच्या उपक्रमांची माहिती दिली. त्यानंतर लहानग्या विद्यार्थ्यांनी आकर्षक नृत्य व गीत सादर करून उपस्थितांची मने जिंकली. कार्यक्रमाची सुरुवात वेलकम स्वॅग या नृत्याने झाली. विद्यार्थ्यांनी ओ माय फ्रेंड गणेशा, उधळ उधळ, मेड इन इंडिया, छोटी सी प्यारी सी नन्ही सी आयी कोई परी, हवा हवाई, आले मराठे, चला जेजुरीला जाऊ, काठी न घोंगड घेऊ द्या की रे आदी गाण्यांवर मनमोहक सादरीकरण केले. लहानग्यांच्या निरागस सादरीकरणाला उपस्थित पालक व ग्रामस्थांनी भरभरून दाद दिली. संजय ठोंबरे यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करून शेवटी आभार मानले.

### प्रा.स्वप्निल पवार यांचे भरीव यश



**लिंपणगाव :** प्रा स्वप्निल पवार हे श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात ज्युनिअर कॉलेज वाणिज्य विभागात अकौंट विषय शिकवतात, त्यांनी नियोजन बद्ध अभ्यास करून अनेक विषयांत पारंगतता मिळविली आहे., त्यांनी M.com,M. Economic, G.D.C. , तसेच या शैक्षणिक वर्षात D.T.L( Diploma in Taxation Law) ही पदवी उत्तीर्ण झाले आहेत. त्यामुळे संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे व अहमदनगर जिल्हा बँकेच्या संचालिका सौ अनुराधाताई नागवडे यांनी त्यांच्या या उतुंग यशस्वी कामगिरी मुळे त्यांचे अभिनंदन करून त्यांना शुभेच्छा दिल्या. महाविद्यालयाचे प्राचार्य. डॉ सतीश चंद्र सुर्यवंशी सर, उप प्राचार्य पर्यवेक्षक तसेच सहकारी प्राध्यापक यांनी पेढे भरवुन आनंद व्यक्त केला आहे. प्राध्यापक स्वप्निल पवार सर हे सहकारी संस्थांचे ऑडिट करू शकतात, टॅक्स रिटर्न भरणे,ऋडढ या सारखी कामे ते आपल्या सही शिक्क्यानिशी अधिकृत करू शकतात. या शिक्षणाचा फायदा नक्कीच त्यांना भविष्यात होणार आहे.या सुविधेचा लाभ नक्कीच श्रीगोंदा शहर आणि तालुक्यातील नागरिकांना तसेच करदात्यांना होणार आहे.

### सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतीदिनानिमित्त अभिवादन

**अहिल्यानगर :** क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या पुण्यतिथीनिमित्त मुंबई येथील भारतीय जनता पार्टीच्या महाराष्ट्र प्रदेश कार्यालयात त्यांना अभिवादन करण्यात आले. या वेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस आमदार मोनिकाताई राजळे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आले.

या कार्यक्रमाला आमदार सीमाताई हिरे, भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष गणेश बनकर, गणेश रांधवने, राहुल नांगरे यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाच्या माध्यमातून सावित्रीबाई फुले यांनी समाजासाठी केलेल्या कार्याची आठवण करून त्यांच्या विचारांवर चालण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

आमदार मोनिकाताई राजळे म्हणाल्या की, सावित्रीबाई फुले यांनी समाजातील स्त्रियांना शिक्षणाचा हक्क मिळवून देण्यासाठी मोठा संघर्ष केला. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे महिलांना शिक्षणासह समाजात सन्मानाचे स्थान प्राप्त झाले. त्यांनी सुरू केलेली शिक्षणाची क्रांती आजही समाजासाठी प्रेरणादायी ठरत आहे.

# मढेवडगाव सेवा संस्थेच्या अध्यक्षपदी वाबळे

## उपाध्यक्षपदी दत्तात्रेय झुंजरुक यांची बिनविरोध निवड



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** श्रीगोंदा तालुक्यातील राजकीय दृष्ट्या महत्त्वाच्या मानल्या जाणाऱ्या मढेवडगाव विविध सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी नागवडे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे यांचे अत्यंत निष्ठावंत तसेच कारखान्याचे माजी उपाध्यक्ष व विद्यमान संचालक सुभाष काका शिंदे यांचे विश्वासू सहकारी लोकनियुक्त सरपंच प्रमोद शिंदे यांचे मित्र बापूसाहेब आबासाहेब वाबळे यांची तर व्हाईस चेअरमनपदी दत्तात्रय बाजीराव झुंजुरुक यांची एकमताने बिनविरोध निवड ही केवळ निवड नसून गावातील एकोपा, विश्वास आणि सहकाराच्या परंपरेचा सुंदर आदर्श ठरला आहे.

यापूर्वी चेअरमनपदी कार्यरत असलेल्यासुमन मानसिंग मांडे तसेच व्हाईस चेअरमन शरद गंगाधर शिंदे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिल्यानंतर रिक्त झालेल्या जागांवर ही निवड शांततेत आणि एकमताने पार पडली. ही निवड सहकार महर्षी शिवाजीराव नारायणराव नागवडे सहकारी साखर कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे, कारखान्याचे जेष्ठ संचालक सुभाष काका शिंदे, तसेच मढेवडगाव ग्रामपंचायतचे लोकनियुक्त सरपंच प्रमोद शिंदे रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय सल्लागार सदस्य स्मितल वाबळे यांच्या मार्गदर्शनाखाली तर सोसायटीचे सर्व संचालक गावातील आजी-माजी पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत पार पडली. तर निवडणूक निर्णय अधिकारी बी. बी. सिनारे, सहकार अधिकारी यांनी नियमानुसार प्रक्रिया पूर्ण करून नवीन पदाधिकाऱ्यांची घोषणा केली. अध्यक्षपदाची सूचना प्रकाश उंडे यांनी केली त्यास शरद शिंदे यांनी अनुमोदन दिले

> कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे व संचालक सुभाष काका शिंदे सरपंच प्रमोद शिंदे स्मितल भैया वाबळे व सर्व सहकारी संचालक गावातील ज्येष्ठ मार्गदर्शक यांनी आमच्यावरती दाखवलेला विश्वासाला तडा न जाऊ देता सर्वांना सोबत घेऊन संस्था व सभासदांचे हित डोळ्यासमोर ठेवून प्रामाणिक व पारदर्शी कारभार करण्याचा निश्चितपणे प्रयत्नतररेल, या पूर्वी पाच वर्ष अध्यक्षपदी राहण्याचा अनुभव निश्चितपणे इथून पुढच्या काळामध्ये फायदेशीर ठरेल.
>
> **नवनिर्वाचित अध्यक्ष बापूसाहेब वाबळे**

उपाध्यक्ष ची सूचना भगवान कुरुमकर यांनी मांडली त्यास वसंतराव साळवे यांनी अनुमोदन दिले. सहकार ही केवळ संस्था नसून ती विश्वास, प्रामाणिकपणा आणि एकत्रित प्रगतीची ताकद असते. या भावनेला बळ देत नव्याने निवड झालेल्या पदाधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखाली सोसायटी अधिक सक्षम होईल, शेतकरी आणि सभासदांच्या विकासासाठी नवे आदर्श निर्माण होतील असे कारखान्याचे मा उपाध्यक्ष ज्येष्ठ संचालक सुभाष शिंदे यांनी सांगितले. नवीन पदाधिकाऱ्यांचे कारखान्याचे चेअरमन राजेंद्र दादा नागवडे अहमदनगर जिल्हा बँकेच्या संचालिका अनुराधाताई नागवडे यांनी अभिनंदन केले.

### विद्यार्थ्यांसाठी 'संदर्भग्रंथांद्वारे प्रगत अध्ययन' उपक्रम उत्साहात




प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** महाविद्यालयातील विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड वाढविण्यासह संदर्भग्रंथांचे महत्त्व पटवून देण्यासाठी भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने द्वितीय वर्ष विज्ञान व तृतीय वर्ष विज्ञान विद्यार्थ्यांसाठी संदर्भग्रंथांद्वारे प्रगत अध्ययन या उपक्रमास विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. या निमित्ताने विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या ग्रंथालयातील विविध संदर्भग्रंथांचा अभ्यास केला तसेच त्यांचा उपयोग कसा करावा याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यक्रमाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय नगरकर यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांनी आपल्या मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची सवय विकसित होते, त्यांची विचारक्षमता वाढते तसेच संशोधनवृत्तीला चालना मिळते. मोबाईलच्या अति वापरापासून दूर राहून विद्यार्थ्यांनी संदर्भग्रंथांचे वाचन करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.

उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी भौतिकशास्त्र विभागप्रमुख प्रा. महेश भगे तसेच प्रा. बलभीम महाराज, प्रा. अनिल परदेशी, प्रा. संदीप कानडे, प्रा. ऋतुजा सुभाष माळवे, प्रा. मंगल सूर्यवंशी, प्रा. संपदा कर्वे आणि प्रा. राणी गायकवाड यांनी विशेष परिश्रम घेतले.

# कर्जतमध्ये अफूची शेती; ४७.६४ लाखांची झाडे जप्त



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** पोलिसांच्या स्थानिक गुन्हे शाखेचे पथक व कर्जत पोलीस यांच्या संयुक्त पथकाने चापडगाव (ता. कर्जत, अहिल्यानगर) येथे केलेल्या संयुक्त कारवाईत अफुची शेती उघडकीस आणण्यात आली. या कारवाईत २४८ किलो २४९ ग्रॅम वजनाची अफुची झाडे जप्त करण्यात आली. त्याची किंमत ४७ लाख ६४ हजार १८० रुपये असल्याचे स्थानिक गुन्हे शाखेचे निरीक्षक किरणकुमार कबाडी यांनी सांगितले. यासंदर्भात एका वृद्धास अटक करण्यात आली आहे.

गुन्हे शाखेच्या पोलिसांना चापडगाव येथे एक शेतकरी प्रतिबंधित आफु झाडाची लागवड करून त्याचे संवर्धन करत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने चापडगाव शिवारातील गट क्रमांक १३ मध्ये जाऊन खात्री केली. तेथे अफुच्या झाडांची लागवड केलेली आढळली. या अफुच्या झाडांना परमेश्वर बन्सी घनवट (वय ६८, चापडगाव, कर्जत) हा पाणी व खत घालून जोपासना करताना आढळून आला.

पोलिसांनी केलेल्या चौकशीत परमेश्वर घनवट याने ही अफुची झाडे दोन ते तीन महिन्यांपूर्वी लावल्याचे सांगितले. परमेश्वर घनवट याच्याविरुद्ध कर्जत पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यासंदर्भात गुन्हे शाखेचे पोलीस नाईक शामसुंदर जाधव यांनी फिर्याद दिली आहे.जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे , अतिरिक्त पोलीस अधीक्षक वैभव कलबुर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी प्रवीणचंद्र लोखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखेचे उपनिरीक्षक विजय झंजाड, अनंत सालगुडे, समीर अभंग, दीपक घाटकर, विजय पवार, अतुल लोटके, संतोष खैरे, अमृत आढाव, उत्तरेश्वर मोराळे यांच्यासह कर्जत पोलिसांनी कारवाईमध्ये भाग घेतला.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात अमली पदार्थ आढळू लागले आहेत. पोलिसांनी यापूर्वी संगमनेरमध्ये केलेल्या कारवाईत लाखो रुपयांचा गांजा जप्त केला. पालकमंत्री राधाकृष्ण विखे यांनी काही दिवसांपूर्वी पोलिस अधिकाऱ्यांच्या बैठकीत अमली पदार्थांच्या विरोधात कारवाई तीव्र करण्याच्या सूचना दिल्या होत्या.

# उद्योजक जगदाळे यांची मदतीचा हातभार

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



श्रीगोंदा : तालुक्यातील आढळगाव येथील पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयाला पुण्यातील उद्योजक व आढळगावचे भूमिपुत्र आनंद जगदाळे यांनी सुमारे एक लाख रुपयांची साऊंड सिस्टिम भेट देत शिक्षण क्षेत्राला मोलाची मदत केली. त्यांच्या या दानशूर कृतीबद्दल गावकऱ्यांकडून कौतुक होत आहे.

तालुक्यातील आढळगाव ग्राम पंचायतचे सरपंच शिवप्रसाद उबाळे यांच्या अध्यक्षतेखाली पंडित जवाहरलाल नेहरू विद्यालयात विद्यार्थी सुरक्षा व भौतिक सुविधा विकास समितीची बैठक झाली होती. या बैठकीत शिक्षक बापू काळे सर व शेळके सर यांनी विद्यालयात साऊंड सिस्टिमची गरज व्यक्त केली. त्यानंतर समिती सदस्य सत्यवान शिंदे यांनी सरपंचांना दानशूर व्यक्तीकडे मदतीची मागणी करण्याचा सल्ला दिला.यावेळी सरपंच उबाळे यांनी तत्काळ उद्योजक आनंद जगदाळे यांच्याशी संपर्क साधून विद्यालयासाठी साऊंड सिस्टिम देण्याची विनंती केली.


विनंती मिळताच जगदाळे यांनी सकारात्मक प्रतिसाद देत कोटेशन मागवले आणि अवघ्या आठ दिवसांत साऊंड सिस्टिमचे साहित्य विद्यालयात उपलब्ध करून दिले.विशेष म्हणजे, कोरोना काळात जगदाळे यांनी आढळगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला सुमारे एक लाख रुपयांचे इन्व्हर्टर व बॅटरी देऊन मदत केली होती, तसेच मागील उन्हाळ्यात ग्रामपंचायतीच्या पाणीटंचाईवर उपाय म्हणून दोन बोअरवेल करून दिल्या होत्या. त्यामुळे त्यांच्या सामाजिक कार्याचे गावात विशेष कौतुक होत आहे.दरम्यान, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्मृतिदिनानिमित्त कार्यक्रमाची सुरुवात अभिवादन करून करण्यात आली. यावेळी सरपंच शिवप्रसाद उबाळे, पंचायत समितीचे माजी सभापती विलासराव भैलूमे, माजी सरपंच नानासाहेब बोळगे, माजी चेअरमन दत्ताभाऊ चव्हाण, शिवसेनेचे तालुका उपाध्यक्ष रघुनाथ सूर्यवंशी, संचालक ज्ञानदेव गाढवे पाटील, ग्रामपंचायत सदस्य हनुमंत डोके, पत्रकार अमोल गव्हाणे, सत्यवान शिंदे, जावेद इनामदार, युवा नेते सागर वाकडे, चक्रधर गव्हाणे, शालेय व्यवस्थापन समिती सदस्य राम भालेराव आदी मान्यवरांच्या उपस्थितीत प्राचार्य गदादे सर यांच्याकडे साऊंड सिस्टिम सुपूर्द करण्यात आली.प्राचार्य गदादे सर, सरपंच शिवप्रसाद उबाळे व माजी सरपंच नानासाहेब बोळगे यांनी उद्योजक आनंद जगदाळे यांचे मनापासून आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बापू काळे सर यांनी केले.दरम्यान, सरपंच शिवप्रसाद उबाळे यांनी लवकरच आढळगावात सुमारे एक कोटी रुपयांच्या विकासकामांचा शुभारंभ होणार असल्याची माहिती दिली.

# तुटवडा नाही : बुकिंग करा, गॅस निश्चित मिळेल : व्यावसायिक मात्र अडचणीत

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**करंजी :** युद्धग्रस्त जगामुळे पेट्रोलियम पदार्थ भारतात येणे अशक्य झाल्यामुळे आता खेडेगावातही अफवांचे पीक जोमात आले असून खाद्यतेले, नैसर्गिक गॅस आदि साठवण करण्यासाठी अनेकांची झुंबड उडाली आहे.व्यावसायिक सिलेंडर न मिळाल्यामुळे व्यावसायिक ग्राहक तथा हॉटेलवाले चांगलेच अडचणीत आले असले तरी घरगुती गॅसचा तुटवडा कोठेही नसून बुकिंग केल्यानंतर लगेच गॅस दिला जाईल असे भगवान गॅस एजन्सी चे संचालक अशोक गर्जे यांनी सांगितले.

गॅस कंपन्यांनी घरगुती तसेच व्यावसायिक गॅससाठी काही बंधन घालायला सुरुवात केली आहे. पाथर्डी तालुक्यात बहुतांश व्यावसायिक हे व्यवसायीक सिलेंडर वापरतात.आता घरगुती सिलेंडर मिळेनासे झाले आहे. व व्यवसायीक सिलेंडरचे नवीन बुकिंग घेऊ नये असे स्पष्ट आदेश आहेत. यामुळे आता व्यावसायिकांनी नेमकं कोणता गॅस ,कोणते सिलेंडर वापरावे असा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे .घरगुती गॅस २१ दिवसाच्या ओटीपी नंतरच मिळणार असल्याकारणाने घरगुती गॅस ग्राहकही धास्तावले आहेत.गेल्या काही वर्षांमध्ये घरगुती असो की व्यवसाय गॅस सिलिंडर घेताना कोणतेही बंधन घातलेलं नव्हते. त्यामुळे बहुतांश ग्राहक हे गॅस बुकिंग करतच नव्हते.आता ओटीपी शिवाय गॅस सिलेंडर मिळणार नाही असे कंपनीने जाहीर केल्यामुळे गॅसधारक चांगलेच अडचणीत सापडल्याचे दिसून येत आहे. काहींचे मोबाईल नंबर बदलले तर काहींचे कार्ड हरवले आहेत तर काहीं ऑनलाईन नाहीत अशा अनेक



- **व्यावसायिक सिलेंडर घेऊन अनेक हॉटेल व्यवसायिक आपला व्यवसाय करत असतात मात्र व्यावसायिक सिलेंडर महाग असते तरीही आम्ही घेतो मात्र आता तेही जर बुकिंग करून मिळणार नसेल तर मग आम्ही कोणता गॅस वापरावा आणि आम्ही व्यवसाय कसा करावा असा मोठा प्रश्न या गॅस तुटवड्यामुळे निर्माण झाला असल्याचे हॉटेल शिवशंकर चे संचालक शफिक पीर मोहम्मद शेख यांनी सांगितले.**
- **गॅसचा कोठेही तुटवडा नाही. मात्र घरगुती गॅस ग्राहकांनी ऑनलाइन बुकिंग करून तो ओटीपी एजन्सीकडे पाठवावा. पाठवलेला ओटीपी चेक करून ३० दिवस पूर्ण झाल्यास त्या ग्राहकाला टाकी दिली जाईल. मात्र ऑनलाईन बुकिंग करून ओटीपी देणे अनिवार्य आहे. -अशोक गर्जे (भगवान गॅस एजन्सी, पाथर्डी)**

अडचणींना सामोरे जात असतानाच गॅस वेळेवर उपलब्ध होत नसल्यानेअनेक गृहिणींनी आता गोऱ्या सर्प लावून चुलीवरच स्वयंपाक करण्याचे नियोजन केले आहे त्यामुळे आखाती देशात जरी युद्धाचा धूर निघत असला तरी आता आपल्याकडेही स्वयंपाकासाठी आता चुलीतूनच धूर निघणार आहे.

## द•ख•ल

### सासवडला बादशाही मस्जिद मध्ये इफ्तार पार्टी सासवड पोलिस व पत्रकार यांचा उपक्रम

**नितीन यादव ! राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** मुस्लीम बांधवांचा पवित्र रमजान सण सुरु असून हिंदू मुस्लिम समाजात ऐक्य व बंधुता राहावी या उद्देशाने सासवड येथील बादशाही मस्जिद मध्ये इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. सासवड पोलिस स्टेशन व पत्रकार संघ सासवड शहर यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. मिठाई



व गुलाब पुष्प देऊन या वेळी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या. सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव सोनवणे व पत्रकार संघ अध्यक्ष हेमंत ताकवले यांनी या प्रसंगी मनोगतातून मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या सध्याच्या युद्धजन्य स्थितीत सर्व विश्वात शांतता लाभावी मुस्लिम बांधवांच्या मागे पोलिस कायम भक्कमपणे उभे राहतील, समाजात सलोखा, बंधुभाव राहण्यासाठी सर्वांनी शांतता राखण्याचे आवाहन वैभव सोनवणे यांनी केले ॲड अशपाक बागवान यांनी उपस्थित पत्रकार व पोलिस यांचे स्वागत केले. हाजी रफिकभाई बागवान, मौलाना शमशाद, शाकीर काझी, हाजी इलाही बागवान दिलावर बागवान, मंजुर गवंडी, आरिफ अत्तार यांसह मोठ्या संख्येने मुस्लीम बांधव व छोटी मुले यावेळी उपस्थित होती. हिंदू धर्मीय असूनही गेली ५८ वर्षे रमजान उपवास करणारे अविनाश चिव्हे यांचा याप्रसंगी विशेष सन्मान करण्यात आला. पत्रकार संघाचे गणेश मुळीक, बाळासाहेब कुलकर्णी जीवन कड, संभाजी महामुनी, राजेंद्र बर्गे, तानाजी सातव संदीप जगताप, सुनील वढणे, जगदीश शिंदे यांसह पोलिस बांधव अक्षय चिले व बापू गायकवाड यांनी या स्तुत्य उपक्रमात सहभाग घेतला.

### कारखाना गेस्ट हाऊसला सरपंच अशोकलाल बोरा यांची सदिच्छा भेट

**नेवासा :** श्री मारुतराव घुले ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना गेस्ट हाऊसला भानसहिवरा गावचे माजी सरपंच अशोकलाल बोरा यांनी भेट दिली. यावेळी कारखान्याचे चेअरमन माजी आमदार डॉ.नरेंद्रजी घुले पाटील यांच्याशी चर्चा करून त्यांनी जुन्या स्मृतींना उजाळा दिला.यावेळी माजी सरपंच देविदास साळुंखे, उपसरपंच दत्ता काळे, पोलीस पाटील संजय तुपे, भेंडा कारखान्याचे अधिकारी विलास लोखंडे उपस्थित होते.



### अंगणवाडी सेविका व आशा स्वयंसेविकांना पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** तालुक्यातील कुकाणा येथील आर्ले पाटील अर्बन यांच्या वतीने दरवर्षी दिले जाणारे कर्तबगार अंगणवाडी सेविका वर्षा नानासाहेब चिंधे तर कर्तबगार आशा स्वयंसेविका नूतन राम मुळे यांना नुकतेच पुरस्काराने जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सन्मानित करण्यात आले. नेवासा येथे झालेल्या महिला सक्षमीकरण मेळाव्यात सदरचे पुरस्कार हे रणरागिनी महिला मंडळाच्या अध्यक्षा धनश्रीताई सुजय विखे पाटील यांच्या हस्ते व आमदार सौभाग्यवती रत्नमालाताई लंघे पाटील, घुले,भाजप महिला आघाडीच्या भारती बेद्रे,आर्ले पाटील अर्बनच्या चेअरमन मीना आर्ले यांच्या प्रमुख उपस्थितीत प्रदान करण्यात आले. सन्मानचिन्ह प्रशस्तीपत्र व रोख पाच हजार असे या पुरस्काराचे स्वरूप होते. यावेळी बोलताना आर्ले पाटील अर्बनच्या चेअरमन मीना आर्ले म्हणाल्या, आमच्या पतसंस्थेने जवळपास शंभरच्या पुढे अंगणवाडी सेविकांना विनातारण कर्जाचे वाटप केले आहे. कर्ज घेतलेल्या महिलांनी वेळच्यावेळी हप्ते भरून आमच्या योजनेला सफल करून दाखवण्यात आम्हाला मोठे सहकार्य केले आहे. तसेच यापुढेही ज्या आशा सेविका व अंगणवाडी सेविका यांना कर्जाची आवश्यकता असेल अशा सर्व आशा सेविकांनी मुख्य कार्यालय कुकाणा येथे येऊन संस्थेशी प्रत्यक्ष संपर्क साधावा असे आवाहन चेअरमन मीना आर्ले यांनी यावेळी बोलताना केले.



# विनापरवाना जळाऊ सरपण साठवणूक वीटभट्टी मालकाविरोधात वनविभागाची कारवाई

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**निरगुडसर :** आंबेगाव तालुक्यातील शिनोली परिसरात विनापरवाना जळाऊ लाकडाची साठवणूक केल्याप्रकरणी वनविभागाने कारवाई करत गुन्हा नोंद केला आहे.दि. ९ मार्च २०२६ रोजी घोडेगाव वनपरिक्षेत्र अधिकारी कुणाल लिमकर यांच्या मार्गदर्शनाखाली वनपाल, शिनोली यांनी त्यांच्या सहकाऱ्यांसमवेत शिनोली (ता. आंबेगाव, जि. पुणे) येथे शिनोली–उगलेवाडी रस्त्यालगत असलेल्या अक्षय दत्तात्रय सोमवंशी



(रा. शिनोली) यांच्या वीटभट्टीवर पाहणी केली. या पाहणीदरम्यान वीटभट्टी परिसरात विविध वृक्ष प्रजातींचे सुमारे १५ घनमीटर जळाऊ सरपण विनापरवाना वाहतूक करून साठवून ठेवलेले आढळून आले.या सरपणामध्ये रायवळ जातींचे निलगिरी, कडुलिंब, बोर, करंज, अकेशिया, चिंच, पिंपळ व उंबर या प्रजातींचा समावेश असल्याचे वनविभागाच्या निदर्शनास आले.

सदर प्रकरणी वीटभट्टी मालक अक्षय सोमवंशी यांच्याकडे विचारणा केली असता त्यांनी हे जळाऊ सरपण स्थानिक किरकोळ व्यापाऱ्यांकडून खरेदी केल्याचे सांगितले. मात्र त्याबाबत आवश्यक परवाना किंवा कागदपत्रे सादर करता आली नाहीत. या अनुषंगाने वनविभागाने भारतीय वन अधिनियम १९२७ चे कलम ४१ (२)(बी) व कलम ४२ तसेच महाराष्ट्र वन नियमावली २०१४ चे कलम ३१ व कलम ८२ अंतर्गत गुन्हा नोंदविला आहे.वनविभागाने जप्त केलेल्या सरपणाबाबत पुढील कायदेशीर प्रक्रिया सुरू असून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असल्याची माहिती वन विभागाकडून देण्यात आली.

# घरगुती गॅसचा अवैध वापर व साठेबाजी केल्यास थेट गुन्हे दाखल होणार : तहसीलदार विक्रम राजपूत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :** पुरंदर तालुक्यात घरगुती गॅस (एलपीजी) चा अवैध वापर व साठेबाजी रोखण्यासाठी प्रशासनाने कडक भूमिका घेतली आहे. नागरिकांमध्ये इंधन व गॅस पुरवठा सुरळीत राहावा यासाठी प्रशासन सतर्क असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर थेट गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याची माहिती तहसीलदार विक्रम राजपूत यांनी दिली आहे

इराण युद्धामुळे इंधन व गॅस पुरवठा सुरळीत राहणार की नाही याबाबत नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. घरगुती गॅसचा काळाबाजार व अवैध वापर रोखण्यासाठी तालुका प्रशासनाने जिल्हाधिकारी पुणे यांच्या मार्गदर्शनाखाली धडक मोहीम हाती घेतली आहे.

गॅस एजन्सींना पारदर्शक वितरण ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून कोणत्याही प्रकारे गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घेण्यास सांगितले आहे. हॉटेल, ढाबे, उद्योग किंवा व्यावसायिक आस्थापनांनी घरगुती गॅसचा वापर करू नये, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत.

तसेच नागरिकांना घाबरून गॅस साठवू नये, पुरेसा साठा उपलब्ध असून नियमित पुरवठा सुरू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. काळाबाजार रोखण्यासाठी भरारी पथक स्थापन करण्यात आले असून हॉटेल व उद्योगांची तपासणीही केली जाणार आहे.

# पुणे जिल्ह्यातील जनगणनेसाठी कर्मचाऱ्यांनी तयार राहावे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** – देशातील १६ वी जनगणना असलेल्या जनगणना २०२७ च्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील सर्व संबंधित विभागांनी आवश्यक तयारी पूर्ण करून जनजागृती आणि समन्वय साधावा, असे निर्दे श निवासी उपजिल्हाधिकारी ज्योती कदम यांनी दिले.१६ मे ते १५ जून या कालावधीत होणाऱ्या घरयादी व घरगणनेच्या कामकाजाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत त्या बोलत होत्या. बैठकीस प्राथमिक व माध्यमिक शिक्षण अधिकारी, जिल्हा आरोग्य अधिकारी तसेच पुणे जिल्ह्यातील दोन्ही महानगरपालिका आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.जनगणना ही संविधानिक व कायदेशीर प्रक्रिया असून ती संविधानातील अनुच्छेद २४६ (केंद्रसूची) आणि जनगणना अधिनियम १९४८ अंतर्गत राबविण्यात येते. जनगणना २०२७ ही १८७२ पासूनची देशातील १६ वी आणि स्वातंत्र्यानंतरची ८ वी जनगणना आहे. या प्रक्रियेत प्रगणक आणि पर्यवेक्षक हे महत्त्वाचे आधारस्तंभ असून त्यांच्या माध्यमातून घराघरांतून अचूक माहिती संकलित केली जाणार आहे. जनगणनेतून मिळणारी माहिती शासनाच्या नियोजन प्रक्रियेसाठी, विविध कल्याणकारी योजनांची प्रभावी अंमलबजावणी, संसाधनांचे योग्य वाटप तसेच मतदारसंघांचे परिसीमन यासाठी अत्यंत महत्त्वाची ठरते. त्यामुळे प्रत्येकाने जनगणना कार्यात सक्रिय सहभाग देऊन अचूक माहिती उपलब्ध करून देणे आवश्यक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. जनगणना २०२७ ही दोन टप्प्यांत राबविण्यात येणार आहे. पहिल्या टप्प्यात घरयादी व घरगणना (२०२६) केली जाईल. या टप्प्यात घरांची स्थिती, उपलब्ध सुविधा, मालमत्ता आदी बाबींची माहिती संकलित करून पुढील लोकसंख्या गणनेसाठी आधारभूत चौकट तयार केली जाईल. दुसऱ्या टप्प्यात लोकसंख्या गणना (२०२७) करण्यात येणार असून ठराविक संदर्भ दिनांक व वेळेनुसार प्रत्येक व्यक्तीची वैयक्तिक माहिती नोंदविण्यात येईल.यावेळी जनगणना प्रक्रियेत मोठा तांत्रिक बदल करण्यात आला असून सेन्सस २०२७–एचएलओ या मोबाईल ॲपच्या माध्यमातून डिजिटल पद्धतीने माहिती संकलित केली जाणार आहे. तसेच प्रथमच स्व–गणना (सेल्फ एन्युमरेशन) ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिकांनी स्व–गणना करून माहिती सादर केल्यास ती अंतिम करण्यापूर्वी प्रगणकांकडून पडताळणी केली जाणार आहे.

## अतुल झेंडे यांना राज्यस्तरीय 'सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी' पुरस्कार

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**दिवे :** इगतपुरी तालुक्यातील आवली दुमाला येथे २०१८ साली घडलेल्या पाच वर्षांच्या चिमुकलीच्या खून प्रकरणाचा छडा लावून आरोपीला जन्मठेपेची शिक्षा मिळवून देणाऱ्या अतुल झेंडे यांच्या तपासाची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली आहे. या गुन्ह्याची निवड 'सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी' पुरस्कारासाठी करण्यात आली असून तपास पथकातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना २५ हजार रुपयांचे बक्षीस आणि प्रशस्तीपत्र जाहीर करण्यात आले आहे.

३१ मे २०१८ रोजी घडलेल्या या घटनेत आरोपीने चॉकलेटचे आमिष दाखवून पाच वर्षांच्या चिमुकलीचे अपहरण केले होते. त्यानंतर तिची हत्या करून मृतदेह पुरल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला होता. या प्रकरणाने संपूर्ण परिसर हादरला होता.

या गुन्ह्याचा तपास त्या वेळी नाशिक येथे उपअधीक्षक म्हणून कार्यरत असलेले अतुल झेंडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने केला. वैज्ञानिक तपास पद्धती, डीएनए अहवाल तसेच ठोस पुराव्यांच्या आधारे आरोपीला अटक करण्यात आली. पुढील सुनावणीत न्यायालयाने आरोपीला जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

उल्लेखनीय म्हणजे अतुल झेंडे यांचे मूळ गाव दिवे असून त्यांचे प्राथमिक शिक्षणही दिवे येथेच झाले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय तपासकार्याची राज्यस्तरावर दखल घेत 'सर्वोत्कृष्ट अपराधसिद्धी' पुरस्कारासाठी निवड करण्यात आल्याने दिवेसह पुरंदर तालुका परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# बारामती पोटनिवडणुकीसाठी अंतिम मतदार यादी प्रसिद्ध

## एकूण मतदार ३ लाख ८३ हजार ७६७

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** – बारामती (२०१) विधानसभा मतदारसंघाच्या आगामी पोटनिवडणुकीच्या अनुषंगाने १ जानेवारी २०२६ या अर्हता दिनांकावर आधारित मतदार यादीचे विशेष संक्षिप्त पुनरीक्षण करून अंतिम मतदार यादी १० मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

या अंतिम यादीनुसार मतदारसंघातील एकूण मतदारांची संख्या ३ लाख ८३ हजार ७६७ इतकी झाली आहे. भारत निवडणूक आयोग, नवी दिल्ली यांच्या दि. ६ फेब्रुवारी २०२६ रोजीच्या पत्रानुसार बारामती विधानसभा मतदारसंघासाठी विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम जाहीर करण्यात आला होता. त्यानुसार ९ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. त्यानंतर ९ फेब्रुवारी ते २५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत दावे व हरकती स्वीकारण्यात आल्या. प्राप्त अर्जांची छाननी करून आवश्यक ती दुरुस्ती केल्यानंतर अंतिम मतदार यादी १० मार्च २०२६ रोजी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

अंतिम मतदार यादीत पुरुष मतदारांची संख्या १ लाख ९३ हजार ४९६, महिला मतदारांची संख्या १ लाख ९० हजार २७१, तर इतर मतदारांची संख्या २४ असून एकूण मतदारसंख्या ३ लाख ८३ हजार ७६७ इतकी आहे. यापूर्वी २० ऑक्टोबर २०२४ रोजी प्रसिद्ध झालेल्या मतदार यादीत एकूण मतदारसंख्या ३ लाख ६० हजार ६०८ इतकी होती. त्यानंतर ९ फेब्रुवारी २०२६ रोजी प्रसिद्ध झालेल्या प्रारूप मतदार यादीत एकूण मतदारसंख्या ३ लाख ८८ हजार ३७१ इतकी नोंदविण्यात आली होती.

सदर अंतिम मतदार यादी सर्व नागरिक व राजकीय पक्षांसाठी पाहण्यासाठी उपलब्ध करण्यात आली असून यासंदर्भात लोकप्रतिनिधित्व अधिनियम १९५० मधील तरतुदीनुसार अपील करण्याची तरतूद आहे. संबंधित अपील जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी, पुणे यांच्याकडे १५ दिवसांच्या आत दाखल करता येईल, अशी माहिती उपजिल्हाधिकारी तथा उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर यांनी दिली.

# मिनी सरस सावित्री जत्रा २०२६ ला उत्स्फूर्त प्रतिसाद;

## युगांडा शिष्टमंडळाची भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाझरे/सासवड :** जिल्हा परिषद पुणे आयोजित मिनी सरस सावित्री जत्रा २०२६ या जिल्हास्तरीय विक्री व प्रदर्शन उपक्रमाला नागरिकांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. ग्रामीण भागातील स्वयंसहाय्यता समूहांच्या महिलांनी तयार केलेल्या विविध उत्पादनांना या जत्रेमुळे व्यापक बाजारपेठ उपलब्ध होत असून महिला उद्योजकतेला चालना मिळत आहे.

मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक शालिनी कडू यांच्या नेतृत्वाखाली या जत्रेचे आयोजन करण्यात आले आहे. जत्रेला काल युगांडा सरकारच्या शिष्टमंडळाने भेट देऊन स्वयंसहाय्यता समूहांच्या स्टॉलना भेट दिली. त्यांनी महिलांनी तयार केलेल्या विविध वस्तूंची पाहणी करून काही उत्पादनांची खरेदी केली तसेच ग्रामीण महिलांच्या कौशल्याचे आणि उद्योजकतेचे कौतुक केले.

जत्रेच्या निमित्ताने आयोजित खरेदीदार–विक्रेता मेळाव्याला विविध कंपन्या व खरेदीदार गटांनी भेट देऊन स्वयंसहाय्यता समूहांच्या उत्पादनांची पाहणी केली आणि अनेक

स्वयंसहाय्यता समूहांच्या महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे आणि ग्रामीण महिलांच्या उद्योजकतेला चालना देणे हा 'मिनी सरस सावित्री जत्रा २०२६'चा मुख्य उद्देश आहे. या जत्रेला मिळणारा उत्स्फूर्त प्रतिसाद महिलांच्या कामगिरीची पावती आहे.




पुणे जिल्हा परिषद आयोजित मिनी सरस सावित्री जत्रा २०२६ निमित्त युगांडा सरकारच्या शिष्टमंडळाने जत्रेला भेट देत स्वयंसहाय्यता समूहांच्या महिलांनी तयार केलेल्या उत्पादनांची पाहणी केली. यावेळी जिल्हा परिषद पुणेचे अधिकारी व उपस्थित मान्यवर.

उत्पादनांसाठी ऑर्डर्स नोंदवल्या. महिलांना व्यवसायवृद्धीसाठी मार्गदर्शन मिळावे या उद्देशाने उत्पादनांचे प्रभावी मार्केटिंग कसे करावे या विषयावर विशेष मार्गदर्शन सत्रही आयोजित करण्यात आले. कार्यक्रमादरम्यान विविध सांस्कृतिक सादरीकरणांनी जत्रेला रंगत आणली. आंबेगाव तालुक्यातील तिरपाड ग्रामपंचायतीच्या महिलांनी पारंपरिक लेझीम नृत्य सादर केले, तर बारामती येथील महिलांनी स्वयंसहाय्यता समूहांच्या कार्यावर आधारित पथनाट्य सादर केले. तसेच लोकप्रिय युट्यूब चॅनल सरिताज किचन्सच्या सरिता पद्मन यांनी व्हेज बिर्याणीचे प्रात्यक्षिक करून महिलांना अन्नपदार्थ व्यवसायाबाबत मार्गदर्शन केले. चांडाळ चौकडी मालिकेच्या टीमनेही मनोरंजनात्मक सादरीकरण करून कार्यक्रमात रंगत आणली.

## बारामती तालुका सहकारी दूध उत्पादक संघ मर्या; कसबा, बारामती जि.पुणे

फोन नं. ०२११२–२९९३७२, मो नं.९५४५४५००३५ ई मेल. btd.pur@gmail.com

### ई टेंडर नोटीस

आमच्या बारामती तालुका सहकारी दुध उत्पादक संघाच्या माळेगाव नंदन डेअरी व नंदन पशुखाद्य कारखान्यामधील १.५ टनी बॉयलरसाठी सन २०२६ – २०२७ करिता १२ बाय ८ इंच या साईजमध्ये सरपण (वड, पिंपळ, औदुंबर व निलिगिरी व्यतिरिक्त) दरमहा अंदाजे १३० मे.टन वार्षिक दर पद्धतीने खरेदी करावयाचे आहे, त्या करिता टेडर बयाणा रक्कम रु. ५०,०००/– च्या डि. डि. सह इच्छुकांनी आपले कोटेशन दि. २५/०३/२०२६ रोजी सकाळी ११.०० पर्यंत सिलबंद लिफाफ्यात पाठविण्यात यावे (चेक स्विकारले जाणार नाहीत)

**नोट – सरपण पुरवठा केल्याचा कमीत कमी २ वर्षाचा अनुभव असायला पाहिजे**

कोणतेही कारण न देता निविदा पूर्णतः किवा अंशतः मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. संचालक मंडळाने राखून ठेवला आहे.

**डॉ. योगेश वा. राणे** व्यवस्थापकीय संचालक | **दत्तात्राय. सं. वावगे** व्हा. चेअरमन | **संजय. रा. कोकरे** चेअरमन

**बारामती तालुका सहकारी दुध उत्पादक संघ**

## जागतिक महिला दिनानिमित्त सासवडमध्ये महिलांचा गौरव; विविध मार्गदर्शन कार्यक्रमांचे आयोजन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सासवड :-** जागतिक महिला दिनानिमित्त सासवड नगरपरिषदेच्या महिला व बालकल्याण समितीच्या वतीने शहरातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान करून गौरव करण्यात आला. आचार्य अत्रे सभागृहात आयोजित या कार्यक्रमात महिलांसाठी आरोग्य, कायदेविषयक मार्गदर्शन आणि सेल्फ डिफेन्स प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात सासवड शहरातील विविध क्षेत्रांमध्ये कार्यरत सुमारे ९० यशस्वी महिलांचा सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. याशिवाय नगरपरिषदेच्या महिला सफाई कर्मचारी, नगरपरिषद शाळांतील शिक्षिका आणि महिला बचत गटातील उद्योजिका अशा एकूण सुमारे २०० महिलांचा सत्कार करण्यात आला.कार्यक्रमास नगराध्यक्षा आनंदीकाकी चंद्रकांत जगताप, सौ. राजवर्धिनी संजय जगताप, उपविभागीय अधिकारी वर्षा लांडगे आदी मान्यवर उपस्थित होते. महिलांच्या आरोग्यविषयक मार्गदर्शनासाठी स्त्रीरोगतज्ज्ञ डॉ. सुचेता भालेराव, कायदेविषयक मार्गदर्शनासाठी पोलीस उपनिरीक्षक अर्चना पाटील तसेच सेल्फ डिफेन्स प्रशिक्षणाबाबत पायल वाघोळे व दुर्गा बोराटे यांनी उपस्थित महिलांना मार्गदर्शन केले. तसेच महिला बचत गटांनी तयार केलेल्या विविध वस्तूंच्या विक्रीसाठी स्टॉल्स ही लावण्यात आले होते.

## निविदा नोटीस

### ग्रामपंचायत श्री क्षेत्र महाळुंगे (इं.), ता. खेड, जि. पुणे

ग्रामपंचायत महाळुंगे (इं.) ता. खेड, जि. पुणे हे महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग व जिल्हा परिषद यांचेकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या सीलबंद निविदा पाकीट पध्दतीने मागविण्यात येत आहे. निविदा ग्रा.पं. महाळुंगे (इं.), ता. खेड, जि. पुणे यांचेकडून दि. १२/०३/२०२६ ते २०/०३/२०२६ पर्यंत दुपारी ०२.०० वाजेपर्यंत कोऱ्या निविदा देण्यात येतील. व भरुन पाठविलेल्या मोहोरबंद निविद याच कालावधीत १०.०० ते ०५.०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. व शक्य झाल्यास शेवटच्या दिवशी सायं. ०५.०० वाजता उघडण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचे नाव | निधीस्त्रोत |
|---|---|---|
| १. | प्रशासकीय इमारतीमध्ये कुंड्या खरेदी करणे. | ग्रामनिधी |
| २. | हायमॅक्स दिव्यांच्या सौर प्लेट साफ सफाई करणे. | ग्रामनिधी |
| ३. | आस्मिता भवन येथे फर्निचर तयार करणे. | ग्रामनिधी |
| ४. | मौज महाळुंगे येथील विविध ठिकाणी असणाऱ्या क्रिडांगणावर माती टाकणे. | ग्रामनिधी |

**टीप :** १) कोणत्याही निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार ग्रा.पं. ने राखुन ठेवला आहे. २) कोणतीही निविदा कारण न देता रद्द अथवा फेरबदल करण्याचा अधिकार ग्रा.पं. ने राखून ठेवला आहे. ३) सदर निविदा बंद लिफाफ्यामध्ये आवश्यक आहे. ४) सोबत पुढील कागदपत्रे आवश्यक आहे. (अ. नोंदणी प्रमाणपत्र, ब. जीएसटी रजीस्ट्रेशन, क. पॅनकार्ड)

सही/– ग्रामसेवक ग्रामपंचायत महाळुंगे (इं.) ता. खेड, जि. पुणे | सही/– ग्रामसेवक ग्रामपंचायत महाळुंगे (इं.) ता. खेड, जि. पुणे

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस विशेषतः गाव मौजे भोरवाडी, ता. आंबेगाव, जि. पुणे येथील लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत श्री. सुनिल पोपट भोर यांचे नावे सातबारा सदरी व मालकी ताबेवहिवाटीस असून सदर मिळकत संपूर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरवसा व खात्री विदयमान मालकांनी आमचे अशिल श्री. अमरजीत मोहन अभंग यांस दिली. त्यांना सदर मिळकत विक्री करावयाचे असल्याने त्यांनी आमचे अशिलास सदर मिळकत खरेदी देण्याचे कबुल करुन त्यांचेकडून इसार स्विकारला आहे. सबब सदर मिळकतीवर कोणाचाही कोणत्याही प्रकारचा गहाण, दान, बक्षिस, लीन, लीज, पोटगी, कुळ, खंड, ताबा, वहिवाट, विसार, साठेखत, विकसन करार, कुलमुखत्यार अगर अन्य कोणत्याही प्रकारचा तबदीलीचा लेखी अथवा तोंडी करार असल्यास त्यांनी नोटीस प्रसिध्द झालेपासून पंधरा दिवसांचे आत आमची मुळ कागदपत्रानिशी आमचे खालील पत्त्यावर येऊन खात्री पटवून तशी लेखी हरकत नोंदवावी मात्र मुदतीत कोणाचीही हरकत वा तक्रार न आल्यास ज्या कोणाचा हक्क हितसंबंध होता त्यांनी तो जाणीवपूर्वक सोडून दिला असे समजून आमचे अशील सदर मिळकतीचा खरेदीचा पुढील व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कोणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार वा हरकत चालणार नाही.

परिशिष्ट– मिळकतीचे वर्णन मिळकत तुकडी पुणे, पोटतुकडी तालुका आंबेगाव मे. सह दुय्यम निबंधक सो. आंबेगाव यांचे हद्दीतील गाव मौजे भोरवाडी येथील खाते नं. ११९४ वरील जमिन गट नं. २१/१ क्षेत्र ०० हे ३६.५० आर.

मंचर, दि. ११/०३/२०२६

**श्री. आशिष पांडूरंग काजळे, ॲडव्होकेट**
**मु.पो. मंचर, ता. आंबेगाव, जि. पुणे.**
**मो.नं. ९९६०२१९२१९**

## महाराष्ट्र शासन

### वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय शिरुर प्रा.

### रामलिंग पाबळ रोड शिरुर, ता. शिरुर, जि.पुणे ४१२२१०.

### निविदा सूचना क्र ०१ / सन २०२५–२६

खालील कामांच्या सिलबंद निविदा वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय शिरुर (प्रा.) रामलिंग पाबळ रोड शिरुर, ता.शिरुर जि.पुणे ४१२२१० हे को–या निविदा या वनपरिक्षेत्र शिरुर कार्यालयातील प्रसिद्धी फलकावर दि १०.०३.२०२६ ते १६.०३.२०२६ या कालावधीमध्ये भरुन हार्ड कॉपीचे स्वरुपात भरावयाच्या आहेत व भरुन पाठविलेल्या निविदा यांचे वनपरिक्षेत्र शिरुर कार्यालयात दि १७.०३.२०२६ रोजी दुपारी १४.०० वाजे पर्यंत स्विकारतील आणि शक्यतो त्याच दिवशी उघडतील.

| अ.क्र. | गाव | कामाचे नाव | शेरा |
|---|---|---|---|
| १ | विठ्ठलवाडी | मा. उपवनसंरक्षक जुन्नर यांचेकडील मंजूरी पत्र जा.क्र.ब/कक्ष–४.२ /जमिन/७७६३अ/२०२५–२६, दि. ०५. ०३. २०२६ अन्वये मौजे विठ्ठलवाडी फॉ.कं.नं.३९९ मधील १५ हे. क्षेत्रावर रोपवन करणे करिता एकूण १५ हे. क्षेत्रापैकी ०५ हे. क्षेत्रावर प्रोसोपिस, काटेरी झाडे, झुडपे काढून लाकडाची विल्हेवाट लावणे कामी लिलाव प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. | खुला वर्ग |

१. वनपरिक्षेत्र अधिकारी यांचे कार्यालयात नोटीस बोर्ड सविस्तर निविदा सुचना पहावयास मिळेल. वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी विनंती केल्यास नोटीस प्रत विनामुल्य मिळू शकेल.
२. सदर निविदांसाठी शासन निर्णय क्र. निविदा ०४१७/प्र.क्र.२४७/ मां.प्र.–०१/ दिनांक ३०.१०.२०२३ मधील तरतुदी लागू राहतील.
३. कोऱ्या निविदा संचाची मागणी करताना अर्जासोबत निविदा फी ची दुय्यम पावती व कंत्राटदाराचा अर्ज नोंदणी प्रमाणपत्र यांच्या सत्यप्रती जोडणे आवश्यक आहे.
४. ठेकेदाराने दिलेल्या दराची विधी ग्राह्यता ६० दिवसापर्यंत राहिल.
५. इसाऱ्याची रक्कम राष्ट्रीयकृत किंवा कोणत्याही शेड्युल बँकेची सहा महिन्याची मुदत ठेव पावती वनपरिक्षेत्र अधिकारी, शिरुर यांचे नावाने सादर करावी.
६. कोणतीही / कोणत्याही अगर सर्व निविदा नाकारणेचा व रद्द करणेचा अधिकार वनपरिक्षेत्र अधिकारी शिरुर यांनी राखुन ठेवला आहे.
७. वनपाल / वनरक्षक व संबंधित कंत्राटदार यांनी क्षेत्रिय कामाची संयुक्त स्थळ निरिक्षण केल्याचा जिओटॅग सादर करावे.
८. वनपाल यांनी दिलेले प्रमाणपत्र निविदे सोबत सादर करणे आवश्यक राहील.

**(निळकंठ गव्हाणे)**
**वनपरिक्षेत्र अधिकारी,**
**शिरुर. (प्रा.)**

## जाहीर निविदा

**ग्रामपंचायत कुशिरे खुर्द (तालुका आंबेगाव) जि. पुणे निविदा**

### निविदा नोटिस क्र.१ सन २०२५–२६

ग्रामपंचायत कुशिरे खुर्द (तालुका आंबेगाव) जि.पुणे खालील कामाचे सीलबंद निविदा योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून (तीन पाकिटे) बंद लिफाफा पद्धतीने मागवत आहोत. को–या निविदा मा. सरपंच ग्रामपंचायत कुशिरे खुर्द (तालुका आंबेगाव) जि.पुणे यांच्या कार्यालयाकडे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सुट्टीचे दिवस वगळता दिनांक १२/०३/२०२६ ते दिनांक २०/०३/२०२६ या कालावधीमध्ये सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत देण्यात येतील. व भरून पाठवलेल्या मोहोरबंद निविदा / दरपत्रक सुट्टीचे दिवस वगळता दिनांक १२/०३/२०२६ ते दिनांक २०/०३/२०२६ या कालावधीमध्ये सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. दिनांक २०/०३/२०२६ रोजी सकाळी ०५.०० वाजता किंवा तदनंतर त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत उघडल्या जातील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम रू. | टेंडर फी रू. | कंत्राटदार वर्ग | निविदा प्रकार | कामाची मुदत | लेखाशीर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत कुशिरे खुर्द येथे पाणीपुरवठा करणेसाठी खडकटाकी बांधणे | १०,००,०००/– | सूट | ५००/– | सु.बे. अभियंता | बी–१ | ६ महिने | पाणीपुरवठा करणेसाठी खडकटाकीची बांधणी २२१५–९००७ कार्यक्रम |

१) कोणत्याही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे त्या मंजूर आगर नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायत कडे राखून ठेवले आहेत. २) को–या निविदा नमुन्याची रक्कम चलनाने ग्रामपंचायत कुशिरे खुर्द ता. आंबेगाव यांचे कार्यालयात भरून उपलब्ध होतील. ३) अनामत रक्कम रोख स्वरुपात चलनाने, धनादेशने, डिमांड ड्राफ्ट अथवा एफ डी स्वरुपात भरावी. ४) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ५) कामाच्या अटी व शर्थीचा तपशील को–या निविदा संचासोबत प्राप्त होतील. ६) दरपत्रक स्वीकृतीनंतर तक्रार हरकत विचारात घेतली जाणार नाही. ७) उपरोक्त नमूद मुदतीनंतर येणा–या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**ग्रामपंचायत अधिकारी** ग्रामपंचायत कुशिरे खुर्द, ता. आंबेगाव जि पुणे | **सरपंच** ग्रामपंचायत कुशिरे खुर्द, ता.आंबेगाव जि. पुणे

## जाहीर निविदा

**ग्रामपंचायत डिंभे खुर्द (तालुका आंबेगाव) जि. पुणे निविदा**

### निविदा नोटिस क्र.१ सन २०२५–२६

ग्रामपंचायत डिंभे खुर्द (तालुका आंबेगाव) जि.पुणे खालील कामाचे सीलबंद निविदा योग्य त्या नोंदणीकृत ठेकेदाराकडून (तीन पाकिटे) बंद लिफाफा पद्धतीने मागवत आहोत. को–या निविदा मा. सरपंच ग्रामपंचायत डिंभे खुर्द (ता. आंबेगाव) जि.पुणे यांच्या कार्यालयाकडे कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सुट्टीचे दिवस वगळता दिनांक १२/०३/२०२६ ते दिनांक २०/०३/२०२६ या कालावधीमध्ये सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत देण्यात येतील. व भरून पाठवलेल्या मोहोरबंद निविदा / दरपत्रक सुट्टीचे दिवस वगळता दिनांक १२/०३/२०२६ ते दिनांक २०/०३/२०२६ या कालावधीमध्ये सकाळी १०.३० ते सायंकाळी ४.०० वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. दिनांक २०/०३/२०२६ रोजी सकाळी ०५.०० वाजता किंवा तदनंतर त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत उघडल्या जातील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम रू. | टेंडर फी रू. | कंत्राटदार वर्ग | निविदा प्रकार | कामाची मुदत | लेखाशीर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ग्रामपंचायत डिंभे खुर्द येथे सांड पाणी व्यवस्थापन प्रकल्प काम करणे | ३,२३,९९४/– | सूट | १००/– | खुला | बी–१ | ३ महिने | स्वच्छ भारत अभियान व ग्रामपंचायत १५ वा वित्त आयोग निधी |

१) कोणत्याही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणे त्या मंजूर आगर नामंजूर करण्याचे अधिकार ग्रामपंचायत कडे राखून ठेवले आहेत. २) कोऱ्या निविदा नमुन्याची रक्कम चलनाने ग्रामपंचायत डिंभे खुर्द ता. आंबेगाव यांचे कार्यालयात भरून उपलब्ध होतील. ३) अनामत रक्कम रोख स्वरुपात चलनाने, धनादेशने, डिमांड ड्राफ्ट अथवा एफ डी स्वरुपात भरावी. ४) ठेकेदाराने कोरी निविदा मागणी अर्जासोबत नोंदणी प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. ५) कामाच्या अटी व शर्थीचा तपशील को–या निविदा संचासोबत प्राप्त होतील. ६) दरपत्रक स्वीकृतीनंतर तक्रार हरकत विचारात घेतली जाणार नाही. ७) उपरोक्त नमूद मुदतीनंतर येणा–या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**ग्रामपंचायत अधिकारी** ग्रामपंचायत डिंभे खुर्द, ता. आंबेगाव जि पुणे | **सरपंच** ग्रामपंचायत डिंभे खुर्द, ता.आंबेगाव जि. पुणे

## द • ख • ल

### शिंदे महाविद्यालयात अँटी रॅगिंग विषयावर कार्यशाळा उत्साहात

**लिंपणगाव** : रयत शिक्षण संस्थेच्या महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालयात अँटी रॅगिंग उपाय व वैशिष्ट्ये या विषयावर एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली. या कार्यशाळेसाठी प्रमुख पाहुण्या म्हणून अॅड. विजया घोडके उपस्थित होत्या. याप्रसंगी महिलांच्या कायद्याविषयी त्यांनी विचार व्यक्त केले. रॅगिंग अॅक्ट संदर्भात माहिती दिली. त्या म्हणाल्या की, महिलांचा सन्मान करूया. मुलींनी तरुणपणात भावनांच्या आहारी जाऊ नये. महाविद्यालयीन युवक युवतींनी शिक्षणाच्या माध्यमातून आपण आपल्या व्यक्तिमत्त्वाला आकार दिला पाहिजे. महाविद्यालयात कोणीही कोणाला त्रास देऊ नये. प्रत्येक विद्यार्थ्याने एकमेकाला सांभाळले पाहिजे, असे त्या म्हणाल्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. प्रकाश साळवे होते. ते म्हणाले की, रॅगिंग ही एक गंभीर समस्या असून शैक्षणिक संस्थांमध्ये तिला बंदी आहे. कोणीही कोणाचा शरीरिक व मानसिक छळ करू नये. महाविद्यालयीन जीवन हे आपले व्यक्तिमत्व घडवण्यासाठी असते. महाविद्यालयात येऊन ज्ञानसंपन्न बना, असे ते म्हणाले. समन्वयक डॉ. हरिभाऊ वाघीरे यांनी पाहुण्यांचा परिचय व प्रास्ताविक केले. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. सुदाम भुजबळ, डॉ. नितीन थोरात, आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. राहुल गायकवाड, सर्व विभाग प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी, विद्यार्थिनी मोठ्या संख्येने या कार्यशाळेसाठी उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. प्रियांका म्हस्के यांनी केले. आभार डॉ . अनुराधा ताटे यांनी मानले.

### 'पतीच्या स्मृतीतून उभी राहिलेली यशाची वाट'

**शेवगांव** : शेवगाव तालुक्यातील भापकर वस्ती येथील



सहायक शिक्षिका श्रीकांता शिंदे यांना नुकताच राज्य आदर्श पुरस्कार मिळाल्याची अभिमानास्पद बातमी आहे. पतीच्या अकाली निधनानंतरही खचून न जाता त्यांनी समाजासाठी, विद्यार्थ्यांसाठी आणि शाळेच्या प्रगतीसाठी सातत्याने कार्य केले.

नवनवीन उपक्रम, सकारात्मक विचार आणि शिक्षणाविषयी असलेली तळमळ यामुळे त्यांनी विद्यार्थ्यांमध्ये प्रेरणा निर्माण केली. त्यांच्या या कार्याची दखल घेत राज्यस्तरावर त्यांना हा मानाचा पुरस्कार प्राप्त झाला.

प्रत्येक यशामागे कोणाचा ना कोणाचा हात असतोच. श्रीकांता शिंदे यांच्या या यशामागे त्यांच्या दिवंगत पतीची प्रेरणा आणि आशीर्वाद नक्कीच आहे, असे म्हणणे वावगे ठरणार नाही. त्यांच्या या यशामुळे शेवगाव तालुक्याचे नाव अभिमानाने उजळले आहे.

### खाकीतील कर्तृत्वान महिलांचा गौरव



**अहिल्यानगर** : जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने शहरातील कोतवाली पोलीस स्टेशन येथे महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करून महिला दिन उत्साहात साजरा करण्यात आला. समाजातील नागरिकांच्या विशेषत: महिलांच्या सुरक्षिततेसाठी अहोरात्र कार्य करणाऱ्या महिला पोलीसांच्या योगदानाचा गौरव करण्याच्या उद्देशाने हा सन्मान सोहळा आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमात सामाजिक कार्यकर्ते विजय भालसिंग आणि ग्रामपंचायत सदस्य तथा सामाजिक कार्यकर्ते पै. नाना डोंगरे यांच्या हस्ते महिला पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना फेटे बांधून व पुष्पगुच्छ देऊन गौरविण्यात आले. यावेळी कोतवाली पोलीस स्टेशनच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक तेजश्री थोरात, पोलीस उपनिरीक्षक शितल मुगडे, पीएसआय आमीन शेख यांच्यासह कार्यरत सर्व महिला पोलीसांचा विशेष सन्मान करण्यात आला. यावेळी सामाजिक क्षेत्रातील रजनी ताठे, नलिनी गायकवाड, शारदा होशिंग, गौतमी भिंगारदिवे, निता कटारिया, सौ. बर्वे आदी महिला उपस्थित होत्या.

### आरोग्य तपासणी शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**अहिल्यानगर** : यशोदा लंके फाऊंडेशन व हॉलिस्टिक क्लासिकल होमिओपॅथी क्लिनिक यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात मोफत होमिओपॅथीक आरोग्य तपासणी व उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला असून अनेक रुग्णांनी आपली तपासणी करून घेत औषधोपचाराचा लाभ घेतला.

खासदार निलेश लंके यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचे उद्घाटन पीआरएम सॉफ्टवेअर कंपनीच्या सीईओ सुमन कुरेल यांच्या हस्ते करण्यात आले. या शिबिरामध्ये होमिओपॅथी क्लिनिकचे संचालक डॉ. प्रमोद लंके यांनी जुनाट सर्दी, दमा, संधिवात, जुनाट डोकेदुखी, मासिक पाळीचे विकार, मुतखडा, पोटाचे विकार आदी विविध जटिल व जुनाट आजारांवर रुग्णांची तपासणी केली. शिबिरामध्ये डॉ. प्रियंका धाकतोडे, डॉ. ऋतुजा लांबे, डॉ. तेजस्विनी इंगोले, डॉ. संकेत लांडे यांनी देखील रुग्णांची तपासणी केली.

## युद्धजन्य परिस्थितीवर श्रीगोंद्यात अफवांचे पेव

# गॅस एजन्सींवर गर्दी; तुटवडा नाही; पुरवठा विभागाचे स्पष्टीकरण



* गॅसचा तुटवडा नसल्याचे जिल्हा पुरवठा विभागाचे स्पष्टीकरण
* सोशल मीडियावरील संदेशांमुळे एजन्सींवर गर्दी
* नागरिकांना अफवांवर विश्वास न ठेवण्याचे प्रशासनाचे आवाहन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा** : जगात युद्धजन्य परिस्थिती निर्माण होण्याच्या अफवांमुळे श्रीगोंदा शहरात घरगुती गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याची चर्चा सुरू झाली असून, प्रत्यक्षात गॅसची कमतरता नसतानाही नागरिकांनी घाईघाईने सिलिंडर घेण्यासाठी गॅस एजन्सींकडे गर्दी केली आहे.

अमेरिका सोबत चालू असलेल्या युद्धाचा फटका आता भारतातही बसण्याची दात शक्यता वाटत असताना शोषलं मीडियावर घरगुती गॅसचा तुटवडा निर्माण झाल्याबाबत मोठ्या प्रमाणात अफवांचे पेव फुटले आहेत त्यामुळे गॅसचा तुटवडा निर्मण झाला आहे असे समजून अनेकजण गॅस एजन्सी जवळ गर्दी करताना दिसत आहेत मात्र हा गॅसचा खरा तुटवडा नसून अफवांचे पेव फुटल्यामुळे निर्माण झालेली परिस्थिती असल्याचे जिल्हा पुरवठा प्रशासनाने स्पष्ट केले आहे. सोशल मीडियावर पसरलेल्या संदेशांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून अनेकांनी नियोजित वेळेपूर्वीच गॅस सिलिंडर घेण्यासाठी एजन्सींवर धाव घेतली. त्यामुळे काही ठिकाणी एजन्सीसमोर रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळाले.दरम्यान, जिल्हा पुरवठा विभागाने नागरिकांना स्पष्ट आवाहन केले आहे की, घरगुती गॅसचा कोणताही तुटवडा नाही. पुरवठा नियमित सुरू असून अफवांवर विश्वास ठेवू नये. नागरिकांनी घाबरून अनावश्यक साठा करू नये, अन्यथा इतर ग्राहकांना अडचण निर्माण होऊ शकते, असेही प्रशासनाने सांगितले.गॅस एजन्सींच्या प्रतिनिधींनीही सांगितले की, सिलिंडरचा पुरवठा नियमित होत आहे, मात्र अचानक वाढलेल्यामागणीमुळे काही वेळ ताण जाणवत आहे. परिस्थिती लवकरच पूर्ववत होईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.दरम्यान प्रशासनाने नागरिकांना शांतता आणि संयम राखण्याचे आवाहन करत अफवांपासून दूर राहण्याचा सल्ला दिला आहे.

# कोरडगावकरांचा विजेच्या प्रश्नावर संताप

## महावितरणकडून दोन-तीन दिवसांत तोडगा काढण्याचे आश्वासन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी** : तालुक्यातील कोरडगाव येथे वारंवार होणाऱ्या विज खंडित समस्येमुळे ग्रामस्थांचा संयम सुटला असून या गंभीर प्रश्नावर नागरिकांनी तीव्र आंदोलन छेडले. गावातील मार्गदर्शक रवींद्र उर्फ भोरू म्हस्के यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रामस्थांनी महावितरणच्या कारभाराविरोधात जोरदार घोषणाबाजी करत आपला संताप व्यक्त केला. तसेच या संदर्भात पोलीस स्टेशनलाही निवेदन देण्यात आले.

कोरडगाव हे पाथर्डी तालुक्यातील मोठ्या बाजारपेठेचे गाव मानले जाते. मात्र इतक्या महत्त्वाच्या गावात वारंवार वीजपुरवठा खंडित होत असल्यामुळे नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत आहे. महावितरण कार्यालयाच्या हलगर्जीपणामुळेच ही समस्या निर्माण होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी यावेळी केला.

सतत होणाऱ्या वीज खंडितामुळे व्यापाऱ्यांचे आर्थिक नुकसान होत आहे, तर विद्यार्थीवर्गालाही त्याचा मोठा फटका बसत आहे.

गावात वारंवार अंधार पडत असल्यामुळे चोरट्यांना देखील संधी मिळत असून घरफोड्यांच्या घटनांची भीती वाढली असल्याची भावना ग्रामस्थांनी व्यक्त केली. त्यामुळे कोरडगावमध्ये तात्काळ सुरळीत वीजपुरवठा सुरू करावा, तसेच गावासाठी दोन नवीन डीपी बसवाव्यात, अशी मागणी ग्रामस्थांनी जोरदारपणे मांडली.

महावितरण प्रशासनाने तात्काळ या प्रश्नाकडे लक्ष द्यावे, अन्यथा मंगळवार दिनांक १७ मार्च २०२६ रोजी कोरडगाव येथे रास्ता रोको आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा ग्रामस्थांनी यापूर्वी दिला होता.

आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन महावितरणचे कनिष्ठ अभियंता गणेश सांगळे यांनी ग्रामस्थांशी चर्चा केली. यावेळी दोन ते तीन दिवसांत सर्व प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

या आश्वासनानंतर ग्रामस्थांनी आंदोलन तात्पुरते मागे घेतले. या आंदोलनात रवींद्र उर्फ भोरू म्हस्के, प्रताप देशमुख, स्वराज बोंद्रे, सुनील शिंदे, नवनाथ वाळके, काकासाहेब देशमुख, त्रिंबक देशमुख, युन्नूसभाई शेख, अनिल ससाने, सुदर्शन काकडे, अरुण मुखेकर, सोपान भिंगारे, अमोल काकडे, शुभम टुपके, जालिंदर मुखेकर, संतोष कुसळकर, विलास मुखेकर यांच्यासह मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

## संत वामनभाऊ विद्यालयात लोक वर्गणीतून जलकुंभाचे भूमिपूजन



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अमरापूर** : सोमवार दि. ९ मार्च २०२६ रोजी, श्री संत वामनभाऊ विद्यालय वडुले खुर्द येथे, पालक - शिक्षक सहविचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी झालेल्या सहविचार सभेच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री किसन चव्हाण हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सरपंच श्री भाऊसाहेब आव्हाड, 'ज्ञानेश्वर' चे माजी संचालक श्री साहेबराव आंधळे, उपसरपंच श्री तात्यासाहेब तुतारे ,पोलीस पाटील बाळासाहेब आव्हाड, माजी सरपंच चंद्रकांत रणमले, पांडुरंग नागरे, चेअरमन श्री दिलीपराव आव्हाड , विष्णुदास आव्हाड, नवनाथ आव्हाड, सेवानिवृत्त शिक्षक श्री शेषराव आव्हाड हे उपस्थित होते. यावेळी पालक व शिक्षक यांनी विद्यालयाच्या भौतिक सोई सुविधा व विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढ यावर सविस्तर चर्चा केली. यावेळी पालकांनी विद्यालयातील विद्यार्थ्यांना आरोग्याच्या दृष्टीने पिण्याचे शुद्ध पाणी मिळावे अशी मागणी केली. त्यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून उपस्थित पालकांनी लोक वर्गणी मधून भव्य जलकुंभ उभारावा व त्यामध्ये *आरओ वॉटर प्लांट* सुरू करावा असा ठराव मांडला व सर्वानुमते मंजूरही करण्यात आला .

## पाथर्डीत जागतिक महिला दिन उत्साहात

# उपमुख्यमंत्री पवार व आ. मोनिका राजळे यांचे कार्य महिलांसाठी प्रेरणादायी : आव्हाड

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी** : महिलांना आत्मविश्वास, संधी आणि सन्मान मिळाला तर त्या कर्तृत्वाच्या शिखरावर पोहोचू शकतात. राज्यातील उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि आमदार मोनिका राजळे यांचे कार्य आजच्या महिलांसाठी प्रेरणादायी ठरत आहे, असे मत पाथर्डी नगरपरिषदेचे नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी व्यक्त केले.

जागतिक महिला दिनाच्या निमित्ताने आरोग्य माता केंद्र आणि ज्योती भवन यांच्या संयुक्त विद्यमाने महिला सन्मान समाजाचा अभिमान या संकल्पनेवर आधारित विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. सामाजिक बांधिलकी, आरोग्यसेवा आणि महिला सक्षमीकरणाचा संदेश देणारा हा कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

कार्यक्रमाला उपनगराध्यक्ष मंगल कोकाटे, नंदुरबारच्या समाजसेविका सिस्टर जॅकलीन, नगरसेवक ज्योती पवार, महिला पोलीस कॉंस्टेबल उत्कर्षा वढते, डॉ. सोनल नागरे, महिला प्रतिनिधी शाफिया पटेल, फादर सुनील गायकवाड तसेच भक्ती निवास चर्चचे फादर जोशी आदी मान्यवर उपस्थित होते. ज्योती भवनमधील विद्यार्थिनींच्या स्वागत गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली आणि उपस्थितांनी टाळ्यांच्या कडकडाटात त्यांना दाद दिली.

या प्रसंगी आरोग्य माता केंद्राच्या संचालिका सिस्टर शीला जाधव, ज्योती भवन वसतीगृहाच्या संचालिका सिस्टर कीर्ती मकासरे तसेच सुपेरियर लुसी डीब्रीटो सिस्टर यांचा मान्यवरांच्या हस्ते गौरव करण्यात आला. नगराध्यक्ष अभय आव्हाड यांच्या वतीने आरोग्य माता केंद्र व ज्योती भवनमधील सर्व कर्मचाऱ्यांचा भेटवस्तू देऊन विशेष सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमात आरोग्य केंद्राच्या कर्मचाऱ्यांनी बालविवाह प्रतिबंधक या विषयावर प्रभावी नाटिका सादर करून सामाजिक प्रबोधन केले. बचत गटातील महिलांनी गवळणी, भारुड आणि समूह नृत्याद्वारे मनोरंजनासह जनजागृतीचा सुंदर संगम घडवला. शिवणकला प्रशिक्षण घेऊन स्वयंरोजगाराच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या महिलांनी जन्म बाईचा या विषयावर सादर केलेला नृत्यविष्कार विशेष दाद मिळवून गेला.

यावेळी बोलताना नगराध्यक्ष अभय आव्हाड म्हणाले की, महिला सक्षमीकरणासाठी केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांमुळे महिलांच्या आर्थिक, शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक प्रगतीस नवे बळ मिळत आहे. पाथर्डी शहरात गेल्या साठ वर्षांपासून सुरू असलेल्या पार्थ विद्या प्रसारक मंडळाच्या शैक्षणिक सेवेचा लाभ तालुक्यातील हजारो मुलींना झाला आहे. ही परंपरा पुढील काळातही कायम ठेवण्याचा संकल्प व्यक्त करत पालिकेच्या माध्यमातून आमदार मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखाली महिलांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सर्वतोपरी सहकार्य करण्यात येईल, असे आश्वासनही आव्हाड यांनी दिले.

कार्यक्रमाचे स्वागत व सूत्रसंचालन सिस्टर कीर्ती मकासरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सिस्टर शीला जाधव यांनी मानले. महिलांच्या सन्मानाचा संदेश देणारा हा कार्यक्रम उपस्थितांच्या मनावर ठसा उमटवून गेला.

# महिलांना कायद्याचे ज्ञान आवश्यक : डॉ.मुसळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर** : येथील न्यू आर्ट्स, कॉमर्स अँड सायन्स कॉलेज, अ. नगर (स्वायत्त) येथे जागतिक महिला दिन विद्यार्थिनी वसतिगृह दिन म्हणून उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाच्या प्रमुख पाहुण्या दिवाणी न्यायाधीश (वरिष्ठ स्तर) उज्ज्वला मुसळे (दिवाणी न्यायालय, अहिल्यानगर) होत्या. समाजात वावरताना महिलांना कायद्याचे ज्ञान असणे अत्यंत आवश्यक असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.





विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना डॉ. उज्ज्वला मुसळे यांनी सामाजिक मर्यादांचे भान ठेवून वागल्यास अनेक अडचणी टाळता येतात, असे सांगितले. व्यक्तिमत्व विकास करताना आरोग्याचीही विशेष काळजी घेणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ. जि. मराठा विद्या प्रसारक समाजाच्या खजिनदार मा. अॅड. दीपलक्ष्मी म्हसे या होत्या. अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थिनींना आयुष्यात मिळालेल्या संधीचे सोन करण्याचा संदेश दिला. आई-वडिलांना कधीही दुखवू नका, त्यांचा अभिमान वाढेल असे वर्तन ठेवा आणि शिक्षण पूर्ण करून स्वावलंबी बना, असा उपदेशही त्यांनी केला.

या कार्यक्रमासाठी अ. जि. म. विद्या प्रसारक समाजाचे अध्यक्ष मा. श्री. रा. ह. दरे साहेब आवर्जून उपस्थित होते. संस्थेच्या विश्वस्त सौ. अरुणाताई काळे तसेच संस्थेच्या सदस्या कल्पनाताई वायकर, अलकाताई जंगले आणि निर्मलाताई काटे यांनीही विद्यार्थिनींना मोलाचे मार्गदर्शन केले. स्त्रीत्वाचा सन्मान हा केवळ एका दिवसापुरता मर्यादित न राहता तो वर्षातील ३६५ दिवस कायम राहायला हवा, असे मत मान्यवरांनी व्यक्त केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाळासाहेब सागडे यांनी महाविद्यालयाच्या विकासाचा आढावा घेत विद्यार्थिनींना शुभेच्छा दिल्या. यावेळी हिराबाई भापकर यांच्या मौलिक कार्यांच्या स्मृतींनाही त्यांनी उजाळा दिला.

महिला दिनाचे औचित्य साधून मुलींच्या वसतिगृहात विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. पुस्तक परीक्षण, पत्रलेखन, वक्तृत्व स्पर्धा, स्केच मेकिंग, ब्युटी विथ ब्रेन, मेंदी, संगीत खुर्ची आणि अंताक्षरी अशा स्पर्धांमध्ये विद्यार्थिनींनी उत्साहाने सहभाग घेतला. तसेच विद्यार्थिनींनी सांस्कृतिक कार्यक्रमही सादर केले. जात्यावरच्या ओव्या, भारूड, लावणी, लोकगीत, नाटिका आणि एकांकिका यांसारख्या दर्जेदार सादरीकरणांनी उपस्थितांची मने जिंकली. विविध स्पर्धांतील विजेत्या विद्यार्थिनींना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते बक्षिसे देण्यात आली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. सुनिता मोटे यांनी केले. प्रा. डॉ. सुषमा ताकटे यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय करून दिला, तर प्रा. देवकी ढोकणे यांनी विद्यार्थिनींनी आईला लिहिलेल्या पत्राचे वाचन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. सारिका देशमुख आणि प्रा. भाग्यश्री तोडकरी यांनी केले, तर प्रा. संगीता निंबाळकर यांनी आभार मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापिका व वसतिगृहातील विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# श्रीगोंद्यात १५ मार्चला विराट हिंदू संमेलन

## रामगिरीजी महाराजांचे मार्गदर्शन



**श्रीगोंदा** : श्रीगोंदा शहरात रविवार दि. १५ मार्च रोजी सायंकाळी ६ वाजता संत श्री शेख महंमद महाराज मंदिर प्रांगणात विराट हिंदू संमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. या संमेलनात श्री क्षेत्र सरला बेटचे महंत हभप रामगिरीजी महाराज मार्गदर्शन करणार असल्याची माहिती हिंदू संमेलन आयोजन समितीने पत्रकार परिषदेत दिली.

हिंदू समाजातील आपसातील जातीभेद विसरून हिंदू परंपरा, संस्कृती आणि मूल्यांचे संरक्षण व संवर्धन करण्यासाठी तसेच देशभक्त आणि आदर्श नागरिक घडवून भारतमातेला वैभवाच्या शिखरावर विराजमान करण्याच्या उद्देशाने हे संमेलन आयोजित करण्यात आले आहे.संमेलनात सामाजिक समरसता, नागरिक कर्तव्य, पर्यावरण संवर्धन यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर मार्गदर्शन केले जाणार आहे. दरम्यान, संमेलनाच्या निमित्ताने सायंकाळी ४ वाजता भव्य शोभायात्रा काढण्यात येणार असून ती कलिका माता मंदिर, कालकाई चौक येथून सुरू होऊन संत श्री शेख महंमद महाराज मंदिर प्रांगणात येऊन समाप्त होईल. त्यानंतर येथे मुख्य सभा होणार आहे.या वेळी महंत हभप रामगिरीजी महाराज मार्गदर्शन करणार असून हभप भूषण महाराज महापुरुष प्रमुख उपस्थित राहणार आहेत. तसेच नाशिक विभाग बौद्धिक प्रमुख कृष्णाजी घरोटे हे प्रमुख वक्ते म्हणून मार्गदर्शन करणार आहेत.या संमेलनासाठी माता-भगिनी, भाविक व वारकरी बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन हिंदू संमेलन समितीच्या वतीने करण्यात आले.पत्रकार परिषदेला हभप विठ्ठल महाराज खेडकर, नगरसेविका मीराताई शिंदे, सुनील अनभुले, शिवाजी साळुंके, कालिदास कोथिंबीरे, प्रतीक पाचपुते, सागर गोरे, आदित्य अणवणे यांच्यासह हिंदुत्ववादी संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते.

### कार्यक्रमाची सुरुवातच राष्ट्रगीताने करणार

श्रीगोंद्यात महंत रामगिरी महाराज यांच्या कार्यक्रमानुसार हिंदू जनजागृतीच्या कार्यक्रमाची सुरुवात संभाजी ब्रिगेड ने जनगणमन या राष्ट्रगीताने करावी अशी मागणी केली होती त्यावर प्रत्युत्तर देताना राष्ट्रीय समाजसेवक संघाचे सदस्य यांनी सांगितले की या कार्यक्रमाची सुरुवात आम्ही राष्ट्रगीताने करणार आहे असेही सांगितले

### संत रोहिदास महाराज यांचे स्मारक होणार -मीरा शिंदे,नगरसेवक

तालुक्याचे आमदार विक्रम पाचपुते याच्या मार्गदशनखाली सामाजिक बैठक लावून श्रीगोंदयात सुमारे २ एकरात मोठे स्मारक बांधण्यात येणार असल्याची माहिती श्रीगोंदा नगरपरिषदेच्या नगरसेविका मीरा शिंदे यांनी बोलताना सांगितले.

दैनिक
राष्ट्र सह्याद्री



# एकलहरेत चिमुकलीचा सर्पदंशाने दुर्दैवी मृत्यू

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री



**श्रीरामपूर** : एकलहरे कार्यक्षेत्रातील जवाहरवाडी येथे सर्पदंशामुळे एका चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. ईश्वरी सुरेश बर्डे (इयत्ता दुसरी) असे मृत मुलीचे नाव असून ती माजी ग्रामपंचायत सदस्य सुरेश बर्डे यांची कन्या होती. मिळालेल्या माहितीनुसार, ईश्वरी हिला घरामागील शेतात असताना सर्पदंश झाला. ही बाब लक्षात येताच कुटुंबीयांनी तात्काळ तिला श्रीरामपूर येथील कामगार रुग्णालयात उपचारासाठी दाखल केले.

तेथील प्राथमिक तपासणीनंतर अधिक उपचारासाठी तिला लोणी येथे हलविण्यात आले. मात्र उपचार सुरू असताना तिचा दुर्दैवी मृत्यू झाला. ईश्वरी ही इयत्ता दुसरीत शिकणारी हुशार विद्यार्थिनी होती. तिच्या गोड आणि सालस स्वभावामुळे ती सर्वांची लाडकी होती.

# ब्रम्हलिन नारायणगिरी महाराजांनी समाजाला ज्ञानरूपी सुंगध दिला : महंत रामगिरी महाराज

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर / माळवाडगांव** : संताचे जीवन परोपकारासाठी असते.संत तुकाराम, संत एकनाथ, रविदास, गाडगे बाबा, ज्ञानेश्वर ,जनाबाई,मुक्ताबाई आदी. संताचे जीवन संघर्षात गेले ,सामाजिक कार्य करतांना त्यांनी कधीच लोकनिंदा व स्वार्थ बघितला नाही सद्‌गुरु ब्रम्हलिन नारायणगिरी महाराज यांचे जीवन ही मानवी हितासाठी व बेटाच्या उत्कर्षासाठी संघर्षात गेले निजामाच्या जोखाडातुन मराठवाड्याला मुक्त्ती देण्यासाठी फार मोठे योगदान देवुन लाखो भाविकांना गावोगावी जाऊन कथा किर्तनाच्या माध्यमातून ज्ञानरूपी सुगंध दिला असल्याचे प्रतिपादन महंत रामगिरी महाराज यांनी केले.

श्री क्षेत्र गोदाधाम सराला बेटावर आज योगिराज गंगागिरी महाराज यांच्या कृपाशिर्वादाने ब्रम्हलिन नारायणगिरी महाराज यांच्या १७ व्या पुण्यतिथी उत्सवात आयोजित किर्तन प्रसंगी संत



निळोबारायांच्या यांच्या मार्ग दारुण गेले आधी दयानिधी संत ते या अभंग रचनेचे विवेचन करताना महंत रामगिरी महाराज म्हणाले की ब्रह्मलीन नारायणगिरी महाराज याना बालपणापासुन अध्यात्माची आवड होती .

अनेक महापुरुषाच्या जीवनात संघर्ष होता .सद्‌गुरुनी संघर्ष करुन बेटाची व्याप्ती वाढवली. जादूटोणा, करणी सांगणारे संत नसतात तर समाजातील अनिष्ट प्रथा रुढी याबद्दल समाजात जावुन कथा किर्तनाच्या माध्यमातून समाज परिवर्तन घडवून आणणारे खरे संत असतात आणि ते काम ब्रम्हलीण नारायणगिरीजी महाराज यांनी केले. यावेळी किर्तनानंतर छत्रपती संभाजी नगर, आहिल्यानगर, नाशिक या तिन्ही जिल्ह्यातील सुमारे २५० ते ३०० गावातुन आलेल्या पुरणपोळ्या, मांडे व दुधाचा महाप्रसाद भाविकांना वाटण्यात आला.

याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत माजी शिक्षण व आरोग्य सभापती अविनाश गंलाडे, नगरसेवक संजय बोरणारे,जि प सदस्य पंकज ठोंबरे, सुभाष तांबे,धनंजय धोर्ड, निरज मुरकुटे, अमोल मलिक सतिष शिंदे, दत्तु खपके, रामदरबार आश्रमचे हरिशरणगिरी महाराज शिवगिरी आश्रमाचे सदिपान महाराज, विश्वनाथगिरी महाराज, अर्जुनगिरी महाराज, बाळासाहेब महाराज रंजाळे, रामभाऊ महाराज, विक्रम महाराज, साई महाराज, संतोष सोळंकी, सराला बेटाचे विश्वस्त मधुकर महाराज आदीसह लाखो भाविकांची उपस्थिती होती.

# श्रीरामपूरातील हॉटेलवर छापा

## १० एलपीजी सिलेंडर जप्त

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : घरगुती एलपीजी गॅस सिलेंडरचा व्यावसायिक वापर करणाऱ्यांवर श्रीरामपूर शहर पोलीस व तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागाने संयुक्त कारवाई करत शहरातील मेनरोडवरील दोन हॉटेलवर छापा टाकला. या कारवाईत १० घरगुती एलपीजी गॅस सिलेंडर जप्त करण्यात आले असून दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक नितीन देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक राम शिखरे, पुरवठा निरीक्षक सुहास पुजारी, योगेश खंडागळे तसेच शहर पोलीस ठाण्याचे कॉन्स्टेबल वाघमोडे, अजित पटारे व अमोल पडोळे यांच्या संयुक्त पथकाने ही कारवाई केली.

मेनरोडवरील 'हॉटेल दत्तभुवन' येथे घरगुती एलपीजी सिलेंडरचा व्यावसायिक वापर होत असल्याची खात्रीशीर माहिती मिळाल्यानंतर पंचांसमक्ष छापा टाकण्यात आला. छाप्यात हॉटेलमध्ये १० घरगुती एलपीजी सिलेंडर आढळून आले. हॉटेल चालक योगेश रमेश वैद्य (वय ४२) व आशिष रंजीत वैद्य (वय ३०, दोघे रा. वार्ड क्र. ३, श्रीरामपूर) यांच्याकडून हे सिलेंडर जप्त करून पंचनामा करण्यात आला. याप्रकरणी श्रीरामपूर शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# शिर्डीचे गोंदकर आणि पवार घराण्याचे ऋणानुबंध कायम

## रमेश गोंदकर यांनी घेतली उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : शिर्डीतील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते रमेश गोंदकर यांचे पवार घराण्याशी असलेले ऋणानुबंध पुन्हा पहावयास मिळाले असून गोंदकर यांनी मुंबईत देवगिरी बंगल्यावर उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची भेट घेत जुन्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी त्यांनी साईबाबांची प्रतिमा भेट देऊन साईदर्शनासाठी शिर्डीस येण्याची विनंती त्यांनी केली. तसेच शिर्डी नगरपरिषद निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाने महायुतीच्या माध्यमातून मिळविलेल्या यशाबाबत



सविस्तर माहिती दिली. याबाबत माहिती देताना गोंदकर म्हणाले की, राष्ट्रवादी काँग्रेसचे स्थानिक पदाधिकारी अमृत गायके, सुशांत औताडे व अमोल सुपेकर हे या भेटीच्या प्रसंगी उपस्थित होते.

देवगिरी बंगल्यावर झालेल्या या भेटीपूर्वी आम्हा सर्वांनी दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून श्रद्धांजली वाहिली. शिर्डी नगरपरिषद निवडणुकीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसने उत्तम कामगिरी केली. राष्ट्रवादी काँग्रेसचे शिर्डी शहराचे अध्यक्ष तथा शिर्डी नगरपरिषदेचे स्वच्छता व आरोग्य वैद्यकीय समितीचे सभापती दीपक गोंदकर हे सर्वाधिक मतांनी विजयी झाले.

यापुढेही शिर्डीत राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची शक्ती वाढविण्यासाठी आम्ही सर्व पदाधिकारी एकदिलाने काम करणार आहोत, याबाबतची सविस्तर माहिती आम्ही या वेळी त्यांना दिली.

# श्रीरामपुरातून अल्पवयीन मुलीला फुस लावून पळवले

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

श्रीरामपूर : तालुक्यातील खोकर परिसरात राहणारी १४ वर्षीय अल्पवयीन मुलगी बेपत्ता झाल्याची घटना समोर आली असून अज्ञात व्यक्तीने फूस लावून तिला पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे. याप्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर कुटुंब खोकर परिसरात वास्तव्यास असून त्यांना दोन मुली आहेत.

मोठ्या मुलीचे लग्न झाले असून ती सासरी नांदते, तर धाकटी मुलगी आई-वडिलांसोबत राहून मजुरीचे काम करत होती. दि. ८ मार्च २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ७ वाजता कुटुंबीय जेवण करून झोपले. मुलगी व तिचा भाऊ शेजारच्या खोलीत झोपले होते. मात्र रात्री सुमारे २ वाजता मुलीची आई बाथरूमसाठी उठली असता मुलगी झोपलेल्या ठिकाणी आढळली नाही.

यानंतर कुटुंबीयांनी घर व परिसरात शोध घेतला तसेच नातेवाईक व मैत्रिणींना संपर्क साधला; मात्र मुलगी कुठेही आढळली नाही. त्यामुळे अज्ञात व्यक्तीने फूस लावून मुलीला घरातून पळवून नेल्याचा संशय व्यक्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# श्रीरामपूर नगरपरिषदेच्या कर्मवीर चौकातील वाचनालयाचे काम रखडले

शफीक बागवान | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : मोठ्या थाटामाटात प्रशासकीय राजवटीत विशेष अनुदान योजनेतून श्रीरामपूर शहरात सुमारे ७५ लाख रुपयांचे वाचनालय अभ्यासिका बरोबरच साकारत असलेल्या स्पर्धा परीक्षा केंद्राचे काम सध्या बंद आहे. हे काम का रखडले ही बाब गुलदस्त्यात आहे. जय हिंद युथ क्लब स्पर्धा परीक्षा केंद्र अभ्यासिका आणि वाचनालय अशा स्वरूपाचे वैशिष्ट्यपूर्ण कामासाठी विशेष अनुदान योजनेतून हे स्पर्धा परीक्षा केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

सद्यस्थितीत वाचनालयाचे फाउंडेशन आणि भिंतीचे काम पूर्ण झाले आहे. शहरातील कर्मवीर चौकातील मिनी स्टेडियम मैदाना वरील जुन्या तलाठी कार्यालयाच्या जागेत हे वाचनालय अर्धवट स्थितीत उभे आहे. वाचनालयात स्वच्छ पिण्याचे पाणी, स्वच्छतागृहे, पुरेसा प्रकाश आणि वातानुकूलित व्यवस्थेचा समावेश आहे. जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात अशा प्रकारचे वाचनालय उभे राहत आहे. श्रीरामपूर नगरपालिकेने या वाचनालयाला लवकरच मूर्त स्वरूप



देण्याचे धोरण आखले होते. बांधकाम होत असलेल्या या वाचनालयाच्या चौकातून महाविद्यालयात दररोज हजारो विद्यार्थी जातात.

सध्या या वाचनालयाचे बांधकाम बंद असल्याने त्यांचे आपोआपच याकडे लक्ष वेधले जात आहे. विद्यार्थ्यांच्या दृष्टिकोनातून अतिशय महत्त्वाच्या ठिकाणी बांधण्यात येत असलेल्या या वाचनालयाचे बांधकाम अचानक बंद पडल्याने महाविद्यालयीन विद्यार्थ्यांबरोबरच अनेक ज्येष्ठ नागरिक इतर विद्यार्थी आणि नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे. नगराध्यक्ष करण ससाणे यांनी यासंदर्भात सदरील वाचनालय आणि स्पर्धा परीक्षा केंद्राचे बांधकाम तातडीने सुरू करावेत, या मागणीसाठी विद्यार्थ्यांबरोबरच ज्येष्ठ नागरिक आणि स्पर्धा परीक्षा देणारे विद्यार्थी नगराध्यक्ष ससाणे यांची लवकरच भेट देणार आहेत.

# किरकोळ कारणावरून बहिण-भावावर मारहाण; चौघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : तालुक्यातील टाकळीभान येथे किरकोळ कारणावरून झालेल्या कौटुंबिक वादातून एका महिलेसह तिच्या भावावर लाकडी दांडक्याने मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात चार जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मीना सुनील दाभाडे (वय ४०, रा. टाकळीभान) यांच्या घरी त्यांचा भाऊ परशुराम सोमनाथ सिनकर आला असताना चहा देण्याच्या कारणावरून वाद निर्माण झाला.

या वादातून सुनेच्या माहेरच्या मंडळींबाबत बोलणे झाल्याने दोन्ही कुटुंबांमध्ये शाब्दिक चकमक झाली. त्यानंतर गोरख बाबूराव तुपे, विशाल गोरख तुपे, कल्पना गोरख तुपे व जालिंदर बाबूराव तुपे (सर्व रा. टाकळीभान) यांनी शिवीगाळ करत लाकडी दांडक्याने मारहाण केली.

या मारहाणीत मीना दाभाडे यांच्या चेहऱ्यावर मार लागून त्यांचा चष्मा फुटला व नाकातून रक्तस्राव झाला. तसेच त्यांचे भाऊ परशुराम सिनकर यांनाही मारहाण करण्यात आली. जखमींवर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

याप्रकरणी मीना दाभाडे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# भेर्डापूर-वांगी रोड परिसरात बेकायदा दारू विक्रीवर छापा; आरोपी ताब्यात

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**श्रीरामपूर** : श्रीरामपूर तालुक्यातील भेर्डापूर-वांगी रोड परिसरात बेकायदेशीररित्या देशी व विदेशी दारूची विक्री करणाऱ्या एका व्यक्तीवर श्रीरामपूर तालुका पोलिसांनी छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत विविध ब्रँडच्या दारूच्या बाटल्या जप्त करण्यात आल्या असून आरोपीला ताब्यात घेण्यात आले आहे. तालुक्यातील कारेगाव बीट हद्दीत पेट्रोलिंग करत असताना पोलीस उपनिरीक्षक शिंदे, होमगार्ड सागर कोळपे व होमगार्ड अक्षय आरगस्कर यांना गुप्त माहिती मिळाली.

भेर्डापूर-वांगी रोडवरील एका किराणा दुकानाच्या आडोशाला एक इसम बेकायदेशीरपणे विदेशी दारूच्या बाटल्यांची विक्री करत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पोलिसांनी दुपारी सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास तेथे छापा टाकला. छाप्यात एक व्यक्ती दारूच्या बाटल्या विक्री करताना आढळून आला. चौकशीत त्याने आपले नाव संदीप तुळशीराम जंजिरे (वय ४२, रा. भेर्डापूर, ता. श्रीरामपूर, जि. अहिल्यानगर) असे सांगितले. त्याच्याकडे दारू विक्रीचा कोणताही परवाना नसल्याचे पोलिसांच्या तपासात उघड झाले. झडती दरम्यान देशी बॉम्बे संत्रा, मॅग्रम संत्रा, इम्पीरियल ब्ल्यू, मास्टर स्ट्राँग तसेच रस्टम गोल्ड रम कंपनीच्या १८० मिलीच्या एकूण बाटल्या असा सुमारे २ हजार ८० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी श्रीरामपूर तालुका पोलीस ठाण्यात महाराष्ट्र दारूबंदी कायदा कलम ६५ (ई) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करत आहेत.

# सांई संस्थानला ७० पोते हरभरा व तिन लाखांच्या टायरचे दान

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : देश-विदेशातील लाखो भाविकांची श्री साईबाबांवर अढळ श्रद्धा असून भाविक भक्तिभावाने श्रींच्या चरणी विविध स्वरूपात उदंड दान अर्पण करीत असतात. याच श्रद्धेपोटी शिर्डी व परिसरातील साईभक्तांनी श्री साईबाबांच्या चरणी देणगी अर्पण केली आहे. श्री साईबाबा संस्थान ट्रस्टचे सेवानिवृत्त कर्मचारी विलास सोपान कोते, शिर्डी यांनी श्री साईबाबांच्या चरणी सुमारे ३ लाख ३५ हजार रुपये किंमतीचे देशी जातीचे ७० पोते हरभरे अर्पण केले. या हरभऱ्यांचा उपयोग संस्थानच्या श्री साई प्रसादालयात भाविकांना प्रसादरूपाने देण्यात येणाऱ्या भोजनातील भाजीसाठी करण्यात येणार आहे. तसेच पुणतांबा येथील साईभक्त विलास दुरगुडे यांनी २ लाख ९९ हजार ९९९ रुपये किंमतीचे अपोलो एंड्युरंस कंपनीचे १६ नग टायर संस्थानकडे देणगी स्वरूपात सुपुर्द केले आहे. या टायरचा उपयोग श्री साईबाबा संस्थान ट्रस्टकडे उपलब्ध असलेल्या वाहनांसाठी करण्यात येणार आहे.

# राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीची प्रशासकीय तयारी पूर्ण

## लवकरच निवडणुकीची घोषणा !

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीसाठी लवकरच घोषणा होण्याची दाट शक्यता आहे. मतदारसंघाच्या पोट निवडणुकीच्या शक्यतेने निवडणूक विभागाने प्रशासकीय तयारी पूर्ण करण्याची जय तयारी चालू आहे. साधारणता: पुढील आठवड्यात राहुरी विधानसभेच्या पोट निवडणुकीसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर होणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून सांगण्यात येत आहे.भाजपचे दिवंगत आ. शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या जागेमुळे राहुरी विधानसभा निवडणुकीसाठी यापूर्वीच अंतिम मतदार यादीची घोषणा करण्यात आलेली आहे.

राहुरी पाथर्डी नगर या विधानसभा मतदारसंघात ३ लाख ३३ हजार ३०७ मतदारांची नोंदणी झालेली असून यात १ लाख ७२ हजार १७३ पुरुष तर १ लाख ६१ हजार १३३ महिला मतदारांचा समावेश आहे. दरम्यान, निवडणूक कार्यक्रमाची घोषणा होईपर्यंत मतदार नोंदणी सुरू राहणार असल्याचे सांगण्यात आले. राहुरी प्रमाणेच बारामती विधानसभा मतदारसंघासाठी पोटनिवडणूक होणार आहे.

या ठिकाणी देखील प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाच्या संकेतानूसार महाराष्ट्रातील राहुरी आणि बारामतीची विधानसभेची पोटनिवडणूक होणार आहे. राहुरीच्या पोट निवडणुकीसाठी



मतदार यंत्रांची प्रथम तपासणी पूर्ण करण्यात आलेली आहे. यात ५९८ बीयू, ६१४ सीयू आणि ६०६ व्हीव्ही पॅट यांची तपासणी करून मतदान यंत्रे निवडणुकीसाठी सज्ज ठेवण्यात आलेले आहेत.

लवकर या मतदार यंत्राचे एकत्रिकरण करून त्यातील कोणते यंत्रे राखीव ठेवणार आणि कोणते कोणत्या मतदान केंद्रावर पाठविण्यात येणार याचे यांत्रिक पध्दतीने निश्चित करण्यात येणार आहेत.

# शिर्डीतील घरगूती गॅस पुरवठा सुरळीत, साई गणेश एजन्सी अलर्ट मोडवर

प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : आंतरराष्ट्रीय स्तरावर निर्माण झालेली युद्धजन्य परिस्थिती, आखाती देशांमधून होणाऱ्या कच्च्या तेलाच्या वाहतुकीतील अडथळे आणि इंधन पुरवठ्यातील तांत्रिक अडचणींमुळे काही भागात एलपीजी गॅसच्या वितरणावर तात्पुरता परिणाम जाणवत आहे. यावर उपाय योजना म्हणून जिल्हा प्रशासनाने याची गंभीर दखल घेतली असून कोणत्याही परिस्थितीत प्रत्येक ग्राहकाना नियमानुसार गॅस पुरवठा करण्यासाठी प्रशासन सज्ज झाले असून शिर्डी सह परिसरात गॅस पुरवठा करणारी साई गणेश गॅस एजन्सी अलर्ट मोडवर आली आहे .

साई गणेश गॅस एजन्सी दररोज हजारो ग्राहकांच्या सेवेत तत्पर आहे . अनुभव कर्मचारी व गतीमान वितरण व्यवस्था यामुळे आता पर्यंत कोणताही




ग्राहक वंचीत राहीला नाही . युद्धजन्य परिस्थिती मुळे थोडयाफार प्रमाणात त्याची झळ बसत असताना ही साई गणेश गॅस एजन्सी तत्पर सेवेत उपलब्ध आहे .सद्यस्थितीत सिलेंडर भरण्यासाठी कोणतीही प्रतीक्षा यादी नसून ग्राहकांनी ऑनलाइन बुकिंग केल्यानंतर नियमानुसार प्रत्येकाला सिलेंडरचे वितरण करण्यात येत आहे.

गॅस कंपन्या आणि स्थानिक एजन्सी नागरिकांना नियमित व सुरळीत पुरवठा मिळावा यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहेत. घरगुती गॅसचा गैरवापर टाळण्यासाठी गॅस कंपन्यांनी दोन सिलेंडरच्या वितरणामधील अंतर २१ दिवसांवरून ३०दिवसांपर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे गॅसचा योग्य वापर होऊन सर्व ग्राहकांना वेळेत सिलेंडर उपलब्ध होणार आहे.